पुणे, गुरूवार, २७ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 119 • वर्ष ४ थे, अंक ११९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



कलाग्राम प्रकल्प धूळखात

P३



महिलाशक्तीचा सुवर्ण पराक्रम

१२

### हक्कभंग, अटकेची मागणी, ठाकरेंवरील आरोप

# गदारोळात अधिवेशनाचे वाजले सूप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आज विधानसभेच्या अर्थसंकल्प अधिवेशनाचे सूप वाजले. दिवसभरात, कुणाला कामरा, सुषमा अंधारे यांच्या विरुद्ध विधिमंडळात दाखल झालेला हक्कभंग तसेच सुप्रिया सुळे, रोहित पवार यांच्यावर गुन्ह दाखल करण्याच्या मागणीमुळे झालेला गदारोळ यावरून दिवसभर विधिमंडळाचे कामकाज वादळी ठरले. अशातच आदित्य आणि उद्धव ठाकरे यांच्यावरील आरोप प्रत्यारोप यावरूनही काही काळ गोंधळ माजला.

सुशांत प्रकरणाची वाट लावण्यासाठी ठाकरे यांनी त्यांच्या घराची रंगरंगोटी करून घेतली, असा आरोप राम कदम यांनी केला, तर आदित्य ठाकरे यांची नार्कोटेस्ट करण्याची मागणी भावना गवळी यांनी केली. अशा प्रचंड गदारोळात अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पसारा सरकारने आटोपता घेतला.

कुणाल कामरा याचे गाणे पुन्हा सुषमा अंधारे यांनी म्हटले. मुख्यमंत्री यांनी निवेदन केले असतानाही परत ते गाणे म्हटले आहे, हा सभागृहाचा अवमान आहे. म्हणून, आपण सुषमा अंधारे यांच्याविरुद्ध हक्कभंग आणत आहोत, असे आमदार रमेश बोरनारे यांनी विधानसभेत हक्कभंग प्रस्ताव आणताना म्हटले.

कॉमेडियन कुणाल कामराने आपल्या 'नया भारत' या कॉमेडी शोमधून शिवसेना पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर नाव न घेता बोचरी टीका केली होती. एका गाण्याचे विडंबन करत कामराने एकनाथ शिंदेंच्या दाढी, चष्म्यावरून आणि शिवसेना पक्षातील बंडावरून निशाणा साधला होता.

कॉमेडियनचा हा व्हीडीओ तुफान व्हायरल झाला असून शिवसैनिक संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले. तर, काही शिवसैनिकांनी

» पान ७ वर

#### लक्षवेधीसाठी लक्ष्मी दर्शन?

● लक्षवेधी मांडण्यासाठी आज सत्ताधारी पक्षाचेच काही आमदार हे विधानसभा अध्यक्षांच्या दालनात जाऊन लक्षवेधी म्हणण्यासाठी किती रक्कम लागेल? असे विचारत होते, असा गंभीर आरोप आ. भास्कर जाधव यांनी केला. त्यावर अजित पवार यांनी उत्तर देताना , असे असेल तर तक्रार द्या त्यांना कार्यमुक्त करू असे सांगितले.



#### विरोधी पक्षनेत्याची खुर्ची काहीकाळ राहणार रिकामी

● विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाची बुधवारी सांगता झाली. विरोधी पक्षनेते पदी कोणाचीच वर्णी न लागल्याचे सभागृहाने पाहिले. त्याचवेळी, विधानसभेतील विरोधी पक्षनेते पदाची खुर्ची आणखी काही काळ रिकामी राहण्याची शक्यता आहे. स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीच तसे संकेत दिले आहेत. सभागृहात डाव्या बाजूला पहिल्या रांगेतील पहिली खुर्ची उपाध्यक्षांची असते. तर, दुस-या खुर्चीवर विरोधी पक्षनेते बसतात. उपाध्यक्षांच्या खुर्चीवर त्या रिकाम्या खुर्चीवर आज अण्णा बनसोडे विराजमान झाले. आता त्यांच्या शेजारची खुर्ची भरा, विधानसभा अध्यक्षांची निवड करा, अशी विनंतीवजा मागणी विरोधी बाकांवरून होत होती. अन्यथा उपाध्यक्ष बनसोडे यांना एकटे वाटेल, अशी मिश्किल टिप्पणीही झाली. त्यावर, काही काळ त्यांना मोकळे बसू द्या, असे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले.

## पुण्यात तब्बल अडीच हजार क्राईम हॉटस्पॉट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे पोलिसांनी काढलेल्या एका निष्कर्षात पुणे शहरात तब्बल २५७६ क्राईम हॉटस्पॉट असून तेथील तब्बल ३०००० गुन्हेगारांचा डेटा एकत्रित करण्यात आला आहे.

परिमंडल पाच आणि तीन मधील पोलिस ठाणांच्या हद्दीत असे सर्वाधिक हॉटस्पॉट असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या ठिकाणी कॉप्स २४ च्या माध्यमातून दिवस आणि रात्री, अशा दोन सत्रांत पाचवेळा गस्त घातली जात असून, त्याची माय सेफ आणि डायल ११२ च्या एमडीटीमध्ये नोंदणी केली जाते आहे.

२०२५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत खुनाच्या घटनांचे प्रमाण साडेसहा टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कॉप्स २४ आणि स्थानिक पोलिस ठाण्यांच्या माध्यमातून शहरात पोलिसांचा प्रेझेन्स वाढविण्यात येत आहे. तसेच गुन्हेगारांवर सर्व्हिलन्स ठेवला जात आहे. झोपडपट्टीतील नशा करणाऱ्यांवर पोलिसांची नजर असल्यामुळे ते प्रमाण कमी होताना दिसते आहे.

» पान ७ वर

### At a Glance

#### अलाहाबाद कोर्टाची टिप्पणी असंवेदनशील

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिलेल्या निर्वाळ्यावरुन देशभरातून सवाल उपस्थित केले जात होते. आज सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. पायजम्याचा नाडा खेचणे हा बलात्कार किंवा बलात्काराचा प्रयत्न या श्रेणीत येत नसल्याचं अलाहाबाद उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी झालेल्या निकालात म्हटलं होतं.

#### वाघ्या कुत्रा दंतकथेची निर्मिती

**मुंबई :** आज छत्रपती संभाजी राजे यांनी वाघ्या कुत्रा ही केवळ दंत कथा असून त्याला कुठलाही ऐतिहासिक पुरावा नाही . आज शिवरायांच्या समाधी पेक्षा त्याचे मोठी समाधी झाली. त्याचे प्रस्थ माजवले जात आहे . त्यामध्ये समाधी पाडून टाका अशी मागणी केली. दुर्गगडापूर्वी तेथे समाधी नव्हतीच . राज संन्यास नाटकात याचा उल्लेख आला होता . छत्रपती संभाजी महाराजांची बदनामी करण्यासाठी ते एक कुभांड होते. परंतु आमदार पडळकर आणि अमोल मिटकरी यांनी याला प्रतिरोध केला आहे.

#### साईबाबांच्या पादुकांचे शिर्डीबाहेरही मिळणार दर्शन

**शिर्डी : शिर्डी साईबाबा संस्थानतर्फे भाविकांना दर्शनासाठी साईबाबांच्या पादुका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. १० एप्रिल ते २६ एप्रिल या कालावधीत देशभरात पादुका दर्शन होणार आहे. पहिल्या टप्प्यात दक्षिण भारतातील आठ शहरांमध्ये साईबाबांच्या पादुका भाविकांना दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू येथून**

» पान ७ वर

# संतोष देशमुख हत्याकांड; गुन्हेगारी कटच

### ॲड. उज्ज्वल निकम यांनी कोर्टात सांगितला संपूर्ण घटनाक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खटल्याची सुनावणी बीड कोर्टात आजपासून सुरू झाली आहे. ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी आज कोर्टामध्ये युक्तिवाद केला. सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाचा संपूर्ण घटनाक्रम त्यांनी कोर्टात सांगितला. त्यासोबतच ही घटना कंटिन्यू क्रिमिनल कॉन्सपरन्सी (गुन्हेगारी कट)असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला.





घटनेची सुरुवात ८ ऑक्टोबर २०२४ पासून सुरू होते आणि देशमुख यांचे अपहरण आणि खून ९ डिसेंबर २०२४ पर्यंत होतो असे उज्ज्वल निकम यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले. आरोपींच्या वकिलांकडून काही कागदपत्रांची मागणी करण्यात आली होती, ती देखील पूर्ण करण्यात आल्याचे निकम यांनी सांगितले. पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आज सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकील उज्ज्वल निकम उपस्थित होते. आरोपीचे वकील आणि उज्ज्वल निकम यांच्यात छोटासा युक्तिवाद झाला. यावेळी ही केस आरोप निश्चितीसाठी तयार असल्याचे उज्ज्वल निकम यांनी म्हटले. त्यावर आरोपीच्या वकिलांनी आरोप निश्चितीची घाई करू नये असा आक्षेप घेतला. अद्याप आम्हाला सगळी कागदपत्रं मिळालेली नाहीत त्यामुळे आरोप निश्चिती आत्ताच नको असे आरोपीच्या वकिलांनी म्हटले. सुनावणीनंतर ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी पत्रकार परिषदेत कोर्टात काय झाले ते सांगितले.

सरकारी वकील उज्ज्वल निकम म्हणाले,

» पान ७ वर

## 'नमस्ते'ची अंमलबजावणी पुण्यात

### कचरा वेचकांसाठीची केंद्र सरकारची योजना राबवणारे पहिले शहर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कचरा वेचकांसाठी केंद्र सरकारच्या 'नमस्ते' योजनेची अंमलबजावणी करणारे पुणे देशातील पहिले शहर ठरले आहे. महानगरपालिका आणि स्वच्छ कडून कचरा वेचकांच्या नोंदणीस सुरुवात केली गेली आहे. देशातील कचरा वेचकांना सामाजिक आणि आर्थिक सन्मान मिळावा, त्यांचे जीवनमान उंचावे आणि त्यांना सुरक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने 'नमस्ते' (नॅशनल ॲक्शन फॉर मॅकेनाईज सॅनिटेशन इकोसिस्टीम) ही योजना राबविली जात आहे.

सदर योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात पुण्यापासून करण्यात आली. केंद्र सरकारतर्फे अधिकृत नोंदणी आणि सामाजिक सुरक्षा योजनांचे फायदे या योजनेद्वारे कचरा वेचकांना मिळतील. यासाठी स्वच्छ संस्था,

» पान ७ वर

IDBI BANK
CIN: L65190MH2004GOI148838


**आयडीबीआय बँक लिमिटेड,**
आयडीबीआय हाऊस, ज्ञानेश्वर पदुका चौक,
फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे पिन : ४११००४

**निविदा सूचना – बँकेच्या मालकीच्या वापरात असलेल्या कारचा विक्री प्रस्ताव**


बँकेच्या मालकीच्या एका वापरात असलेल्या कारच्या विक्रीसाठी **'जशी आहे त्याच अवस्थेत'** आणि **'जे काही आहे त्यावर'** या तत्त्वावर सीलबंद प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तपशीलांसाठी कृपया बँकेच्या www.idbibank.in या संकेतस्थळावरील **'' नोटिसेस ॲण्ड टेंडर्स''** विभागाला भेट द्या. अर्ज सादर करण्याची अंतिम **तारीख ९ एप्रिल २०२५, दुपारी २.३० वाजेपर्यंत आहे.**

वरील अनुषंगाने कोणतीही पुढील कार्यसूची / शुद्धिपत्रक / मुदतवाढ इत्यादी बाबतची माहिती केवळ बँकेच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात येईल व वृत्तपत्रामध्ये कोणतीही स्वतंत्र अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार नाही.

**सही/-**
**प्रादेशिक प्रमुख–मुख्य महाव्यवस्थापक,**
**आयडीबीआय बँक, पुणे प्रादेशिक कार्यालय**



**श्री दत्त मंदिर देवस्थान चाकण येथे नियोजित सभामंडप भूमीपूजन समारंभ**



**गुरुवार, दिनांक २७/०३/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित केला आहे**

**शुभहस्ते**
श्री. अक्षय ज्ञानेश्वर जाधव, ( संघटक शिवसेना पुणे जिल्हा )

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**
मा. श्री दिलीपअण्णा मोहिते, ( मा. आमदार खेड आळंदी)

**शुभाशिर्वाद**
सदगुरू प. पु. आयुर्वेदाचार्य श्री श्री १००८ योगी शंकरानंदजी (बाबाजी) महाराज

**उपस्थिती**

मा. श्री बाबाजी शेठ काळे (आमदार खेड आळंदी)
मा. श्री अतुलभाऊ देशमुख (मा. जि. प. सदस्य पुणे)
मा. श्री प्रमोद वाघ साहेब (पी. आय. चाकण)
मा. श्री भगवानशेठ पोखरकर (मा. सभापती प. स. खेड)
मा. श्री अमृतनाना शेवकरी (मा. सदस्य पं. स. खेड)
मा. श्री राजेंद्र गोरे (मा. उपनगरध्यक्ष चाकण)
मा. श्री प्रकाश भुजबळ (मा.नगरसेवक)
मा. श्री विशालशेठ नायकवडी (मा. नगरसेवक)
मा. श्री अभिषेक मुटके (चेअरमन वि.वि.का.सो. चाकण )
मा. श्री रामदास धनवटे (शिवसेना पुणे जिल्हा)
मा. श्री विजयभाऊ रत्नपारखी (कार्याध्यक्ष, संताजी महाराज जगनाडे संस्थान सुसुंबरे
मा. श्री गोपाळ शेठ जगनाडे (सा. कार्यकर्ते)
मा. श्री निलेशशेठ जेधे (उद्योजक)
मा. श्री बाळासो वाफगावकर (उद्योजक)
मा. श्री लखीचंद कटारिया (सुनीती ज्वेलर्स)
मा. श्री नरपतशेठ मेहता (उद्योजक)
मा. श्री संदीपभाऊ (बच्चन) रासकर (मा नगरसेवक)
मा. श्री रणजितशेठ जरे (उद्योजक)
मा. श्री सचिनशेठ मांजरे (संचालक रा.स. बँक)
मा. श्री श्रीकांत वाडेकर (उद्योजक)
मा. श्री विकासशेठ हांगे (उद्योजक)
मा. श्री सचिन शेठ परदेशी (सा. कार्यकर्ते)
मा. श्री राहुल फुलवरे (सा. कार्यकर्ते)
मा. संगीताताई नाईकरे (सा.कार्यकर्त्या)
मा. श्री अरविंद खेडकर (आर्किटेक्चर)
मा. श्री सत्यवानभाऊ बनकर (उद्योजक)
मा. श्री रामभाऊ कांडगे (मा. आमदार, उपाध्यक्ष रयत शिक्षण संस्था)
मा. ज्योतीताई देवरे (तहसीलदार खेड)
मा. श्री भोसले साहेब (सी.ई.ओ. चाकण नगरपरिषद)
मा. श्री नितीनशेठ गोरे (सदस्य महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ )
मा. श्री विजयसिह शिंदे (सभापती कृ. उ. बाजार समिती खेड)
मा. श्री शेखरभाऊ घोगरे (मा. नगराध्यक्ष चाकण)
मा. श्री धीरज मुटके (मा. नगरसेवक)
मा. श्री. महेश शेवकरी (मा. नगरसेवक)
मा. श्री कालिदासदादा वाडेकर (मा.उपसरपंच चाकण)
मा. श्री वसंत गोरे (पो. पाटील चाकण )
मा. श्री भरतशेठ कानपिळे (उद्योजक)
मा. श्री किरणशेठ गायकवाड (उद्योजक)
मा. श्री दिलीपशेठ सोनिगरा (उद्योजक)
मा. श्री निनादशेठ भांबुर्डेकर (उद्योजक)
मा. श्री प्रकाश भुजबळ (सा. कार्यकर्ते मेदनकरवाडी)
मा. श्री राम महादू गोरे (मा. संचालक बाजार समिती खेड )
मा. श्री कांताराम पानसरे (सा. कार्यकर्ते)
मा. श्री नितीन वाव्हळ (सा.कार्यकर्ते)
मा. श्री सोमनाथशेठ तरस (उद्योजक)
मा. श्री देविदास कारले (उद्योजक)
मा. श्री गणेशशेठ बेंद्रे (उद्योजक)
मा. श्री मंदारभाई परदेशी (सा. कार्यकर्ते)
मा. श्री अनिल ठोंबरे सर
मा. श्री सुभाषशेठ भुजबळ (मा. सरपंच)
मा.श्री शांतारामशेठ मुंगसे (अध्यक्ष मेडिकल असो.)
मा. श्री चेतनशेठ कडुसकर (उद्योजक)

चाकण शहरातील सर्व देवस्थान ट्रस्टी व व्यवस्थापक मंडळी सर्व गणेशमंडळ अध्यक्ष व पदाधिकारी, सर्व सहकारी संस्था अध्यक्ष व संचालक मंडळ, राम नवमी उत्सव समिती, रोटरी व लायन्स क्लब, भैरवनाथ यात्रा कमिटी चाकण
**आपले नम्र - दत्तगुरु देवस्थान ट्रस्ट चाकण, सर्व पारायणकर्ते, सेवेकरी, सर्व कार्यकर्ते समस्थ ग्रामस्थ चाकण पंचक्रोशी**

# आरशात पाहून वारसा सांगू नका

### एकनाथ शिंदेंचा ठाकरे पिता-पुत्रांवर हल्लाबोल!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुती सरकारला १०० दिवस होतील. पहिल्या इनिंगमध्ये आम्ही अडीच वर्ष काम केले, ते खऱ्या अर्थाने अडीच वर्षाच्या कामाची पोहोचपावती होती. महाराष्ट्राच्या जनतेने प्रत्येक कामात रिझन देणाऱ्यांचा सिझन संपवला. पाच वर्षांची टेस्ट मॅच असली तरी आमची बॅटिंग टी-२० सारखीच आहे.

आरशात बघून वारसा सांगता येत नाही, हे लक्षात ठेवा.. असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. विधान परिषदेमध्ये ते बोलत होते.

एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्याची अर्थव्यवस्था चांगली असून, ती सांभाळायला राज्य सरकार सक्षम आहे. तुम्ही आपली चिंता करा, लोकांच्या न्यायालयाने दाखवले कोण कामाचे

» पान ७ वर



"आमच्या बदनामीसाठी काही पाखंडी लोक ठेऊन शिखंडी लोक कट रचत आहेत.तुम्ही जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा मारता पण प्रणित मोरेला मारलं, केतकी चितळेला मारलं, राणा दांपत्याला आत टाकलं, तेव्हा कुठे होते तुमचे संविधान?"
**— एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

#### यूट्यबरच्या चुकीमुळे नागपूर हिंसाचार?

**मुंबई :** औरंगजेबाच्या कबरीवरुन सुरू झालेल्या वादाची परिणामी नागपूर हिंसाचारापर्यंत पोहोचली. नागपूर हिंसाचाराची घटनेनंतर महाराष्ट्रभरात चिंतेचं वातावरण निर्माण झालं होतं. सोशल मीडियावरुन या संदर्भातील अफवा पसरवल्याचंही सांगितलं जात आहे. नागपूर दंगलीत अफवा पसरविणाऱ्या लोकांचा मोठा वाटा होता. एका युट्यूबरने पोलिसांविरूद्ध निराधार बातम्या पेरून माथी भडकवल्याचं आता उघड झालं आहे.

» पान ७ वर

# श्रीरामनवमीनिमित्त विविध कार्यक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने श्रीराम जन्मोत्सवानिमित्त तुळशीबाग येथील श्रीराम मंदिरात दि. ३० मार्च ते १६ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवांतर्गत श्रीरामरक्षा, अथर्वशीर्ष पठण, श्रीविष्णूसहस्रनाम, श्रीसूक्त व पुरुषसूक्त पठण, महापूजा, पालखी, श्री कौसल्या माता डोहाळजेवण, श्रीरामजन्म सोहळा, श्रीरामराज्याभिषेक सोहळा अशा धार्मिक कार्यक्रमांबरोबरच रामायण वाचन,

» पान ७ वर



#### उत्सवाची काही वैशिष्ठे :

● गुढीपाडव्याला रविवार, दिनांक ३० मार्च रोजी श्रीरामनवमी उत्सवास प्रारंभ होणार असून त्यादिवशी सकाळी ७ पासून श्रीरामास पवमान अभिषेक, श्रीरामरक्षा, अथर्वशीर्ष, श्रीविष्णूसहस्रनाम, श्रीसूक्त व पुरूषसूक्त पठण होणार आहे.

● दि. ३० मार्च ते ५ एप्रिल दरम्यान दररोज सकाळी ९ वाजता श्री गणेश्वर शास्त्री पारखी हे रामायण वाचन, दुपारी १२ वाजता श्रीरामांची महापूजा व आरती, सायंकाळी ७.३० वाजता श्रीरामांच्या छबिन्याची मिरवणूक व आरती महापूजा होणार आहे.

● दि. ३० मार्च ते ५ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी ५.३० वाजता ज्येष्ठ प्रवचनकार डॉ. कल्याणी नामजोशी यांचे श्रीमत् रामायण प्रवचन होणार आहे.

# हापूस महागच... आवक कमी झाल्याने खातोय 'भाव'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फळांचा राजा हापूसचा पहिला मोहर गळाल्याने आंब्याच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. परिणामी, गुलटेकडी मार्केट यार्डातील फळबाजारात हापूसची आवक अवघ्या दोन हजार पेट्यांवर आली आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेला गुढीपाडव्याचा सण चार दिवसांवर आला असताना हापूसची आवक मार्च महिन्याच्या नीचांकी पातळीवर पोहचली आहे. परिणामी, गतवर्षी ७०० रुपये प्रतिडझन मिळणारा हापूस यंदा १ हजार ८०० रुपयांना उपलब्ध होत आहे.



पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डातील फळबाजारात मागील वर्षी कोकणातून ४ ते ८ डझनाच्या ५ ते ६ हजार पेटीची आवक दररोज होत होती. ती आता १ ते २ हजार पेट्यांपर्यंत कमी होत आहे. लांबलेला पाऊस, कमी पडलेली थंडी आणि आता वाढलेल्या तापमानामुळे आंब्याचा पहिला मोहर गळाला आहे.

परिणामी, उत्पादन घटल्याने आवक कमी होत आहे. त्यातच पाडव्यामुळे पुढील ४ ते ५ दिवस मागणी जास्त असणार आहे. त्यामुळे भाव चढेच राहण्याचा अंदाज व्यापारीवर्गाकडून व्यक्त करण्यात आला. सध्या बाजारात कच्चा मालाच्या ४ ते ६ डझनाच्या पेटीला

» पान ७ वर

#### हंगाम लवकर संपणार?

● गुढीपाडवा दिवशी आवर्जून हापूस आंब्याचा आस्वाद घेतला जातो. मात्र, यावर्षी लहरी हवामानामुळे नेहमीच्या तुलनेत अवघा ३० ते ४० टक्के माल मार्केट यार्डातील फळबाजारात येत आहे. त्यामुळे भाव वाढले असून, आंबा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. १० एप्रिल ते १० मे या कालावधीत आवक वाढणार आहे. त्या वेळी भावात घट होण्याची शक्यता आहे. दरवर्षी ३० जूनपर्यंत हंगाम असतो. मात्र, तो यंदा एक महिना आधीच संपण्याचा अंदाज आहे.





## पोलीस खात्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी : खर्डेकर

**पुणे :** सध्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली राजकीय व्यंगात्मक टिप्पणीचा विषय गाजतो आहे व त्याबद्दल समाजात (सार्वत्रिक) तीव्र प्रतिक्रिया व पडसाद उमटत आहेत. अश्यातच इंस्टाग्राम वर लोकप्रियतेसाठी व पैसा कमविण्याच्या उद्देश्याने अनेक रील स्टार्स धुमाकूळ घालत आहेत.

योग्य कंटेन्टच्या अभावाने आणि लाईक्सची हवा डोक्यात गेल्याने काही रील स्टार कमरेखालील असभ्य विनोदावर भर देत आहेत. फेसबुकच्या माध्यमातून व्यक्त होताना किंवा विशिष्ट विषयावर टीका टिप्पणी करताना अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली मर्यादाभंग होत असताना दिसून येत आहे. आपले मत ज्यांना पटत नाही त्यांना शिव्यांची लाखोली वाहण्याचेही प्रकार निदर्शनास येत आहेत. अश्या प्रकरणात सभ्य समाजातील नागरिक तक्रार करण्यास अनुत्सुक असतात मात्र खासगीत ते यावर नाराजी नापसंती व्यक्त करतात. भविष्यात अश्या रील्स मुळे किंवा फेसबुक पोस्ट मुळे समाजात तेढ निर्माण होईल अथवा संघर्ष होण्याची शक्यता दिसून येते. तरी आपण सायबर सेल ला इन्स्टा वरील रील स्टार्स च्या असभ्य रील आणि फेसबुकवरील अनुचित पोस्ट तपासून त्या बाबत योग्य कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना द्याव्यात. भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर पोलीस खात्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी अशी मागणी पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांना भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर यांनी केली आहे.



## ज्येष्ठ नागरिकाच्या हातातील १० लाखांची रोकड चोरी

**पुणे :** चाकणहून येऊन एका दुकानात देण्यासाठी पायी जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाच्या हातातील १० लाख रुपयांची रोकड असलेली बॅग दुचाकीवरुन आलेल्या चोरट्याने भर दिवसा सर्वांदेखत चोरुन नेली. याबाबत अमीर युसुफ सय्यद (वय ६६, रा. शिवनगरी, बिजलीनगर, चिंचवड) यांनी खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी चोरट्याविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना खडकी बाजार येथील श्री महालक्ष्मी ज्वेलर्ससमोर मंगळवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. त्यानंतर खडकी पोलिसांनी चार तासामध्ये दोघा आरोपींना पकडून त्यांच्याकडून लुटलेली १० लाखांची बॅग जप्त केली आहे.

## मुलाने आई-वडीलांना पोटगी देण्याचा न्यायालयाचा निकाल

**पुणे :** आई-वडिलांची काळजी घेणे ही मुलाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहेच; तसेच त्यांची काळजी घेणेही बंधनकारक आहे,' अशा शब्दांत न्यायाधीश के. व्ही. ठाकूर यांनी एका प्रकरणात मुलाला दरमहा १६ हजार रुपये पोटगी देण्याचा निर्णय सुनावला आहे. या प्रकरणात वयाची ७५ री ओलांडलेल्या दाम्पत्याने गत वर्षी मार्चमध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५ नुसार, पोटच्या मुलाकडून पोटगी मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला होता.दाद मागण्यासाठी न्यायालयाची पायरी चढलेल्या वृद्ध दाम्पत्याला अखेर पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. वृद्धांच्या मुलाने हा अर्ज फेटाळून लावण्याची मागणी करताना आपल्यावर आई-वडिलांसोबत पत्नीचीही जबाबदारी असल्याचे म्हणणे मांडले. आपल्याला दरमहा ६० हजार रुपये पगार मिळतो आणि ५२ हजार ६०० रुपये खर्च येतो. आई-वडील मानसिक त्रास देत असून ते मुद्दाम महागड्या रुग्णालयांत उपचार घेतात. मी आई-वडिलांचा घरखर्च आणि परवडणाऱ्या रुग्णालयाचा खर्च उचलण्यास तयार आहे, असं मुलाचं म्हणणं होतं. मात्र, न्यायलयाने वृद्धांच्या बाजूने निकाल दिला.

## ससून रुग्णालयात गुंतागुंतीची शस्त्रक्रिया; आजोबांना जीवनदान

**पुणे :** मटणावर ताव मारत असताना चुकून हाड गिळलं. हे हाड अन्ननलिकेत अडकून अन्ननलिकेला छिद्र पडले. इंदापूरमधील आजोबांसोबत हा भयंकर प्रकार घडला. त्यांना श्वास घ्यायला अन् पाणी प्यायला देखील प्रचंड त्रास होत होता. डॉक्टरांनी एंडोस्कोपीद्वारे हे हाड बाहेर काढले. पुण्यातल्या ससून रुग्णालयात ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया झाली. सध्या या घटनेची सगळीकडे चर्चा होत आहे. या हाडामुळे आजोबांच्या अन्ननलिकेत छिद्र झाले. त्यामुळे आजोबांना पाणी देखील पिता येत नव्हते आणि श्वासही घ्यायला त्रास होत होता. ससून रुग्णालयातील शल्यक्रिया तज्ज्ञांच्या पथकाने 'एंडोस्कोपी'द्वारे यशस्वीपणे हाड बाहेर काढून त्यांना जीवनदान दिले. तसेच अन्ननलिकेचे छिद्र बुजविण्यासाठी स्टेंटही टाकला. ही शस्त्रक्रिया २७ फेब्रुवारी रोजी शल्यक्रिया तज्ज्ञ विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. पद्मसेन रनबागळे यांच्या नेतृत्वाखाली कान नाक घसा विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. राहुल ठाकूर, भूलतज्ज्ञ डॉ. सुरेखा शिंदे, डॉ. नेहा कांबळे, डॉ. सुजित क्षीरसागर यांच्या टीमने केली. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि आजोबांना जीवनदान मिळाले. आता आजोबांची प्रकृती चांगली आहे.

## राम नदी सेवक सन्मान




**पुणे** 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून यानिमित्त किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोप प्रसंगी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करताना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासू विचारवंत डॉ. माधव गाडगीळ. यावेळी (डावीकडून) वीरेंद्र चित्राव, डॉ. गाडगीळ, वडगबाळकर, आनंद चितळे आणि डॉ. गुरुदास नूलकर.

## पर्यावरण संरक्षण सामुहिक जबाबदारी : डॉ. वडगबाळकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्यावरण संवर्धन, जतन आणि संरक्षण ही आपली सामुहिक जबाबदारी असून ते आपण कर्तव्य भावनेने केले पाहिजे, असे मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि राम नदीचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांनी व्यक्त केले.

राम नदीशी नाते निर्माण व्हावे, तिच्या जैवविविधतेचा अभ्यास व्हावा, तिची स्वच्छता राखण्यासाठी तरुण पिढी प्रेरीत व्हावी सुरू करण्यात आलेल्या 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून यानिमित्त किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोप प्रसंगी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासू विचारवंत डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात आला, त्यावेळी पुरस्काराला उत्तर देताना डॉ. श्रीनिवास वडगबाळकर बोलत होते.

पत्रकार भवन येथे झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर फॅसिलिटेटर आनंद चितळे, किर्लोस्कर वसुंधराचे क्युरेटर डॉ. गुरुदास नूलकर आणि 'किर्लोस्कर वसुंधरा'चे संयोजक वीरेंद्र चित्राव आदी मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रनिर्माणासाठी अनोखा पुढाकार

## ३ हजार विद्यार्थ्यांना सेनेत सामील होण्यासाठी प्रोत्साहन, 'युगांतर २०४७' उपक्रमाचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय सैन्यात भरती होण्यासाठी युवकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'युगांतर 2047' या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुण्यातील नामांकित शिक्षण संस्थांमधील तीन हजार एनसीसी विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेत भारतीय लष्कर आणि पुनीत बालन ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रनिर्माणासाठी पुढाकार घेत या प्रेरणादायी सेमिनारचे आयोजन केले होते. युवक, योग आणि तंत्रज्ञान हे भारताच्या प्रगतीचे आधारस्तंभ असलेल्या या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये सखोल चर्चा झाली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे लेफ्टनंट जनरल अनूप शिंगल, एव्हीएसएम, एस.एम, महासंचालक, सैन्यभरती, नवी दिल्ली यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मे. जन. योगेश चौधरी, व्हिएसएम, एडीजी, झेआरओ पुणे, पुनीत बालन ग्रुपचे अध्यक्ष पुनीत बालन, आरएमडी फाऊंडेशनच्या अध्यक्षा जान्हवी धारीवाल- बालन, निवृत्त ब्रिगेडीयर सैरभसिंह शेखावत यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

'विकसित भारत' या संकल्पनेवर बोलताना लेफ्टनंट जनरल शिंगल यांनी भारतीय सैन्याच्या राष्ट्रनिर्माणातील महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला आणि युवकांनी सैन्यात भरती होऊन देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. त्यांच्या प्रभावी भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती आणि जबाबदारीची जाणीव निर्माण केली.



### उपक्रमातील वैशिष्ट्ये

- १) वरिष्ठ सैन्य अधिकार्यांकडून प्रेरणादायी व्याख्याने,
- २) करिअर मार्गदर्शन सत्र,
- ३) भारतीय सैन्यातील संधींबाबत माहिती,
- ४) एनडीए कॅडेट्सचे अनुभव
- ५) विशेष प्रेरणादायी भाषण ज्यात - जया किशोरी यांचे, शिस्त आणि चिकाटीचा महत्त्व पटवून देणारे व्याख्यान लक्षवेधी ठरले.
- ६) सैन्य दलाच्या विविध शस्त्रास्त्रांचे प्रात्यक्षिक प्रदर्शन आणि आधुनिक लष्करी तंत्रज्ञानाची झलक हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.
- ७) मेंटलिस्ट अमित कलंत्री यांचा मन वाचण्याचा परफॉर्मन्स सर्वांना अचंबित करणारा होता.

" भारतीय लष्कर ही केवळ नोकरी नाही तर ती आपली जीवनशैली आहे, ती संकटाशी सामना करण्याची ताकद देते, जी लष्करातील प्रमुख सेनानींना घडवते, तसेच लष्करातील इतर कर्मचाऱ्यांना शीस्त लावते. भारताचे भविष्य हे नव्या उर्जेने तरुणांचा हातात येत आहे. त्यासाठी युगातंर सारखे कार्यक्रम महत्वाचे आहेत, ही प्रेरणा प्रथम स्वामी विवेकानंद यांनी दिली आणि युवकांचे महत्व अधोरेखीत केले.

**-ले. जन. अनुप शिंगल,** महासंचालक लष्कर भरती, नवी दिल्ली



" आजच्या युगात तरुण पिढी समाज माध्यामांवरच जास्त भर देत आहेत.अशा वेळी त्यांना भारतीय सैन्यदलात करिअरच्या संधी किती आहेत.हे माहिती व्हावे म्हणून युगांतर २०४७ या कार्यक्रमाचे आयोजन भारतीय लष्कराला सोबत घेत आम्ही केले. यातून सैन्यदलाला नवे ऑफिसर नक्कीच मिळतील, अशी आशा वाटते.

**-पुनीत बालन,** अध्यक्ष, पुनीत बालन ग्रुप

# पुणे जि. प. नवी फेलोशिप योजना राबविणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री फेलोशिपच्या धर्तीवर पुणे जिल्हा परिषदेकडून फेलोशिप योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत २५ पात्र विद्यार्थ्यांची ११ महिन्यांसाठी निवड करण्यात येणार असून, त्यांना दरमहा २५ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. या योजनेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासोबतच नवउद्योजक, संशोधक आणि युवा नेतृत्वाला प्रशासनात सहभागी करून घेण्यात येणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शिक्षण, आरोग्य, कृषी, जलसंधारण, महिला व बालविकास, डिजिटल प्रशासन आणि सामाजिक कल्याण यांसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन व धोरणात्मक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

निवड झालेल्या तरुणांना प्रत्यक्ष प्रशासनात काम करण्याची संधी मिळणार आहे. तसेच, त्यांच्यावर स्थानिक समस्यांवर प्रभावी उपाय योजना सुचविण्याची जबाबदारी असणार आहे. या फेलोशिपमुळे तरुणांना प्रत्यक्ष जिल्हा प्रशासनात काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. त्यांना शासनाची कार्यपद्धती, योजना अंमलबजावणी आणि धोरणरचना, याचा प्रत्यक्ष परिचय होईल. यामुळे प्रशासनाला तरुणांच्या नावीन्यपूर्ण दृष्टिकोनाचा लाभ होणार आहे.

योजनेद्वारे उच्चशिक्षित विद्यार्थ्यांच्या कल्पनांचा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग प्रशासनाला होईल. नवीन योजना राबविताना संगणक प्रणालीचा अधिकाधिक वापर करता येईल. कमी खर्चात जास्त लाभ देणाऱ्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल.

### फेलोशिपच्या मुख्य जबाबदाऱ्या

- शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि प्रभावी निरीक्षण
- स्थानिक समस्या ओळखून त्यावर उपाययोजना सुचविणे
- डेटा विश्लेषण, तांत्रिक सुधारणा आणि धोरणात्मक संशोधन
- संगणक प्रणालीचा वापर करून नव्या संकल्पना सुचविणे

### निवड आणि पात्रता

- अर्जदार विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील असावा
- अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील उमेदवारांना प्राधान्य
- मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेतून अभियांत्रिकी किंवा एमबीएची
- पदवी असावी
- किमान ५० टक्के गुण आवश्यक

# 'पेहेल' कार्यक्रमात रंगले अमोल निसळ यांचे गायन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राग कलावतीच्या सुमधुर सादरीकरणाने पं. अजॉय चक्रबर्ती यांचे शिष्य व गायक अमोल निसळ यांनी पुणेकर रसिकांना मंत्रमुग्ध केले. निमित्त होते ध्वनी अकादमीच्या वतीने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या 'पेहेल' या सांगीतिक कार्यक्रमाचे.

एरंडवणे येथील सेवा भवन सभागृहात सदर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी निसळ यांनी राग कलावती सादर केला. यामध्ये त्यांनी विलंबित एकतालात बडा ख्याल गात उपस्थितांना आपल्या लयकारीने भारावून टाकले. यानंतर त्यांनी द्रुत एक ताल आणि तीन तालात छोटा ख्याल व बंगाली भाषेतील बंदीश सादर केली. संत मीरा यांचे भजन गात त्यांनी समारोप केला. निसळ यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेल्या प्रसिद्ध तबलावादक अभिजित भट्टाचार्य, संवादिनी वादक सुधीर टेकाळे यांनी साथसंगत केली. यानंतर धारवाड हून आलेल्या पं. बी एस मठ यांच्या कन्या व शिष्या वीणा मठ यांचे व्हायोलिनवादन संपन्न झाले. वीणा यांनी यावेळी श्याम कल्याण वाजविला. त्यांना मल्लेश हुगर यांनी समर्पक तबलासाथ केली.



**पुणे** एरंडवणे येथील सेवा भवन सभागृहात 'पेहेल' या सांगीतिक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी गायक अमोल निसळ यांनी राग कलावती सादर केला.

# पाण्यावरून ग्रामीण विरोधी शहरी वादाला ठिणगी ?




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आणखी दहा ते बारा वर्षांत महापालिकेस शहरासाठी तब्बल ३३ टीएमसी पाण्याची गरज भासणार आहे. मात्र, धरणासाखळीतील धरणांची साठवणक्षमता मात्र तेवढीच असल्याने पाणी शहरात पिण्यासाठी द्यायचे, की शेती सिंचनाला, असा तिढा उभा राहणार आहे. परिणामी, वेळीच वाढीव पाण्याचे नियोजन, पाण्याची गळती आणि शेतीसाठी पाण्याचा योग्य वापर न झाल्यास पाणीप्रश्न पेटण्याची चिन्हे आहेत. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीतील पाण्यावरून पुढील काही वर्षांत ग्रामीण विरोधी शहरी, असा वाद पेटण्याची शक्यता आहे. धरणांची साठवण क्षमता मर्यादित असली, तरी गेल्या एक तपाच्या कालावधीत शहराची बेसुमार वाढ झाल्याने महापालिकेचा वार्षिक पाणी वापर ११ टीएमसी वरून थेट २१ टीएमसीवर गेला आहे.

दोन दशकांत वाढलेल्या लोकसंख्येमुळे महापालिकेचे क्षेत्रफळ राज्यात क्रमांक एकचे आहे. त्यामुळे शहरातील सर्वांना पाणी पुरविणे महापालिकेची जबाबदारी आहे. त्यातच हद्दीजवळील परिसराच्या पाणीपुरवठ्याची जबाबदारीही महापालिकेवर आहे. पालिकेची पुरवठा यंत्रणा जुनी असल्याने शहराला पाण्यातील ३० ते ३५ टक्के पाण्याची गळती होते.

कालव्यातून सिंचनासाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याचीही तेवढीच गळती आहे. त्यामुळे ती रोखणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी जिरवण्यासह पाणी साठवून पुन्हा वापरात आणण्यासाठी धरणांव्यतिरिक्त उपाययोजनाही करणे गरजेचे आहे.

### पुण्याच्या पाण्याची सद्यस्थिती

| | |
|---|---|
| खडकवासला धरणासाखळी क्षमता – | २९.५० टीएससी |
| ग्रामीण भागाची गरज – | १४ ते १५ टीएमसी |
| शहराला हवे असलेले पाणी – | २१ टीएमसी |
| पाण्याची गळती ग्रामीण व शहरी | ९ टीएमसी |
| बष्पीभवन – | २ टीएमसी |

# कलाग्राम प्रकल्प धूळखात

- उद्घाटनानंतर पाच महिने लोटले, तरी प्रकल्प सुरू नाही
- प्रकल्पाकरीता महापालिकेकडून सुमारे २२ कोटी खर्च

**पुणे :** सुमारे बावीस कोटी रुपये खर्च करून उभारलेल्या कलाग्राम प्रकल्पाकरीता महापालिका स्थेचा शोध घेत आहे. दरम्यान, उद्घाटनानंतरही पाच महिन्यांपासून प्रकल्प धूळखात पडून आहे. प्रकल्पाच्या मुळ उद्देशाला अनुसरुन हस्तकला व लोककलांना प्रोत्साहन देणारी संस्था मनपा प्रशासनाला मिळालेली नाही हे प्रमुख कारण आहे. २२ कोटी खर्च तरी प्रकल्प प्रतीक्षेत पुणेकरांना देशभरातील विविध राज्यांच्या लोककला व ग्रामीण कलासंस्कृती एकाच छताखाली पाहता यावी, तसेच हौशी व नवोदीत कलावंतांना आपली कला प्रदर्शित करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी पुणे महापालिकेने तब्बल २२ कोटी रुपये खर्च करुन सिंहगड रोड वरील पु. ल. देशपांडे उद्यानात कलाग्राम प्रकल्प साकारला आहे. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते प्रकल्पाचे उद्घाटनही करण्यात आले. परंतु, उदघाटन झाले तरी प्रकल्पाचा नागरीकांना उपयोग करुन घेता येत नाही.

- १) सिंहगड रस्त्यावरील पानमळ्याजवळ पुणे महापालिकेने जपानी शैली व मुगल शैलीचे तब्बल २७ एकर जागेवर पु. लं. देशपांडे उद्यान साकारण्यात आले आहे.
- २) याठिकाणी विविध राज्यांच्या लोककला व ग्रामीण कलासंस्कृतीस प्रोत्साहन देण्यासाठी साडेतीन एकर जागेवर कलाग्राम प्रकल्प साकारण्यात आले.
- ३) या कामाला स्थायी समितीने २०१८ मध्ये मंजुरी दिली होती. कासवगतीने काम सुरु असलेल्या या प्रकल्पाचे काम गेल्यावर्षी पूर्ण झाले.
- ४) विविध राज्यांच्या वस्तूंच्या विक्रींचे काऊंटर, दोन लायब्ररी, विविध राज्यांमधील खाद्यपदार्थ विक्री करणारे १२ स्टॉल, कार्यशाळांसाठी दोन खुले व्यासपीठ, बांबू व दगडांपासून तयार होणाऱ्या वस्तू व हस्तकलांची प्रात्यक्षिके पाहण्याची व्यवस्था, ॲपीथिएटर आदी सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

> "कलाग्राम प्रकल्प चालविण्यासाठी लवकरच संस्था नियुक्त करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली जाईल. प्रकल्पाच्या उद्देशानुसार काम करण्यासाठी हस्तकलांना प्रोत्साहन देणार्या संस्थेचा शोध सुरु आहे. याबाबत लवकरच पुढील कार्यवाही केली जाईल."
> **- पृथ्वीराज बी. पी.** अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

### उद्देश

- अद्याप हा प्रकल्प सुरु झालेला नाही. प्रकल्पाची सद्य:स्थिती पाहता, महापालिका प्रशासनाने प्रकल्पाच्या बंद असलेल्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक तैनात करण्यापलिकडे काहीही केले नाही. प्रकल्पाच्या उद्देशानुसार प्रकल्प चालविण्यासाठी बांबू व दगडांपासून बनविलेल्या वस्तू व हस्तकलांना प्रोत्साहन देणारी एखादी संस्था महापालिका प्रशासनाला अद्याप मिळालेली नाही.

### प्रकल्पाच्या जागी दारूच्या ओल्या पार्ट्या

- दारू पार्ट्या रंगत असल्याचे चित्र पाहायला मिळते. प्रकल्पामध्ये दोन ठिकाणी दारू, बिअरच्या मोकळ्या बाटल्या व सिगारेटची पाकिटे पडलेली आहेत. प्रकल्पाच्या दोन्ही गेटवर चोवीस तास सुरक्षा रक्षकांची नेमणूक असताना आतमध्ये दारूच्या ओल्या पार्ट्या चालतात कशा



### असे आहे कलाग्राम ...

- - कलाग्रामचा परिसर आणि बांधकाम एखाद्या गावातील वास्तूप्रमाणे आहे.
- - या ठिकाणी ३० गाळे
- - एक ओपन ॲम्पी थिएटर
- - विविध राज्यांच्या वस्तूंच्या विक्रींचे काऊंटर
- - दोन लायब्ररी
- - विविध राज्यांमधील खाद्यपदार्थ विक्री करणारे १२ स्टॉल
- - कार्यशाळांसाठी दोन खुले व्यासपीठ
- - बांबू व दगडांपासून तयार होणाऱ्या वस्तू व हस्तकलांची प्रात्यक्षिके पाहण्याची व्यवस्था.




## 'रंगयात्रा' मोबाईल अ‍ॅप वादाच्या भोवऱ्यात

**पुणे :** शहरातील थिएटर आणि सांस्कृतिक केंद्रांमध्ये ऑनलाइन बुकिंगसाठी 'रंगयात्रा' हे अ‍ॅप महापालिकेने सुरु केले आहे. परंतु हे मोबाईल अ‍ॅप वादात सापडले असून याला नाट्यकलाकारांनी विरोध करत निषेध केला होता. परंतु या अ‍ॅपच्या माध्यमातून कोणत्याही व्यक्तीला केवळ नाट्यगृहे बुकींग करण्याची सोय व्हावी म्हणून उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

रंगयात्रा अ‍ॅपची माहिती महापालिकेने प्रसिध्द केल्यानंतर नाट्य कलाकारांनी महापालिकेच्या विरोधात रविवारी (दि. १६) बालगंधर्व रंगमंदिरसमोर या अ‍ॅपचा जोरदार निषेध केला आणि ते रद्द करण्याची मागणी केली होती. यावेळी नाट्य व्यवस्थापक, निर्माते, अभिनेते, निर्मिती डिझायनर्स आणि व्यवस्थापकांसाठी अ‍ॅपद्वारे ऑनलाइन बुकिंग करणे अव्यवहार्य ठरेल, असा दावा आंदोलकांनी केला होता. या निषेधात ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले, भाग्यश्री देसाई आदींनी सहभाग घेतला होता. या आंदोलनानंतर महापालिका नेमकी काय भुमिका घेणार याकडे लक्ष लागले होते. परंतु हे अ‍ॅप आल्यानंतर नाट्यकलांकारांशी चर्चा करुन त्यांचे समाधान झाल्यानंतरच पुढील कार्यवाही केली जाईल.



## जल सुरक्षामध्ये हायड्रॉलिक संरचना महत्त्वाची : एम.के.वर्मा

**पुणे :** जल सुरक्षा सुनिश्चित करण्यात हायड्रॉलिक संरचना महत्त्वाची भूमिका बजावतात. मॉडेलिंग तंत्रांचा वापर करून जल सुरक्षेसाठी अधिक कार्यक्षम प्रणाली डिझाइन करण्यास मदत होते, असे मत सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन (सीडब्ल्यूपीआरएस), पुणे एम. के. वर्मा, शास्त्रज्ञ, डी यांनी व्यक्त केले.

जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, पुणे येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग आयसीआय आणि फोटोग्राफी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक जल दिनानिमत्त "मॉडेलिंग तंत्रांद्वारे जल संरचना आणि महत्त्वपूर्ण कामगिरी" या विषयावर तज्ज्ञ सत्रात प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते. यावेळी रायसोनी महाविद्यालयाचे पुणे येथील कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर. डी. खराडकर, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. एस. जी. बान आणि डॉ. ए. जी. डहाके आदी उपस्थित होते.

## रस्त्यांच्या वहन क्षमता वाढीला प्राधान्य

**पुणे :** शहरातील वाहतुकीची गती वाढविण्यासाठी पुढील टप्प्यात रस्त्यांची वहन क्षमता (कॅरिंग कपॅसिटी) वाढविण्याला प्राधान्य देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच, रस्त्यांचा पूर्णत: वापर वाहतुकीसाठीच व्हावा, या दृष्टीनेही नियोजनाला सुरुवात झाली आहे. वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आणि वाहतूक पोलिसांकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्यामुळे काही भागातील वाहतुकीची गतीही वाढली आहे. त्यानंतर पुढच्या टप्प्यातील उपाययोजना नियोजित आहेत. त्याबाबतची माहिती महापालिका आयुक्त, प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. रस्त्यांची दुरुस्ती झाल्याने वाहतुकीचा वेग वाढला आहे. यापूर्वी पर्यायी रस्त्यांचा, गल्लीबोळांचा वापर होत होता. मात्र, आता वाहनचालकांकडून मुख्य रस्त्यांवरून प्रवास करण्यास प्राधान्य दिले जात आहे. ही बाब 'एटीएमएस' यंत्रणेच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. खासगी ट्रॅव्हल कंपन्यांना शहरातील मार्ग आणि पार्किंग उपलब्ध करून दिल्याने बस रस्त्यांवर थांबून होणारी कोंडीही कमी झाली आहे.

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पीएमपीचे बसथांबे स्थलांतरित करण्यात येत असून, आतापर्यंत ११ बसथांबे स्थलांतरित करण्यात आले आहेत. त्यामुळे पुढील टप्प्यात रस्त्यांच्या कडेला असलेली पार्किंगची जागाही कमी केली जाणार असून, प्रमुख रस्त्यांवर रिक्षा आणि थांब्यांनाही बंदी घालण्यात येणार आहे. बसथांब्यासमोवर उभ्या राहणाऱ्या रिक्षांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे, असे डॉ. भोसले यांनी सांगितले.

# दोन प्रकल्पांसाठी एकत्रित रस्ते खोदाई

## पालिकेचे आर्थिक नुकसान टळणार



> रस्ते कमीत कमी खोदावे लागावे यासाठी मशिने रस्ते कट करून केबल टाकण्यात यावी, अशी सुचना संबंधितांना केली आहे. त्याचप्रमाणे रस्ते न खोदता टनेल पद्धतीने केबल टाकता येतील का ? याचा विचार करावा अशा सुचना केल्या आहेत."
> **-पृथ्वीराज बी. पी.,** अतिरिक्त आयुक्त



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी ) व पुणे सिटी सर्व्हेलन्स (पीसीएस) या दोन्ही प्रकल्पांसाठी कमीत कमी रस्ते खोदाई करावी लागेल, यादृष्टीने महापालिका प्रशासनाने प्रयत्न सुरु केले आहे. या दोन्ही योजनांसाठी साधारपणे २३० किलो मीटर अंतर इतकी एकत्रित खोदाई केली जाईल. तसेच पदपथ, डिव्हायर (रस्ता दुभाजक ) या ठिकाणी केबल टाकण्याचे नियोजन आहे, त्यामुळे रस्ते खोदाई कमी होईल असा दावा प्रशासनाने केला आहे.

महाप्रीत या संस्थेमार्फत आयसीसीसी प्रकल्पासाठी पुणे शहरातील पाचशे किलोमीटर डाटा केबल टाकण्यात येणार आहे. महापालिकेने केलेल्या करारानुसार खोदाई केलेले रस्ते दुरुस्त करण्याची जबाबदारी ही महाप्रीत या संस्थेवरच आहे, त्यामुळे महापालिकेला पैसा खर्च करावा लागणार नाही असा दावा अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी केला.

मंगळवारी अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी पुणे पोलीस व महाप्रीतच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेतली. यावेळी महापालिकेच्या पथ विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर उपस्थित होते. या बैठकीत खोदाईच्या संदर्भात चर्चा झाली. त्याविषयी अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी माहीती दिली. ते म्हणाले, " या दोन्ही प्रकल्पांसाठी केबल टाकण्यासाठी रस्ते खोदाई केली जाणार आहे. यामध्ये २३० किलोमीटर अंतरात वेगवेगळी खोदाई करावी लागणार नाही. तेथे एकत्रितच या दोन्ही प्रकल्पाच्या केबल टाकल्या जाणार आहेत.

तसेच पुणे महापालिकेच्या पथ विभागाकडून आदर्श रस्त्यांची 'मिशन १७' या दुसऱ्या टप्प्याचे काम केले जाणार आहे. यामध्ये साधारणपणे ८० किमी रस्त्यांची दुरुस्ती होईल. ही दुरुस्ती करण्यापुर्वी या रस्त्यांवर केबल टाकुन घेतल्या जातील. तसेच या दोन्ही प्रकल्पासाठी काही भागांत पदपथ, दुभाजकाच्या ठिकाणी केबल टाकण्याचे नियोजन आहे. हे अंतर किती असेल याची माहीती महाप्रीत व पुणे पोलिसांकडून मागविली आहे. त्यामुळे रस्त्यांची खोदाई कमी प्रमाणात करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहे." महाप्रीत बरोबर झालेल्या करारानुसार तेच खोदाईनंतर रस्ते दुरुस्त करून देणार आहे, त्यामुळे त्यांना शुल्क माफ करण्याचा विषय येत नाही. पालिकेचे यामुळे आर्थिक नुकसान होणार नाही. मात्र, खोदाईनंतर केल्या जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या दर्जाविषयी काळजी घ्यावी लागेल, असेही त्यांनी नमूद केले. या दोन्ही प्रकल्पासाठी संयुक्तपणे केल्या जाणाऱ्या खोदाईशिवाय इतर भागात कराव्या लागणाऱ्या खोदाईनंतर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या निधीची मागणी राज्य सरकारकडे केली जाईल, असेही अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी नमूद केले.

# 'झेडपी'च्या मुख्यालयात पैशांचा पाऊस

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जिल्हा परिषदेचे एक नवे प्रकरण समोर आले आहे. नुकताच एका ग्रामपंचायत कर्मचाऱ्याने जिल्हा परिषदेच्या नोकर भरतीत अन्याय केल्याचा आरोप करत मुख्य प्रवेशद्वारासमोरील आतील बाजूस नोटा उधळल्या. तसेच या कर्मचाऱ्याने स्वत:च्या गळ्यातही नोटांचा हार घातल्याने एकच खळबळ उडाली. बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना लाच स्वीकारताना पकडल्याची घटना ताजी असतानाच आता हा आणखी एक प्रकार समोर आला आहे.

मावळ तालुक्यातील खडकाळा ग्रामपंचायतीचा हा कर्मचारी असून, अनिल सिरसाट असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. जिल्हा परिषदेच्या नोकर भरतीत एकूण रिक्त जागांपैकी १० टक्के जागा या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी राखीव असतात. या राखीव जागा सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येतात. यानुसार या कर्मचाऱ्याचा सेवा ज्येष्ठता यादीत ३४ वा क्रमांक आहे. मात्र, या नोकर भरतीत सन २०२१-२२ या नोकर भरती वर्षात अन्याय झाल्याचा आरोप करत सिरसाट यांनी जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये नोटा उधळल्या. या घटनेमुळे जिल्हा परिषदेमध्ये एकच खळबळ उडाली. नोटा उधळल्यानंतर काही काळ सिरसाट हे आंदोलनस्थळी ठाण मांडून बसले होते. दरम्यान, दुपारी पोलिसांनी त्यांना उधळलेल्या नोटांसह ताब्यात घेतले.



> खडकाळा ग्रामपंचायतीचे कर्मचारी अनिल सिरसाट यांनी सन २०२१-२२ या नोकर भरती वर्षात ग्रामपंचायत कर्मचारी कोट्यातून भरल्या जाणाऱ्या भरतीत त्यांच्यावर अन्याय झाल्याचा दावा केला आहे. यासाठी त्यांनी अनेक वेळा आंदोलन केले आहे. शिवाय या मागणीसाठी त्यांनी मंत्रालयातही आंदोलन केले आहे. त्यांच्यावर मंत्रालयातील आंदोलनाचा गुन्हा दाखल झालेला आहे. नियम डावलून नोकर भरती करता येत नाही. मात्र, अपात्र असूनही नियुक्ती मिळण्यासाठी दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.
> — **विजयसिंह नलवडे,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद

# पुण्यात सर्वात मोठे ग्लोबल एज्युकेशन फेअर

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** स्टडी स्मार्टच्या वतीने ग्लोबल एजुकेशन फेअर चे आयोजन करण्यात आले आहे. या फेअर मध्ये विद्यार्थ्यांसाठी एक अनोखी आणि अमूल्य संधी असेल. हा फेअर विशेषतः त्या विद्यार्थ्यांसाठी आहे जे विदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहतात, पण विश्वविद्यालयाची निवड, प्रवेश प्रक्रिया, छात्रवृत्त्या, आर्थिक व्यवस्थापन, निवास व्यवस्था आणि इतर अनेक आव्हानांच्या बाबतीत अडचणींचा सामना करतात. अशी माहिती स्टडी स्मार्टचे संचालक चेतन जैन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा फेअर पुण्याच्या 'पोचा हॉल', बोट क्लब येथे ५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ ते सायं ५ वाजेपर्यंत आयोजित होईल, आणि विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी प्रवेश




पूर्णपणे मोफत असेल. स्टडी स्मार्टचे मॅनेजिंग डायरेक्टर, चेतन जैन म्हणाले "आजकाल अनेक विद्यार्थी 12वी किंवा ग्रॅज्युएशनच्या नंतर विदेशात उच्च शिक्षण घेण्याचे स्वप्न पाहतात. मात्र त्यांना योग्य मार्गदर्शन, माहिती आणि तज्ञांचा सल्ला न मिळाल्यामुळे ते या मार्गात अडचणींचा सामना करतात." याशिवाय, फेअरमध्ये विविध इंटरएक्टिव्ह कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.हा ग्लोबल एजुकेशन फेअर विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षण घेण्याच्या स्वप्नाला आकार देण्याची एक उत्तम संधी प्रदान करणार आहे असेही चेतन जैन यांनी सांगितले.

### देशांतील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांचा समावेश

- या फेअरमध्ये जगभरातील ५० हून अधिक नामांकित विश्वविद्यालयांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यामध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, जर्मनी, दुबई आणि इतर देशांतील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था समाविष्ट आहेत. विद्यार्थी या प्रतिनिधींशी थेट संवाद साधू शकतात, योग्य अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, करिअरचे मार्गदर्शन, आणि विविध महत्त्वाच्या संधींबद्दल माहिती मिळवू शकतात.

# ठाकरे गटाने शिंदे गटाला डिवचलं

## अलका टॉकीज चौकात ठाकरे गटाकडून बॅनरबाजी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** प्रसिद्ध कॉमेडिअन कुणाल कामरा याने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे एका गाण्याच्या साहाय्याने विडंबन केलं. या गाण्यात कामाराने शिंदेंचा उल्लेख गद्दार असा केला. हे गाणं सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेचे पदाधिकारी कुणाल सरमळकर आणि राहुल कनाल यांनी खार येथील हॅबिटेट क्लबमध्ये जाऊन तोडफोड केली.

तर या प्रकरणावरुन मागील तीन दिवसांपासून शिंदे आणि ठाकरे गटातील नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप होत असल्याचं पाहायला मिळत आहे.




या सर्व घडामोडींदरम्यान पुण्यातील अलका टॉकीज चौकात ठाकरे गटाकडून ठाणे, रिक्षा, चष्मा, दाढी, गुवाहाटी आणि गद्दार या शब्दांना महाराष्ट्रात बंदी आहे का...? असा सवाल करत बॅनर लावण्यात आलं आहे. या बॅनरबाजीच्या माध्यमातून ठाकरे गटाकडून शिंदे गटाला डिवचण्यात आल्याचे साफ दिसत आहे. आता यावर शिंदे गटाकडून नेमकी काय प्रतिक्रिया येते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दरम्यान, पुण्यात ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी लावलेलं बॅनर काढण्यात आले आहे.

# स्टार्टअप्सच्या माध्यमातून भारत महासत्ता बनेल : डॉ. पंकज जैन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** "अभिनव कल्पना, नवनिर्मिती, प्रतिभा, चौकटीबाहेरील विचार यांची सांगड ही यशस्वी स्टार्टअप होण्यासाठी महत्वाची आहे. यातूनच भारत भविष्यातील महासत्ता बनेल. जगामध्ये भारतीय बाजारपेठ खूप मोठी असल्याने येथे लाखो स्टार्टअप सुरू होण्याची गरज आहे." असे विचार डॉ. पंकज जैन यांनी व्यक्त केले.

इनोव्हेशन, इन्क्युबेशन आणि इनव्हेंशनची संस्कृती वाढविण्याच्या दृष्टिने एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे ले छलांग 'हॅक एमआयटी-डब्ल्यूपीयू' २०२५ तीन दिवसीय स्पर्धांचे उद्घाटन युनिव्हर्सिटीच्या स्वामी विवेकानंद सभागृहात झाले.

यावेळी ब्लू ओशन स्टील्सचे सीईओ डॉ. पंकज जैन, नॉर्दर्न ट्रस्ट कॉर्पोरेशन टेक्नॉलॉजी इन्फ्रास्ट्रक्चर, यूएसएचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजेश कोरडे आणि ॲसेंच्यूअर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक भूपेश गहरोत्रा हे पाहुणे उपस्थित होते. तसेच, एमआयटी टीबीआयचे संचालक प्रा. प्रकाश जोशी, एमआयटी डब्ल्यूपीयूचे



कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, प्र-कुलगुरू व कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. मिलिंद पांडे, डॉ. कृष्णा व्हाडे, डॉ. कृष्णप्रसाद गुणाले, डॉ. अंजली साने, डॉ. मंगेश बेडेकर, डॉ.अक्षय मल्होत्रा व डॉ. सिद्धार्थ चक्रवर्ती उपस्थित होते.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात आणि एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेवर आधारित ले छलांग 'हॅक एमआयटी-डब्ल्यूपीयू' २०२५ या स्टार्टअप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राजेश कोरडे म्हणाले," युवकांमध्ये असलेल्या उर्जेचा उपयोग स्टार्टअपमध्ये परिवर्तन करण्यासाठी करावा. विद्यार्थ्यांनी सहकार्याची भावना ठेऊन नव कल्पनांना भरारी दयावी.

भूपेश गहरोत्रा म्हणाले,"देशातील सर्व समस्यांवरील समाधान शोधण्याचे एकमेव साधन म्हणजे हॅकेथॉन होय. तसेच विद्यार्थ्यांनी अपयशातून शिकत राहावे.

प्रा.प्रकाश जोशी म्हणाले," स्टार्टअपमधून उद्याचा भारत सक्षम होऊ शकतो. अशावेळी आम्ही कोणतेही स्टार्टअप उभे करण्यासाठी टीबीआयच्या माध्यमातून सर्वतोपरी कार्यरत आहोत. आंत्रप्रेन्युअरशीपसाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे."

डॉ.आर.एम.चिटणीस म्हणाले,"हॅकएमआयटी-डब्ल्यूपीयू मधून नवे उद्योजक निर्माण होऊन देश प्रगतीपथावर जाईल. सृजनात्मकता समोर येऊन विद्यार्थी स्टार्टअप सुरू करू शकतील.

डॉ. मिलिंद पांडे म्हणाले," रोजगार, ऊर्जा आणि पर्यावरण या जागतिक समस्या केवळ आंत्रप्रेन्युअरशिपच्या माध्यमातून सोडविता येईल. तसेच महिला उद्योजकांची वृद्धि होण्यासाठी एमआयटी टीबीआय अधिक प्रयत्नशील आहे.

> विद्यार्थ्यांमध्ये अद्वितीय गुण असतात, जे त्यांना उत्तम उद्योजक बनवू शकतात, ते चौकटीबाहेर विचार करू शकतात, नवीन परिस्थितींशी लवकर जुळवून घेतात. तंत्रज्ञानावरील त्यांचे प्रेम त्यांना उद्योन्मुख ट्रेंड ओळखण्यास व त्यांचा फायदा घेण्यास मदत करते. याच गोष्टींच्या आधारावर स्टार्टअपच्या माध्यमातून देश महासत्ता बनेल."
> **— डॉ. पंकज जैन,**

# बिल भरा नाहीतर बत्ती गुल !

## ऐन उन्हाळ्यात पुण्यातील २९००० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित
## वीज बिल थकवणाऱ्या ग्राहकांवर महावितरणची मोठी कारवाई


**पुणे :** वीज बिल न भरलेल्या पुणेकरांनो सावधान ! पुणे विभाग गेल्या २५ दिवसात तब्बल २९ हजार जणांचा वीजपुरवठा वीज बिल न भरल्यामुळे खंडित करण्यात आला आहे. पुणे विभागाच्या महावितरण विभागाने थकबाकी वसूल करण्यासाठी आता वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू केली आहे. घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीजग्राहकांकडे ८८ कोटी ४५ लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी आहे. महावितरणची आर्थिक मदार ग्राहकांकडील वीजबिलांच्या दरमहा वसुलीवर असल्यामुळे आता विभागाने थकबाकी वसूल करण्यासाठी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम तीव्र केली आहे.

परिमंडलातील विविध ठिकाणी दौरे करून शाखा कार्यालयांपर्यंत थकबाकी वसुलीचा आढावा घेण्यात येतो आहे. कारवाई टाळण्यासाठी ग्राहकांनी लवकरात लवकर त्यांचे लाईट बिल असे आवाहन महावितरण विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी केलं आहे. गेल्या अनेक दिवसांपासून महावितरण विभागाने वीज बिल न भरलेल्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. यामध्ये पुणे विभागातील शहरासह ग्रामीण भागातील अनेक गावांचा सुद्धा समावेश आहे.



'संपूर्ण पुणे विभागात महावितरण विभागाची कारवाई सुरू आहे. यामध्ये शहरासह पिंपरी चिंचवड यासह ग्रामीण भागात सुद्धा कारवाई सुरू आहे. जे नागरिक त्यांच्या घराचे किंवा आस्थापनाचे वीज बिल भरत नाहीत त्यांचा वीज पुरवठा आमच्या कर्मचाऱ्यांकडून खंडित करण्यात येत आहे.

**- राजेंद्र पवार**, मुख्य अभियंता, महावितरण विभाग



- १ ) 'वीजग्राहकांना बिलांचा घरबसल्या भरणा करण्यासाठी विभागाची वेबसाइट व मोबाइल ॲपद्वारे ऑनलाइन सोय उपलब्ध आहे.
- २) वीजग्राहकांनी थकबाकीचा त्वरित भरणा करावा', असे आवाहन पवार यांनी केले आहे.
- ३) पुणे शहरातील वीजग्राहकांकडे ४० कोटी ९ लाख रुपयांची थकबाकी आहे.
- ४) गेल्या २४ दिवसांमध्ये १० हजार १७७ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.
- ५) पिंपरी-चिंचवड शहरात घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे १८ कोटी ४० लाख रुपयांची थकबाकी आहे.
- ६) त्यातील ७ हजार ७९६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.
- (७) महावितरण विभागाकडून ग्रामीण भागातील आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, राजगड, हवेली याभागात सुद्धा कारवाई करण्यात आली आहे.

## पालिकेत डांबर खरेदी घोटाळा झाल्याचा आरोप

**पुणे :** पालिकेत डांबर खरेदी घोटाळा झाल्याचा आरोप माजी नगरसेवक निलेश निकम यांनी केला आहे. थेट कंपनीकडून डांबर खरेदी न केल्याने कोट्यावधी रुपयांचा चुराडा झाल्याचे त्यांनी नमूद केले. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेल्या 'ॲप'मुळे सदर ठेकेदार नेमका कोणाला डांबर पुरवठा करतो याविषयी शंका निर्माण झाल्याचा दावा निकम यांनी केला. पुर्वी पालिका रस्त्यांच्या कामासाठी थेट पेट्रोल उत्पादक कंपन्यांकडून डांबर खरेदी करीत होते. त्यामुळे पालिकेला प्रति टनामागे साडे सहा हजार ते सात हजार रुपये सवलत मिळत होती. गेल्या तीन वर्षापासून पालिकेकडून थेट कंपनीकडून केली जाणारी डांबर खरेदी बंद केली गेली. तीन वर्षापुर्वी पालिकेने डांबर खरेदीसाठी निविदा प्रक्रीया राबविली होती. त्यानंतर दरवर्षी ही निविदा काढली जात आहे. प्रत्यक्षात पुरवठादार ठेकेदाराची कंपनी या निविदेत पात्र ठरेल अशा अटी या निविदा प्रक्रीयेत टाकण्यात आल्याचा दावा निकम यांनी केला. पेट्रोल उत्पादक कंपन्या या सरकारी असल्याने त्यांच्याकडून डांबर खरेदीत 'कमिशन' मिळत नसल्याने पालिका प्रशासनाकडून ठेकेदारामार्फत डांबर खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे, असा आरोप केला आहे.




## समर्थ भारताच्या निकषांवरील खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन

**पुणे :** आदर्श व समर्थ भारताचे निकष काय असावेत? या विषयावर सर्व स्तरातील नागरिकांसाठी खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन भांडारकर संस्था आणि कौशलम न्यास यांच्या वतीने केले असल्याची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष भूपाल पटवर्धन आणि उपक्रमाच्या प्रमुख लीना मेहेंदळे यांनी दिली. लीना मेहेंदळे यांनी सांगितले, आज भारताच्या विकासाची चर्चा सर्व जगभर सुरु आहे. विकसित राष्ट्र होण्याकडे भारताचा प्रवास सुरु असतांना आपला देश आदर्श आणि समर्थ देखील झाला पाहिजे व हा भारतीयांच्या प्रयत्नाशिवाय होऊ शकत नाही. त्यादृष्टीने २०४७ पर्यंतच्या वाटचालीचे नियोजन, संकल्प व खास करून आपले निकष काय असतील, याची चर्चा सुरू झाली पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होत असतांनाचे चित्रण कोणत्या निकषातून करणार आहोत याचे मंथन निबंध स्पर्धेमधून दिसावे अशी भावना आहे. मराठी, हिंदी, गुजराथी, तेलुगु आणि कोकणी अशा ५ भाषांमध्ये होत असलेल्या या निबंध स्पर्धेसाठी सर्वसमान्य नागरिकांनी ३ हजार शब्दात, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी २ हजार पाचशे शब्दात आणि शालेय विद्यार्थ्यांनी बाराशे शब्दात निबंध लिहायचा आहे. दि. १५ मे २०२५ पर्यंत फेसबुक ग्रुपच्या लिंकवर https://www.facebook.com/groups/511254721726919 निःशुल्क नोंदणी करता येणार आहे.

## 'सीओईपी'मध्ये चेअर प्रोफेसरशिप

**पुणे :** शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याच्या हेतूने सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने आयआयटीच्या धर्तीवर 'चेअर प्रोफेसरशिप' ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. सीओईपीच्या इतिहासात पहिल्यांदाच हा प्रयोग करण्यात येत असून, ज्येष्ठ उद्योजक, नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांनी 'चेअर प्रोफेसरशिप'साठी एक कोटी रुपयांची देणगी सीओईपीला दिली आहे. या माध्यमातून येत्या शैक्षणिक वर्षात 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस अँड मशिन लर्निंग अँड रिलेटेड एरियाज' या विषयाची चेअर प्रोफेसरशिप सुरू करण्यात येणार आहे.



## गुढीपाडव्याला 'सुरेल पहाट'

**पुणे :** गीत-संगीताने नटलेल्या 'सुरेल पहाट' या सांगीतिक मैफलीने गुढीपाडव्याची प्रसन्न सुरुवात होणार आहे. येत्या रविवारी (ता. ३०) पहाटे ६ वाजता कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पुणेकरांना ही पर्वणी अनुभवता येणार आहे. पद्मश्री सुरेश वाडकर, पंडित रघुनंदन पणशीकर व गायिका मनीषा निश्चल यांच्या स्वरांचा नजराणा पेश होणार आहे.

गेट सेट गो हॉलिडेज, पूना गेस्ट हाऊस यांच्या वतीने मनीषा निश्चल्स महक प्रस्तुत 'सुरेल पहाट'चे आयोजन केले आहे. विघ्नेश जोशी यांचे ओघवते निवेदन, तर अमर ओक, सत्यजित प्रभू, डॉ. राजेंद्र दूरकर, अभिजित भदे आणि विनायक नेटके यांच्या वाद्यांवर साथसंगत असणार आहे.

## नंदा गुलाब गोळे यांचे निधन

**पुणे :** पौडफाटा केळेवाडी येथील रहिवासी कै. नंदा गुलाब गोळे (वय ६५ वर्षे) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचे नळस्टॉप विभागाचे सभासद सोपान कुडले यांच्या त्या मामी होत.



# विंटेज व क्लासिक कार्स दुर्मिळ प्रदर्शन

शनिवार दि. २९ व रविवार दि. ३० मार्च रोजी

पेबल्स बीच यूएसए विजेता एल्विसची 1933, शेखर सावडेकर यांची जुनी कार 1919 ओव्हर लँड, 1956 ची डॉज, १९३८ ची सर्वात जुनी मोटारसायकल नॉर्टन 500, ऑस्टिन 7 इत्यादी प्रदर्शित केले जातील. रोल्स रॉईस, बेंटली, मर्सिडीज बेंझ, शेवरलेट, मॉरिस कन्वर्टिबल, ऑस्टिन, फोर्ड व इतर फॉरेन कार्स यांचा यात समावेश आहे.

**-नितीन डोसा आणि सुभाष सणस,**





■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** मागील शतकातील दुर्मिळ व नामवंत व्यक्तींनी वापरलेल्या विंटेज अँड क्लासिक कार्स यांचे अनोखे प्रदर्शन 'विंटेज अँड क्लासिक कार/ मोटर सायकल एनवल फिएस्टा २०२५' याचे प्रदर्शन पुण्यात शनिवार दि. २९ व रविवार दि. ३० मार्च २०२५ या दोन दिवशी रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब, पुणे येथे आयोजन करण्यात आले आहे.

या भव्य सोहळ्यात पुण्याच्या समृद्ध ऑटोमोटिव्ह वारशाचा अद्वितीय उत्सव साजरा केला जाणार आहे. शनिवारी दि. २९ रोजी सकाळी १० वाजता या प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन होईल. हे प्रदर्शन दुर्मिळ आणि ऐतिहासिक वाहनांची अनोखी झलक सादर करणार असून, नागरिकांसाठी शनिवारी व रविवारी या दिवशी हे प्रदर्शन विनामुल्य खुले असणार आहे अशी माहिती विंटेज अँड क्लासिक कार क्लब ऑफ इंडियाचे चेअरमन नितीन डोसा (मुंबई) यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे आयोजन वाहन इतिहास आणि भव्यतेचे अप्रतिम दर्शन घडवणारे ठरणार आहे.

### प्रदर्शनातील वैशिष्ट्ये

- पुण्याचे पहिले महापौर कै. बाबुराव सणस यांच्या स्मृतीप्रित्यर्थ या प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट व्हिंटेज कारला विशेष ट्रॉफी देण्यात येणार आहे.
- - प्रदर्शनात १०० दुर्मिळ आणि अमूल्य विंटेज व क्लासिक कार्स तसेच १०० विंटेज स्कूटर्स आणि मोटरसायकल्स यांचा सहभाग
- - वाहनप्रेमी आणि संग्राहकांसाठी हे प्रदर्शन ऐतिहासिक ऑटोमोटिव्ह कारागिरीचा अभूतपूर्व अनुभव देणारे ठरणार
- - केवळ पुण्यातूनच नव्हे, तर मुंबईतील विंटेज कार्सचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद
- - प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे बॉलिवूड आणि हॉलिवूडमधील नामांकित व्यक्तींनी वापरलेल्या विंटेज आणि क्लासिक गाड्यांचा अप्रतिम संग्रह
- - मुंबईचे अब्बास जसदानवाला यांची भारतातील सर्वात जुनी धावणारी १९०३ ची कार हंबर ही विशेष आकर्षण

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सर्वंकष धोरण


■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** शहरातील गृहसंकुले, मोठ्या गृहप्रकल्पांमध्ये उभारण्यात आलेल्या सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर बंद ठेवले जात असल्याने आता गृहप्रकल्पातील एसटीपी प्रकल्पांसाठी सर्वंकष धोरण तयार केले जाणार आहे. तसेच, सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहेत की नाही, यावरही ऑनलाइन पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे.

शंभरहून अधिक सदनिका असलेल्या मोठ्या गृहप्रकल्पात सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. त्यानुसार सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारले जातात. मात्र, ते केवळ बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळेपर्यंतच सुरू ठेवले जातात. त्यानंतर प्रकल्प बंद ठेवले जात असल्याने महापालिकेच्या सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्पांवरील ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भात बैठक घेतली. त्यामध्ये सोसायट्यांवर अंकुश ठेवण्यासाठी हे सर्वंकष धोरण आखण्याचे निश्चित करण्यात आले.

जायका प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महापालिकेच्या प्रक्रिया प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये वाढ होऊन प्रतिदिन साडेआठशे ते नऊशे एमएलडी एवढ्या पाण्यावर प्रक्रिया होईल.

शहरातील मोठी गृहसंकुले, गृहप्रकल्पांमधील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास प्रतिदिन ११० एमएलडी एवढ्या पाण्यावर प्रक्रिया करणे शक्य होणार आहे. त्यामुळे सोसायट्यांच्या आवारातील बंद सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांवर महापालिकेने लक्ष केंद्रित केले आहे.



सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प चालविण्यासाठी वार्षिक पंधरा ते वीस लाखांचा खर्च येतो. त्यामध्ये वीज देयके, देखभाल-दुरुस्तीचा खर्चाचा समावेश आहे. प्रक्रिया प्रकल्पामधील शुद्ध झालेले पाणी फ्लशसाठी वापरले जाते. हा प्रकल्प बंद असल्यास सोसायट्यांकडून नियमानुसार दंड आकारला जातो. सोसायट्यांमधील बंद प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्यासाठी लवकरच सर्वंकष धोरण तयार केले जाईल.

**-पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका**


## 'KSHITIJ 2K25' मध्ये क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचा एकत्रित संगम

**पुणे :** ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे ढोले पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आयोजित वार्षिक सामाजिक समारंभ "KSHITIJ 2K25" उत्साहात संपन्न झाला. एक आठवड्याचा हा समारंभ अत्यंत यशस्वी ठरला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनाचा एकत्रित संगमाचा अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांनी एकांकिका, काव्य वाचन, आणि गेमिंग अशा विविध सादरीकरणांमध्ये आपली प्रतिभा दाखवली. लुक-अलाइक डे, वादविवाद, पथनाट्य (स्ट्रिट प्ले) आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांनी कॉलेजच्या परिसरात उत्साह निर्माण केला. याशिवाय कला प्रदर्शन, हॅलोवीन डे सेलिब्रेशन, आणि एक रंगारंग फन फेअर मध्ये देखील विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.




# दिग्गजांच्या उपस्थितीत जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव संपन्न



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** दिग्गज आणि युवा कलाकारांच्या सादरीकरणाने नुकताच १९ वा पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव संपन्न झाला. आपला परिसर आणि तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे उद्घाटन माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडले. पं जितेंद्र अभिषेकी यांचे सुपुत्र आणि शिष्य पं शौनक अभिषेकी, आपला परिसरचे उज्वल केसकर, प्रवीण बढेकर, पं. हेमंत पेंडसे आदी मान्यवर उपस्थित होते. तर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत महोत्सवाचा समारोप झाला.

- **यावर्षीच्या पं जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचा समारोप प्रसिद्ध भजन सम्राट अनुप जलोटा यांच्या सादरीकरणाने झाला.**
- **प्रा. समीर दुबळे यांनी राग श्याम कल्याणने मध्ये 'आओ ना मोरे पिया...', 'पायल मोरी पायल, रे सजना...' या रचना पेश केल्या.**
- **प्रसिद्ध संतूर वादक, संगीतकार पं अभय रुस्तुम सोपोरी यांचे संतूर वादन रंगले. 'सोपोरी बाज'च्या सादरीकरणाने कार्यक्रम एका वेगळ्या उंचीवर गेला.**
- **पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'युवोन्मेष' या सत्रामध्ये युवा गायक करण देवगांवकर यांचे गायन, व्हायोलिनवादक अमन वरखेडकर यांचे वादन, गायिका श्रुती विश्वकर्मा मराठे, रागेश्री वैरागकर यांचे गायन, बंगळूरस्थित अनिरुद्ध ऐथल यांचे हिंदुस्थानी शैलीतील गायन, फारुखाबाद घराण्याचे आश्वासक युवा तबलावादक ईशान घोष यांचे एकल तबलावादन रंगले, रसिकांची पसंती मिळाली.**








## अण्णा जोगदंड यांना कै. बाळासाहेब भारदे समाजभूषण पुरस्कार

**पिंगळे गुरव :** येथे काव्यात्मा साहित्य परीषदे,पुणेच्या वतीने विविध क्षेत्रातील राज्यभरातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुस्तक, सन्मान चिन्ह ज्येष्ठ गझलकार म.भा.चव्हाण यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. परिवर्तनाच्या चळवळीचा धागा पकडून ज्येष्ठ गझलकार म.भा.चव्हाण जीवनाचा मुलमंत्र देताना म्हणाले की,"ज्यांना कुणीच नाहीत, मुले बाळे ही नाहीत, त्यांनी त्यांच्या वंशासाठी झाडे लावावीत म्हणजे आयुष्यात निराशा पदरी पडणार नाही असा मनोदय ज्येष्ठ गझलकार म.भा.चव्हाण यांनी पुरस्कार वितरणाच्या वेळी व्यक्त केला. वृक्ष स्वतःचं अन्न स्वतः तयार करतात यातून माणसांनी बोध घेणे गरजेचे आहे. परोपकाराचीभुमिका नेहमी घेतात स्वतः उन्हात राहून इतरांना सावली देतात तसे चांगल्या विचारांची माणसंच जिवनात प्रकाश निर्माण करतात यातून समाजाला दिशा मिळते असे पुरुषोत्तम सदाफुले यांनी अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले.

दहा टक्के राजकारण आणि नव्वद टक्के समाजकारण करणारे वृक्षमित्र अरुण पवार म्हणाले, "आयुष्याची किंमत करायची असेल तर वृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात केली पाहिजे तेव्हाच आयुष्याचा प्रवास अधिक प्रमाणात सुखकर होईल आणि माणसाला सुखाचा अनुभव कायम घेता येईल. आण्णा जोगदंड म्हणाले गांधीवादी विचारांचे शिक्षणतज्ञ, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष "पद्मभूषण कै.बाळासाहेब भारदे समाजभुषन" पुरस्कार दिल्यामुळे माझ्या वर सयोजकांनी पुरस्कार रुपी जी जबाबदारी दिली आहे ती गांधीवादी विचारांची जबाबदारी मी अधिक क्षमतेने पार पाडील असा विश्वास व्यक्त केला.

## पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांना हिंदु कुल भूषण पुरस्कार जाहीर



**निगडी :** हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचा रौप्य महोत्सव, शिवजयंती महोत्सवचे औचित्य साधून हिंदू स्वाभिमान दिवसानिमित्त जेष्ठ वक्ते पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांना "हिंदू कुलभूषण" पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, सचिव उत्तम दंडीमे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. आज गुरुवारी (दि. २७ मार्च) सायंकाळी ५:३० वाजता निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी "सनातन राष्ट्रवाद आणि आजचा युवा" या विषयावर पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ हे व्याख्यान देणार आहेत, तसेच राष्ट्रप्रहरी या रौप्य महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल हे भूषविणार आहेत, अशी माहिती शिवजयंती उत्सवाचे समन्वयक कैलास बारणे व खजिनदार दत्ता सूर्यवंशी यांनी दिली.

## क्षयरोग निर्मूलनासाठी पथनाट्यातून जनजागृती



**पिंपरी :** सर्वांनी निर्धार केल्यास आपण कोविडप्रमाणेच १०० दिवसात क्षयरोग घालवू शकतो. असे प्रतिपादन महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी येथे केले. यावेळी बीजे मेडिकल च्या विद्यार्थ्यांनी तसेच सिंधू नगर दवाखाना येथील आशा वर्कर यांनी क्षयरोग निर्मूलनासाठी जनजागृती पर पथनाट्य सादर केले. सध्या शहरातील ५५% लोक महापालिका रुग्णालयात सेवा घेतात. हा आकडा ८० टक्के पर्यंत नेण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. जागतिक क्षयरोग दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने ऑटो क्लस्टर सभागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. गोफणे बोलत होते. यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली डोणे, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर, शहर क्षयरोग नियंत्रण अधिकारी डॉ. बाळासाहेब होडगर, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. गोविंद नरके भोसरी रुग्णालयाच्या प्रमुख डॉ. ऋतुजा लोखंडे, डॉक्टर वैशाली भामरे, सारिका लोणकर, किशोर गवळी उपस्थित होते. यावेळी डॉक्टर गोफणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महापालिकेने वैद्यकीय क्षेत्रात एक नंबरचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी या नात्याने मी आदेश देत असलो तरी तुम्ही सारे जण अंमलबजावणी करता त्यामुळे शहरवासीयांना व रुग्णांना चांगली सेवा देता येते.

## पाण्याचे ३१२ नमुने पैकी ७९ पाणी नमुने दूषित

**पुणे :** आरोग्य विभागाने जीबीएसचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील पाण्याचे नमुने आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविले होते. शहर परिसरात जीबीएसचा उद्रेक झाल्याने पाण्याच्या नमुन्यांची रासायनिक आणि जैविक तपासणी राज्य आरोग्य प्रयोगशाळेने केली. प्रयोगशाळेने २१ जानेवारी ते १३ मार्च या कालावधीत एकूण ३१२ नमुन्यांची तपासणी केली. त्यातील ७९ पाणी नमुने दूषित आढळले असून, ते पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष प्रयोगशाळेने काढला आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांसह खडकवासला परिसरातील पाणी नमुन्यांचा समावेश आहे. या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

## वैज्ञानिक सफर



चिखली विद्यार्थ्यांनी भेटीदरम्यान रोबोटिक्स, अंतराळ विज्ञान, सौर ऊर्जा, बायोटेक्नॉलॉजी आणि नवनवीन संशोधन प्रकल्प याविषयी माहिती घेतली.

## गणेश शाळेच्या विद्यार्थ्यांनी केली वैज्ञानिक सफर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** एस एस पी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट या शिक्षण संस्थेच्या चिखली येथील गणेश इंटरनॅशनल स्कूल येथील इयत्ता दहावीच्या आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी सायन्स पार्कला भेट दिली. विद्यार्थ्यांनी विज्ञान क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान आणि प्रयोगशीलतेचा अनुभव घेण्यासाठी पुण्यातील प्रसिद्ध पिंपरी चिंचवड विज्ञान केंद्र, सायन्स पार्क येथे भेट दिली. या शैक्षणिक दौऱ्याचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाची व्यावहारिक माहिती मिळवून देणे होते.

विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोग पाहण्याचा आणि त्यामध्ये सहभाग घेण्याचा अनुभव घेतला. तसंच, थ्री-डी शो, इंटरॅक्टिव्ह सत्रे आणि सिम्युलेशन मॉडेल्स यांच्या साहाय्याने विज्ञान संकल्पना अधिक स्पष्ट झाल्या. नायट्रोजन शो, ऑटोमोबाईल्स, अंतराळ, त्रिकोण कोडी, पायथागोरस थेरॅम ॲप्लिकेशन, भौतिकशास्त्रातील विविध मॉडेल्स, उत्क्रांतीचे टप्पे, वैज्ञानिक उद्यान, आरशातील प्रतिमा असे विविध प्रयोग पाहिले.

# पालिकेची सर्व कार्यालये एकाच छताखाली

### प्रकल्प ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट



"महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा मिळतील. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या मदतीने ही इमारत केवळ प्रशासकीय केंद्रच नव्हे, तर शाश्वत विकासाचे प्रतीक ठरेल. नवीन प्रशासकीय इमारतीमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवांचा विस्तार अधिक सुलभ आणि गतिमान होईल. अत्याधुनिक सुविधा आणि एकाच ठिकाणी केंद्रीभूत कार्यालयांमुळे नागरीकांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा मिळतील. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा घडवेल.

**-विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त,



**प्रमुख वैशिष्ट्ये:**

- **इमारतीची रचना:** ६ ते १८ मजल्यांचे चार विंग, प्रत्येकी ३ तळघरे
- **सुविधा:** नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, ई-गव्हर्नन्स सेंटर, ग्रंथालय, क्लिनिक इत्यादी
- **महत्त्वाच्या सुविधा:**
- **वाचनालय :** १२५ चौरस मीटर
- **प्रदर्शन हॉल/संग्रहालय:** ३८० चौरस मीटर
- **बहुउद्देशीय हॉल:** ५७० चौरस मीटर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली असून, प्रकल्पाचे महत्त्वाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. जानेवारी २०२३ मध्ये सुरू झालेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा उद्देश महानगरपालिकेची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी केंद्रीभूत करणे, नागरी सेवा अधिक सुलभ करणे आणि प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे हा आहे. हा प्रकल्प ३६ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महापालिकेच्या नवीन इमारतीचे तळघरातील तीन मजले आणि तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम सध्या पूर्ण झाले आहे. पूर्णत्वास आल्यानंतर ही इमारत नागरी सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल, संग्रहालय, प्रदर्शन हॉल आणि ई-गव्हर्नन्स सेंटरसारख्या अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असणार आहे.

नवीन प्रशासकीय इमारत ८.६५ एकरच्या विस्तृत भूखंडावर उभी राहणार असून, एकूण ९१ हजार ४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रामध्ये विकसित केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३१२.२० कोटी खर्च अपेक्षित आहे.

शाश्वत विकासाच्या दृष्टीने ही इमारत इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंटसाठी ५ स्टार ग्रीन रेटिंग आणि आयजीबीसी प्लॅटिनम रेटिंग मिळवण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. सौरऊर्जा, पाणी पुनर्वापर प्रणाली आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवून ठेवण्यास देखील मदत मिळणार आहे.

## 'ई-ऑफिस' प्रणालीला १ एप्रिलचा मुहूर्त



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता व गतिमानता यावी, तसेच प्रशासनाचे कामकाज 'पेपरलेस' होण्यासाठी 'ई-ऑफीस प्रणाली' विकसित करण्यात आली. त्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण देखील करण्यात आले. मात्र, ही प्रणाली लागू करण्यासाठी पालिकचे सर्वच विभाग 'तारीख पे तारीख'चा खेळ खेळत आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने ही प्रणाली कार्यान्वित करण्याकरिता १ एप्रिलचा मुहूर्त शोधला आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय राजवटीत १ जानेवारी २०२५ पासून डिजिटल कारभार सुरू करण्यात येणार होता. मात्र, प्रत्यक्षात काही कारणास्तव २६ जानेवारी ही तारीख देण्यात आली. मात्र, त्यावेळी ही प्रणाली सुरू झाली नाही. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत ६ फेब्रुवारीला या डिजिटल कारभाराची सुरुवात करण्यात आली. त्या योजनेचे लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर, पालिकेच्या सर्व विभागांमध्ये फेब्रुवारी महिन्यात डिजिटल कामकाज सुरू होईल, अशी अपेक्षा होती. तांत्रिक कारणामुळे पुन्हा या प्रणालीच्या अंमलबजावणीत व्यत्यय आला. त्यामुळे प्रशासनाने १ एप्रिलचा मुहूर्त काढला आहे. या दिवशी प्रणालीत कामकाज सुरू करण्यासंदर्भात आश्वस्त करण्यात आले आहे.

**११२ कोटी रुपयांचा खर्च**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस एनेबल ईआरपी प्रकल्पाअंतर्गत ३३ संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत. प्रकल्पात मोठ्या प्रमाणात माहितीचे संकलन करण्यात आले आहे. महापालिकेच्या १ हजारपेक्षा अधिक प्रक्रियांवर बिझनेस प्रोसेस रि-इंजिनिअरींग करण्यात आले आहे. ई-ऑफिस कामकाजामुळे पेपरलेस कामकाज होऊन प्रशासकीय कामकाज सुलभ होईल. या कामासाठी ११२ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे.

## विधान भवनात नदी विकास प्रकल्पाला विरोध



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** पवना, मुळा, इंद्रायणी साठी...RFD च्या नावाखाली! वृक्षतोड थांबलीच पाहिजे !... या आशयाचे पोस्टर घेऊन आमदार अमित गोरखे यांनी प्रवेश केला. यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले पर्यावरण संरक्षणासाठी एकत्र येत, पिंपरी चिंचवड शहरातील ५०० हून अधिक सामाजिक संस्था या एकत्र येऊन संपूर्ण शहरभर मानवी साखळीद्वारे आंदोलन सुरू असून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नदी विकास प्रकल्पाला विरोध आमचा विरोध आहे. यावेळी "वृक्षतोड थांबलीच पाहिजे!", "आधी नद्या स्वच्छ करा!" आणि "नद्या वाचवू, निसर्ग टिकवू!" अशा यावेळी घोषणा देत त्यांनी नदीसंवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी बोलताना नद्यांचे नैसर्गिक स्वरूप अबाधित ठेवण्याची मागणी केली. पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांचे संवर्धन ३० लाखांहून अधिक नागरिकांसाठी महत्त्वाचे अधोरेखित केले. बांधकाम आणि कृत्रिम सौंदर्यीकरणाच्या नावाखाली वृक्षतोड, प्राण्या-पक्ष्यांचे अधिवास नष्ट करणे आणि पर्यावरणाला धोका निर्माण करणे हे मान्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या आंदोलनांना मुळे सर्वांचे लक्ष वेधले गेले..

# पंचेचाळीस वर्षांनंतर पुन्हा दहावीच्या वर्गात शाळेची घंटा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, दापोडी या शाळेच्या १९८० – ८१ या शैक्षणिक वर्षाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी रविवार, दिनांक २३ मार्च २०२५ रोजी आयोजित केलेल्या विद्यार्थी स्नेहमेळावा आणि शिक्षक सन्मान या कार्यक्रमाचे रूपांतर नकळत दहावीच्या वर्गात झाले आणि तत्कालीन शिक्षकांसह सर्व माजी विद्यार्थी तब्बल पंचेचाळीस वर्षांनंतर भूतकाळातील रम्य आठवणींमध्ये रममाण झाले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. शिवाजीराव मोहिते अध्यक्षस्थानी होते; तसेच



सुभाष कुलकर्णी, बाळकृष्ण घोरपडे, विजय दीक्षित, सुभाष गाडोते, विद्यमान प्राचार्य पी. डी. पाबळे, संस्था सचिव सुभाष जावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वामी विवेकानंद आणि संस्थापक जयवंत जगताप यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. राष्ट्रगीता नंतर भास्कर रिकामे यांनी शहीद दिनाचा थोडक्यात इतिहास सांगून शहीद भगतसिंग, हुतात्मा राजगुरू व सुखदेव यांना सामुदायिक मानवंदना दिली. वर्गात प्रवेश करण्यासाठी लंगडी खेळत जाण्याची अट असल्याने वयाची साठी गाठलेल्या सुमारे ७७ विद्यार्थ्यांचे व्रात्य, खोडकर मुलामुलींमध्ये रूपांतर झाले.

"नुकत्याच उमललेल्या टवटवीत फुलांप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांचे चेहरे पाहून मन प्रसन्न झाले आहे. प्रत्येक जण हा स्वतःचा शिल्पकार असतो. सुसंस्काराचे संचित तुम्हाला लाभले. आता उतारवयात ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी वाचन अन् चांगल्या मित्रांना जीवनात स्थान द्या!

**— प्रा. डॉ. शिवाजीराव मोहिते**

संपादकीय विशेष

# वेध मंदीचे...

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नवीन धोरणांमुळे व्यापारी, ग्राहक आणि गुंतवणूकदारांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अमेरिकन बाजारातील प्रचंड घसरणीचा परिणाम आशियाई बाजारावरही स्पष्टपणे दिसून येत आहे. डिसेंबरमध्ये, टेस्लाच्या शेअरची किंमत 488.54 डॉलर होती. ती आता 222.15 डॉलरवर घसरली आहे. याचा अर्थ 'टेस्ला'चे शेअर्स केवळ दोन महिन्यांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा अधिक घसरले आहेत. टेस्ला अमेरिकेतील सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. अलीकडे, इतर देशांमधील कोणत्याही 'लार्ज कॅप' कंपनीमध्ये अशी घसरण दिसली नाही. 'टेस्ला'च्या शेअर क्रॅशचा परिणाम एलन मस्क यांच्या 'नेट वर्थ'वरही दिसून आला.

आजघडीला ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांमुळे गुंतवणूकदारांमध्ये प्रचंड चिंता वाढली आहे. आर्थिक मंदीच्या भीतीमुळे भांडवली बाजारात मोठ्या प्रमाणावर विक्री झाली. गेल्या महिन्यापर्यंत वॉल स्ट्रीटवर ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांचा आनंदोत्सव साजरा होत होता; मात्र आता बाजारात घबराटीचे वातावरण आहे. इतरांना धडा शिकवण्याच्या नादात ट्रम्प यांना स्वतःलाच धडा शिकायला मिळाला. स्वतःहून स्वतःचीच लंकादहन करण्याची त्यांची वृत्ती जगाला आर्थिक संकटात टाकत आहे. टॅरिफ विवाद आणि फेडरल सरकारच्या धोरणांमधील अनिश्चिततेमुळे मंदीची भीती निर्माण झाली आहे. गेल्या आठवड्यातील भांडवली बाजारातील जोरदार विक्री अलिकडच्या काळातही कायम राहिली. तिन्ही प्रमुख निर्देशांक मोठ्या नुकसानीला बळी पडले. बाजारातील आर्थिक अनिश्चितता, संभाव्य मंदीची भीती आणि व्यापारातील वाढत्या तणावामुळे विक्रीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचे चार ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाले. अमेरिकन बाजारात अलीकडे झालेल्या विक्रीमागे अनेक कारणे आहेत. यामध्ये व्यापार धोरणावरील अनिश्चितता, संभाव्य मंदीची भीती आणि उच्च स्टॉक व्हॅल्युएशनवरील चिंता यांचा समावेश आहे. त्यातही तंत्रज्ञान समभागांना सर्वाधिक फटका बसला.



अमेरिकेमध्ये आज संभाव्य मंदीबद्दल गुंतवणूकदारांच्या चिंता वाढल्या आहेत. ट्रम्प यांनी सध्याच्या परिस्थितीचे वर्णन 'संक्रमण कालावधी' असे केले आणि मंदीची शक्यता नाकारली नाही. यानंतर बाजारातील गुंतवणूकदारांची भीती आणखी वाढली. याच सुमारास 'व्हाईट हाऊस'ने मंदीच्या भीतीवर आपली भूमिका मांडली. बाजारपेठेमध्ये घसरण झाली असली, तरी अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. एकूणच सध्या सुरू असलेली बाजारातील अस्थिरता व्यापक चिंता दर्शवते. अमेरिकन शेअर बाजारातील घसरण आणि तिथल्या अर्थव्यवस्थेत कोणतीही मंदी आल्यास भारतीय बाजारावर परिणाम होईल. जागतिक अनिश्चितता आणि परदेशी गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणात विक्री झाल्यामुळे भारतीय बाजार आधीच दबावाखाली आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांमुळे आर्थिक वाढीबाबत अनिश्चितता आणखी वाढली आहे. त्यामुळे परकीय भांडवल काढण्याच्या प्रक्रियेला आणखी वेग येऊ शकतो. तज्ज्ञ गुंतवणूकदारांना देशांतर्गत उपभोग-संबंधित समभागांवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला देत आहेत. कारण आयटी आणि फार्मासारख्या निर्यात-केंद्रित क्षेत्रांमध्ये प्रचंड अस्थिरता दिसू शकते. गुंतवणूकदार देशांतर्गत उपभोग-संबंधित स्टॉकवर लक्ष केंद्रित करून स्वतःचे संरक्षण करू शकतात. बाजाराशी संबंधित अनेक महत्त्वाच्या घटकांवर गुंतवणूकदार लक्ष ठेवून आहेत. यामध्ये 'फेडरल रिझर्व्ह'चे व्याजदर निर्णय आणि अर्थव्यवस्था स्थिर करण्यासाठी संभाव्य सरकारी उपायांचा समावेश आहे.

अमेरिकन बाजारातील घसरणीचा परिणाम 'क्रिप्टोकरन्सी'वरही झाला. बिटकॉइनचे मूल्यही घसरले. त्याचे ताजे दर ही नोव्हेंबरपासूनची नीचांकी पातळी आहे. घसरणीच्या काळात गुंतवणूकदार या धोकादायक मालमत्तेमधून पैसे काढत आहेत. त्यामुळे 'क्रिप्टो मार्केट'मध्ये दबाव आहे. टॅरिफबाबत ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या नव्या निर्णयांमुळे गुंतवणूकदारही नाराज झाले आहेत. ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोमधील आयातीवर नवीन शुल्क लागू करण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवरील शुल्क दहा टक्क्यांवरून वीस टक्के केले आहे. याशिवाय स्टील आणि ॲल्युमिनियमवर 25 टक्के दर लागू केला आहे. कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये अमेरिकन वस्तूंवर बहिष्कार टाकण्याची मोहीम सुरू झाली आहे. अन्य देशांमधून अमेरिकन वस्तूंना पर्याय शोधला जात आहे. त्यामुळे अमेरिकन उत्पादक धास्तावले असून या उद्योगांच्या शेअर्समध्ये घसरण झाली आहे.

भारतातील देशांतर्गत बाजार या जागतिक दुर्बलतेचा कसा सामना करतो याकडे गुंतवणूकदारांचे लक्ष असेल. विदेशी गुंतवणूकदारांची विक्री वाढल्यास भारतीय बाजारातही कमजोरी दिसू शकते. चलनवाढ अपेक्षेपेक्षा जास्त राहिल्यास बाजारात आणखी कमजोरी दिसू शकते. अमेरिकन शेअर बाजारातील मोठ्या घसरणीमुळे जागतिक गुंतवणूकदार चिंतेत पडले आहेत.

'अमेरिका फर्स्ट' ही घोषणा बरोबर होती; पण इतर देशांवर दबाव टाकून 'अमेरिका फर्स्ट'चे स्वप्न आता पूर्ण होताना दिसत नाही. शपथ घेतल्यापासून ट्रम्प सातत्याने शुल्काबाबत एकतर्फी घोषणा करत आहेत. चीन, कॅनडा, मेक्सिको आणि भारत यांसारख्या देशांसाठी आदेश जारी करण्यात आले. आपल्या या निर्णयामुळे इतर देशांवर दबाव येईल असे त्यांना वाटत होते. ट्रम्प यांच्या टॅरिफ हल्ल्याचा नंतर इतर देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल; परंतु त्याआधी त्याचा परिणाम अमेरिकेवरच दिसून येत आहे. कारण चीन आणि कॅनडाने ट्रम्प यांच्या करवाढीला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून ट्रम्प यांचे अमेरिकेतील डावपेच मागे पडल्याचे दिसत आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत मंदीचे आवाज ऐकू येऊ लागले आहेत. 'नॅसडॅक'च्या घसरणीमुळे इलॉन मस्क यांना सर्वात मोठा फटका बसला आहे. ट्रम्प यांनी ज्या प्रकारे 'जागतिक शुल्क युद्ध' सुरू केले, त्याचा सर्वात मोठा परिणाम आता अमेरिकेवरच दिसून येत आहे. आता अमेरिकेला टॅरिफ युद्धाचा सर्वाधिक फटका बसणार असे दिसू लागताच ट्रम्प प्रशासन तडजोडीच्या मूडमध्ये आल्याचे दिसते. कॅनडा आणि मेक्सिकोवर लादण्यात आलेले शुल्क तूर्तास स्थगित करण्यात आले आहे, तर खुद्द ट्रम्प भारताशी करार करण्याबाबत बोलत आहेत.

# प्रदूषणाचा भस्मासूर!

पर्यावरण

श्याम ठाणेदार

पुणे



**स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.**

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाबमधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, ( राजस्थान - हरियाणा सीमेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर ) मुझ्झफरनगर, हनुमानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासूर रोखता येईल.



## खेचाखेची

### प्रश्न...

बायको खुश तेव्हा
नवरा पण खुश
पण नवरा खुश तर...
.
.
बायकोला प्रश्न
.
.
.
हा बाबा
का खुश ?

## सुप्रभात — वेगळं काही


फ्रान्समधला किलर व्हेल जातीचा मासा माणसाप्रमाणे बोलतो. त्याला विशिष्ट शब्द शिकवण्यात आले आहेत. पाण्यातून तोंड बाहेर काढून तो तसे उच्चारही करतो. माणसाप्रमाणे बोलणाऱ्या या व्हेलबाबत प्रचंड कुतुहल निर्माण झालं आहे. 'विकी' असं या व्हेलचं नाव आहे. विकी एक मादी आहे. 'हाय', 'हॅलो', 'बाय बाय' हे शब्द ती उच्चारते. 'वन', 'टू', 'थ्री' हे आकडेही ती म्हणते. विकी फ्रान्समधल्या 'मरीनलँड ॲक्वेरियम'मध्ये राहते. प्रशिक्षकांकडून तिला बोलण्याचं प्रशिक्षण मिळालं आहे. विकीच्या या क्षमतेमुळे जैवशास्त्रज्ञही आश्चर्यचकित झाले आहेत. विकीवर अजून संशोधन करण्यात येणार असल्याचं त्यांचं म्हणणं आहे.

## फॅशन पॅशन

### बाह्यांचे आकर्षक पॅटर्न्स



विविध धाटणीचे पेहराव शिवून घेताना बाह्यांमधील वेगळेपण लक्ष वेधून घेतं. वेगवेगळ्या प्रकारे बाह्या शिवून घेता येतात. अर्थातच यावेळी आपला कम्फर्ट आणि पेहरावाचा एकूण बाज लक्षात घ्यायला हवा. बाह्यांच्या स्टाईलमध्ये प्रयोग केले असता स्टायलिश लूक मिळतो शिवाय चांगला फीलही मिळतो. बाह्यांच्या अशा काही पॅटर्न्सवर नजर टाकू या... ✻ भारतीय पारंपरिक पेहरावामध्ये 'रफल स्लीव्हज' हा प्रकार शोभून दिसतो. ब्लाऊज, कुर्ते तसंच चोलीमध्ये अशा स्लीव्हजचा वापर केला जातो. रफल स्लीव्हजमुळे विशेष प्रसंगी घालायच्या कपड्यांची रंगत वाढेल. ✻ सध्या 'बेल स्लीव्हज' हा प्रकारही लोकप्रिय ठरत आहे. या स्लीव्हज पुढच्या बाजूने ढगळ असतात. पण बारीक हाताच्या युवतींनी बेल स्लीव्हज कॅरी करणं टाळावं. ✻ 'लाँग केप स्लीव्हज'चा ट्रेंडही भरात आहे. ✻ पूर्ण बाह्यांमध्ये 'बॉक्सी स्लीव्हज'ची लोकप्रियता वाढली आहे. पाश्चिमात्य पेहरावांवर स्लीव्हजचा हा प्रकार खुलून दिसतो. या स्लीव्हज खालच्या बाजूने फुगीर असतात. हात जाड असतील तर अशा स्लीव्हज कॅरी करता येतील.




## राशीभविष्य

- **मेष** : संततीचा हट्ट पुरवणे त्रासदायक होईल. कोणालाही दुखवू नका. मन अस्वस्थ राहील.
- **वृषभ** : आर्थिक पातळी उंचावेल. नैराश्य दूर होईल. कार्यक्षेत्रात उत्साही वातावरण असेल.
- **मिथुन** : विरोधक वरचढ होतील. चिडचिड वाढेल, कुणाकडूनही मोठ्या अपेक्षा ठेऊ नका.
- **कर्क** : नकारात्मक विचार दूर करा. देणी रक्कम देऊन टाकाल. मोठी कामं मार्गी लागतील.
- **सिंह** : व्यवहारात सावध रहाणं आवश्यक. विचित्र ताण येण्याची शक्यता. मन विचलीत होईल.
- **कन्या** : मोठी आर्थिक उलाढाल होईल. नोकरीत बढती मिळेल. भावी काळासाठी तरतूद कराल.
- **तूळ** : घरातील परंपरा मोडू नका. चीजवस्तू, कागदपत्रे सांभाळा. मतभेदाला थारा देऊ नका.
- **वृश्चिक** : प्रयत्नांची दिशा नक्की कराल. प्रेमळ माणसांचा सहवास लाभेल. यशाकडे वाटचाल कराल.
- **धनु** : मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागतील. तडजोडीचा मार्ग स्वीकारा. मन शांत राहील.
- **मकर** : अपेक्षाभंगाचा त्रास होईल. आर्थिक व्यवहारात सावधान रहा. वाहन सावकाश चालवा.
- **कुंभ** : महत्वाची कामं पूर्ण होतील. सरकारी कामात यश मिळेल. आवडती माणसं भेटतील.
- **मीन** : परिस्थिती कौशल्याने हाताळाल. संततीकडून शुभवार्ता. सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल.

## सल्ला मोलाचा

### उन्हाळा सुसह्य करा

उन्हाळा चांगलाच जाणवू लागला आहे. आता हळूहळू अधिकाधिक कमी कोमट पाण्यानं आंघोळ करायला सुरुवात करा आणि १५–२० दिवसांमध्ये थंड पाण्याने आंघोळ करायला लागा. पोहायला जात असाल तर उत्तमच. मात्र पाण्यातील क्लोरीन पूर्णपणे निघून जावं यासाठी नंतर अंग चोळून धुवायला विसरू नका. उन्हाळ्यात चेहऱ्याला सनस्क्रीन लोशन लावा. उन्हाळ्यातील प्रखर सूर्यकिरणांमुळे ओठांच्या पेशींवरही विपरीत परिणाम होतो. यासाठी बाहेर पडताना लिप बामचा वापर जरूर करा. दर दोन–तीन तासांनी थंड पाण्यानं चेहरा धुवा आणि मॉइश्चरायझर वापरा. उन्हाळ्यात आहाराकडे प्रामुख्यानं लक्ष पुरवा. तेलकट, तिखट, मसालेदार आहार टाळा. कलिंगडं, काकडी, टरबूज यासारख्या पाण्याचं प्रमाण भरपूर असलेल्या पदार्थांचा आहारात समावेश करा. आहार हलका आणि पचायला सुलभ असावा.

## दिनविशेष

### २७ मार्च

- २०१४ : विश्वकरंडक क्रिकेट ऑस्ट्रेलिया विजयी.
- २०१६ : काँग्रेसच्या नऊ बंडखोरांमुळे अस्थिर बनलेल्या उत्तराखंडमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- २०१७ : भारतात ९५ टक्के पाऊस पडणार असल्याचा स्कायमेटचा अंदाज.
- २०१८ : मराठी साहित्याचे अभ्यासक, 'अस्मितादर्श' चळवळीचे जनक आणि पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गंगाधर पानतवणे यांचे निधन.

## वेगळं क्षेत्र

### ऑडिओलॉजीच्या क्षेत्रात

ऐकण्याची क्षमता, संतुलन आणि कानांशी संबंधित विकारांविषयी ऑडियोलॉजीमध्ये शिकता येतं. ऐकण्याच्या क्षमतेचा अभ्यास म्हणजे ऑडियॉलॉजी. या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना ऑडियॉलॉजिस्ट असं म्हटलं जातं. सध्या ध्वनिप्रदुषणात प्रचंड वाढ झाली आहे. लोकांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे ऑडियॉलॉजिस्टची गरज वाढू लागली आहे. ऑडियॉलॉजिस्ट ऐकण्याची किंवा बोलण्याची समस्या असलेल्या रूग्णांसोबत काम करतात. नाक, कान, घसा तज्ज्ञांसोबत ते काम करू शकतात. शैक्षणिक संस्था तसंच एनजीओंमध्येही ते काम करतात. ऑडियॉलॉजिस्ट बनण्यासाठी विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. बीएससी तसंच एमएससी इन ऑडियॉलॉजी असे अभ्यासक्रम भारतातल्या काही संस्थांमध्ये उपलब्ध आहेत. समोरच्याला समजून घेण्याचं कौशल्य ऑडियॉलॉजिस्टकडे असावं लागतं. संवादकौशल्य असणंही गरजेचं मानलं गेलं आहे. ऑडियॉलॉजिस्टला सुरूवातीला २५ ते ३० हजारांचं उत्पन्न मिळतं. अनुभव वाढल्यानंतर उत्पन्नही वाढतं.

## पंचांग

**गुरूवार, २७ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. १३, नक्षत्र : शततारका,
चंद्रराशी : कुंभ, योग : साध्य शुभ,
सूर्योदय: ६.३९, सूर्यास्त: ६.४९


## फॉरवर्डस

**प्रत्येकाला जगण्यासाठी कोणता ना कोणता आधार असतोच...**

ये दिल डूबेगा समंदर में किसी के,
हम भी तो लिखे होंगे मुकद्दर में किसी के

## आरोग्यमंत्र

### स्वत:ला वेळ द्या



हृदय कशा पद्धतीनं काम करतं हे समजून घेत असताना अन्यही काही गोष्टींची नोंद घ्यावी लागेल. उदाहरणार्थ हृदयाच्या आरामाची वेळ ०.३ सेकंद झाली तर केवळ ६० टक्के रक्त शुद्ध होतं. म्हणजे अश्या घाईगर्दीच्या असामान्य स्थितीत २० टक्के किंवा ४० टक्के अशुद्ध रक्त रक्तवाहिन्यांमधे साठत केलं जातं आणि ती घाण अशुद्ध रक्तवाहिन्यांमधे चिकटुन सामान्यपणे लवचिक स्वरूपाच्या असलेल्या रक्त वाहिन्या कठीण स्वरूपाच्या बनत जातात. कालांतरानं रक्तवाहिन्या इतक्या कठीण बनतात की रक्तात एखादी गाठ वाहत आली की अडकून रक्ताचा प्रवाह रोखतो. या स्थितीला हृदय विकाराचा झटका म्हणतात. या हिशेबानं विचार केला तर लक्षात येईल की हृदय विकाराचं मूळ कारण शरीराकडून किंवा मेंदुकडून होणारी सामान्यपेक्षा वाढीव रक्ताची मागणी हेच आहे. मेंदुची हालचाल चलायमान होते तेव्हा त्याची रक्तपुरवठयाची मागणी सामान्यपेक्षा खूप वाढते. याला आपले विचार, भावना, दृष्टिकोण, स्मृती जबाबदार आहेत. त्यामुळे आपलं हृदय दीर्घकाळ स्वस्थ ठेवायचं असेल तर चिंता, क्रोध, उदासी, घाईगर्दी आणि भावनात्मकदृष्टया संवेदनशील स्वभाव यांच्यापासून स्वतःला सुरक्षित ठेवावं. या पाच गोष्टींपासून सुरक्षित राहण्यासाठी कोणतंही औषध उपलब्ध नाही. त्यापासून सुरक्षित रहाण्यासाठी ध्यानधारणा हाच एक एकमेव शाश्वत उपाय आहे. म्हणुनच स्वतः साठी एक तास वेळ द्या आणि शारिरीक व मानसिक आरोग्य निरोगी ठेवा.

## वाचा तर खरं

✻ उदयपूर– ऐतिहासिक चित्रपटांचं चित्रिकरण असेल तर निर्मात्यांची पावलं आपोआप राजस्थानमधील उदयपूरकडे वळतात. राजेशाही जीवनाची ओळख सांगणाऱ्या अनेक इमारती आणि किल्ले आहेत. गाईड, एकलव्य, खुदा गवाह, गोलियों कि रासलीला– रामलीला आणि सध्या गाजत असलेल्या पद्मावतचं चित्रिकरणही उदयपूर येथील किल्ल्यांमध्ये झालं आहे.

चित्रपटांच्या चित्रीकरणाबरोबरच उदयपूर आणि राजस्थानातील अनेक किल्ल्यांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगही होत असतात. उदयपूरला येण्याचा उत्तम कालावधी ऑक्टोंबर ते मार्च आहे.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### विद्यार्थी आत्महत्या, न्यायालयाकडून दखल

**नवी दिल्ली :** उच्च शिक्षण संस्थांमध्ये सातत्याने घडणा-या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांची गंभीर दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने या घटना रोखण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय कृती दल स्थापन केले आहे. सन २०२३ मध्ये आयआयटी-दिल्ली येथे शिक्षण घेत असताना आत्महत्या केलेल्या २ विद्यार्थ्यांच्या पालकांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध केलेल्या अपिलावर सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय घेतला. या २ विद्यार्थ्यांच्या आत्महत्येप्रकरणी जानेवारी २०२४ मध्ये पोलिसांना एफआयआर नोंदवण्याचे निर्देश देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला होता. मात्र, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने आत्महत्या केलेल्या दोन्ही विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांच्या तक्रारींवर एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिल्ली पोलिसांना दिले.

### दक्षिण कोरियात अग्नितांडव; २७ हजार बेघर

**सेऊल :** दक्षिण कोरियाच्या जंगलात भीषण आग लागली आहे. यामध्ये आतापर्यंत १८ जणांना आपला जीव गमवावा लागला. कोरडे हवामान आणि जोरदार वा-यामुळे आगीची तीव्रता अधिक वाढली आहे. १३०० वर्षे जुने बौद्ध मंदिरही जळून खाक झाले आहे. या भीषण आगीने आतापर्यंत ४३,००० एकर जमीन वेढली आहे. प्रशासनाने अँडोंग आणि इतर शहरांमधील लोकांना त्यांची घरे रिकामी करण्याचे आदेश दिले आहेत.

# सोमेश्वर मार्चअखेरपर्यंत रक्कम देणार

## कारखानाच्या सभासदांना ३१७३ रुपये एफआरपी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** राज्यात अग्रेसर असलेल्या श्रीसोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांना एफआरपीची उर्वरित रक्कम ३१ मार्चपूर्वी देण्यात येणार असल्याचे सोमेश्वरचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी सांगितलंय. संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाल्याचे त्यांनी म्हटलंय. तर नुकताच उच्च न्यायालयाने एफआरपी संदर्भातील निर्णय दिलाय. त्या निर्णयानुसार सोमेश्वर सहकारी साखर कारखानाच्या सभासदांना ३१७३ रुपये एफआरपी बसत असून, यापूर्वी सभासदांना २८०० रुपये प्रमाणे पहिले बिल देण्यात आलंय. त्यामुळे ३१ मार्चपूर्वी उर्वरित ३७३ रुपये दिले जातील. त्याचा उपयोग सभासदांना सोसायटी भरण्यासाठी होईल, असंही जगताप यांनी म्हटलंय.

शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देण्यासंदर्भात संचालक मंडळाची बैठक नुकतीच पार पडली आणि या बैठकीसंदर्भात निर्णय घेण्यात आलाय. केंद्र सरकारच्या पूर्वीच्या धोरणानुसार एफआरपीची रक्कम ठरवली जावी, असे कोर्टाने त्यांच्या आदेशात म्हटले आहे. त्याप्रमाणे मागील वर्षीचा साखरेचा उतार आणि झालेला खर्च याचा विचार केला असता संचालक मंडळाने ३१७३ रुपये एफआरपीची रक्कम निश्चित केल्याचं पुरुषोत्तम जगताप यांनी सांगितलंय.

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये सध्या २० ते २५ हजार टन उसाचे गाळप होणं बाकी आहे. हा उर्वरित ऊस सोमेश्वरच्या संपूर्ण कार्यक्षेत्रांमधून गोळा करून आणायचा आहे. त्यामुळे याला आणखी पाच ते सात दिवस लागतील. या महिना अखेरपर्यंत हा हंगाम संपुष्टात येईल. या हंगामामध्ये साधारणत: १२ लाख २० हजार ते २५ हजारांच्या दरम्यान उसाचे गाळप होईल, असं पुरुषोत्तम जगताप यांनी म्हटले आहे. उसाची टंचाई असतानादेखील सभासदांनी चांगलं सहकार्य केल्याबद्दल त्यांनी कारखान्याच्या सभासदांचे आभार देखील मानले आहेत.

### अजित पवारांचे मार्गदर्शन

● श्रीसोमेश्वर सहकारी साखर कारखाना १९९३ पासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चालतो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मानणारे संचालक मंडळ या कारखान्यावर आहे. या कारखान्याने १९९३ पासून नेहमीच लोकांना चांगला भाव दिलेला आहे. मागील वेळीसुद्धा अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवत सभासदांनी तो अजित पवार यांना मानणाऱ्या संचालक मंडळाच्या ताब्यात दिला होता. सोमेश्वरच्या सभासदांना दिला जाणारा भाव हा चांगला असावा, कारखान्यात कोणताही भ्रष्टाचार नसावा, याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार नेहमीच आग्रही असतात.

# उल्हासनगरमध्ये २६ बोगस डॉक्टरांचा पर्दाफाश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** 'उद्योग नगरी' म्हणून ओळख असलेल्या उल्हासनगर शहरात २६ बोगस डॉक्टरांचा महापालिका आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पर्दाफाश केलाय. तर यापैकी १८ बोगस डॉक्टरांवर उल्हासनगर शहरातील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केल्याची माहिती, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांनी दिली आहे. विशेष म्हणजे गुन्हा दाखल असलेल्या बोगस डॉक्टरांपैकी सर्वाधिक परराज्यातील असल्याचं समोर आलंय.

मिळालेल्या माहितीनुसार, उल्हासनगर शहरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असल्याच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकारी आणि जिल्हादंडाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगानं चौकशी केली असता, उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात काम करत असलेल्या एकूण २६ डॉक्टरांच्या नावाची यादी प्राप्त झाली. त्यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी प्रथम धडक मोहीम राबवण्यात आली. सदर मोहिमेंतर्गत बोगस प्रमाणपत्र आढळून आलेल्या डॉक्टरांच्या सर्व कागदपत्रांची तपासणी करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक यांच्यामार्फत देण्यात आले होते.

वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत डॉ. मोहिनी धर्मा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि त्यांच्या टीमकडे प्राप्त अहवालानुसार शहरातील अनेक डॉक्टर वैद्यकीय परवाना नसतांना किंवा अपात्रतेसह व्यवसाय करत असल्याचं आढळून आलं. अशा बोगस डॉक्टरांच्या कागदपत्रांची पाहणी करुन त्यामध्ये आढळून आलेल्या एकूण १८ डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. तर उर्वरित ८ डॉक्टरांपैकी ३ डॉक्टर महाराष्ट्र कॉन्सिल यांचंकडं नोंदणीकृत आहे. तर ४ डॉक्टरांची पाहणी केली असता नमूद ठिकाणी त्यांचं क्लिनिक बंद आहे. तर १ डॉक्टर कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रात येत असल्यानं सदर डॉक्टरांवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आल्याची माहिती, वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांनी दिलीय.

# राज्यातील ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात नवीन सरकार स्थापन होऊन साडेतीन महिन्यांचा काळ उलटून गेला तरी प्रशासनातील खांदेपालट काही थांबताना दिसत नाही. गेल्याच आठवड्यात राज्यातील सहा आयएएस अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. आताही पाच आयएएस अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये पालघर झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी एच पालवे यांची बदली मुंबईतील महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ येथे व्यवस्थापक संचालकपदी करण्यात आली आहे. तर मनोज रानडे यांची बदली पालघर सीईओ म्हणून करण्यात आली आहे.

२०२० बॅचच्या मध्य प्रदेश कॅडरच्या आयएएस अधिकारी अंजली रमेश यांना महाराष्ट्रात आणण्यात आले असून त्यांच्याकडे हिंगोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी पदाचा पदभार देण्यात आला आहे.

१. बी.एच. पालवे (आयएएस: एससीएस: २०१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

२. मनोज रानडे (आयएएस: एससीएस: २०२४) संचालक, नगर प्रशासन, मुंबई यांना जिल्हा परिषद, पालघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ३. शुभम गुप्ता (आयएएस: आरआर: २०१९) महानगरपालिका आयुक्त, सांगली यांना विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर येथे सदस्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

४. अंजली रमेश. (आयएएस: आरआर: २०२०) संवर्ग मध्य प्रदेशातून महाराष्ट्र संवर्गात बदली जिल्हा परिषद, हिंगोली येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ५. झेनिथ चंद्र देवंथुला (आयएएस: आरआर: २०२२) सहाय्यक जिल्हाधिकारी, वरोरा उपविभाग, चंद्रपूर यांना प्रकल्प अधिकारी, किनवट आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, किनवट उपविभाग, नांदेड म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

# उन्हाच्या कडाक्याने महाराष्ट्र होरपळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही दिवसांमध्ये राज्यात उन्हाचा पारा वाढला आहे. एप्रिल आणि मे महिन्यातील ऊन आता मार्च महिन्यातच जाणवू लागले आहे. दरम्यान उन्हामुळे अंगाची लाही लाही होत आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरमध्ये उष्माघाताचा पहिला बळी गेल्याचे समोर आले आहे. सोयगाव तालुक्यात ही घटना घडली आहे.

कडक उन्हाचा फटका राज्यभर जाणवत आहे. राज्य सरकारने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तर दुसरीकडे राज्यातील पाणीसाठ्यावर देखील यांचा परिणाम होताना दिसून येत आहे. राज्यातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याचे पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी तापमान ३५ ते ४० अंश दरम्यान पोहोचले आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

जळगाव, गोंदिया, मुंबईत देखील तापमानाचा पारा वाढल्याचे चित्र आहे. उष्णतेपासून वाचण्यासाठी शासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. राज्यातील धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. दरम्यान महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून कोयना धरणाची ओळख आहे. कोयना धरणाच्या पाणीसाठ्यात देखील झपाट्याने घट होताना दिसत आहे.

महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून ओळख असलेल्या कोयना नदीच्या शिवसागर जलाशयाची पाणीपातळी तीव्र उन्हाळ्याने घटू लागली असून नदीचे पात्र मोठ्या प्रमाणात उघडे पडू लागले आहे, त्यामुळे जलाशयातील बेटे दिसू लागली आहेत. १०५ टीएमसी क्षमता असलेल्या कोयनेची पाणी पातळी यावर्षी शंभर टक्के भरली होती. सध्या तीव्र उन्हाळ्यामुळे वीजनिर्मिती, शेतीसाठी व पिण्याचे पाणी, त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात होणारे बाष्पीभवन यामुळे पाणी दिवसेंदिवस वेगाने कमी होत आहे. त्यामुळे आगामी काळात प्रशासनाला पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

पाणी पातळी घटल्याने बामणोली, तापोळा भागातील मुख्य दळणवळणाचे साधन असलेल्या बोटी चालवणे अवघड बनत आहे. पात्र उघडे पडू लागल्याने उन्हातान्हात पात्रातून लोकांना पायपीट करावी लागत आहे. विशेषत: सोळशी व कोयना नदीच्या खो-यातील तापोळ्याच्या वरील भागातील पाणी वेगाने कमी होऊन या भागातील लोकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्याचबरोबर या भागातील प्रमुख पर्यटन स्थळ असलेल्या वासोटा किल्ल्यावर जाण्यासाठीही नदीपात्रातील पायी चालण्याचे अंतर वाढत आहे. त्यामुळे पर्यटक संख्याही कमी होऊ लागली आहे.

### पुण्यात 'पाणीबाणी'

● एकीकडे समान पाणी पुरवठा (चोवीस तास) योजनेचे काम सुरू असले तरी टँकरद्वारे पाणी पुरवठा त्याच प्रमाणात वाढत आहे. यावर्षी टँकरच्या सुमारे चार लाख ४ हजार इतक्या फे-या झाल्या आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत यात चार हजारांनी वाढ झाली आहे. सध्या वाढत्या तापमानामुळे शहरात पाण्याच्या मागणीत वाढ होत आहे. गेल्या दोन महिन्यांत टँकरच्या फे-या वाढत आहेत. जानेवारी महिन्यात ३९ हजार ६९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. त्याचवेळी फेब्रुवारी महिन्यात ३८ हजार ५२२ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.



# दबंग नव्हे तर शरारत स्टाईल; योगींचे मिश्किल उत्तर


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी माध्यमांशी बोलताना उत्तर प्रदेशच्या कायदा आणि सुव्यवस्थेसह विविध मुद्द्यांवर मोकळेपणाने भाष्य केले. उत्तर प्रदेशातील दंगलखोरांशी सामना करण्याच्या सरकारच्या भूमिकेवर मुख्यमंत्री योगी म्हणाले की, २०१७ मध्ये उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार स्थापन होताच दंगली थांबल्या. योगी आदित्यनाथ यांच्या कार्यपद्धतीचे दबंग स्टाईल असं वर्णन केल्यावर ते म्हणाले, नाही, ही दबंग स्टाईल नाही, ही आमची शरारत स्टाईल आहे.

बटेंगे तो कटेंगे, या घोषणेबाबत विचारलेल्या प्रश्नावर सीएम योगी म्हणाले की, यात काहीही चुकीचे नाही. यामुळे दंगली भडकणार नाहीत आणि ते काय करतात यावर आमच्याकडे इलाज आहे. मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी वादावर सीएम योगी म्हणाले की, आम्ही न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत आहोत, अन्यथा आतापर्यंत तेथे बरेच काही घडले असते. यासोबतच त्यांनी वक्फ बोर्ड सुधारणा कायद्यावरही भाष्य केले. ते म्हणाले की, वक्फ बोर्डाने आजपर्यंत लोकांच्या कल्याणासाठी कोणतेही काम केलेले नाही. वक्फ बोर्डाने मनमानी नियम केले आणि आदेश दिले, असा आरोप त्यांनी केला.

### त्यांना समजेल अशीच भाषा

● बुलडोझर न्यायाबाबत सीएम योगी म्हणाले की, ज्याला ज्या भाषेत समजते, त्याच भाषेत समजावून सांगावे लागते. कोणी हिंसक व्यक्ती आपल्यासमोर हल्ला करण्यासाठी आला, तर आपण त्याच्याविरोधात उभं राहायला हवं का? नाही, जर तो हिंसक व्यक्तीच्या रूपात आला तर त्याच्या हिंसेला आपल्याला तिथेच प्रत्युत्तर द्यावे लागेल. कायदा हातात घेणाऱ्यांना कायदेशीर चौकटीत राहून परिणाम भोगावे लागतील, असेही ते म्हणाले.



पान १ वरून

## संतोष देशमुख हत्याकांड...

जगमित्र ऑफिस परळीला आहे, तिथे वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांनी आवादा कंपनीकडून दोन कोटींची खंडणी मागण्याचे निश्चित केले. त्यांनी कंपनीच्या मॅनेजरला (शिवाजी थोपटे) धमकी दिली. शिवाजी थोपटेने दिल्लीच्या अधिका-याला कळवले. दिल्लीच्या अधिका-यांनी कळवले की पोलिसांत तक्रार करू नका. त्यानुसार पोलिसांत तक्रार केली नाही. कारण हे खूप मोठे लोक आहेत, असे त्यांना सांगण्यात आले. याचे सर्व सीडीआर आणि कॉल रेकॉर्ड कोर्टात देण्यात आले आहे. उज्ज्वल निकम म्हणाले की, संतोष देशमुख यांची हत्या हा कट आहे. तो कसा-कसा शिजत गेला याची तारखेसह माहिती आम्ही कोर्टाला दिली आहे. ८ ऑक्टोबर २०२४ ते ९ डिसेंबर २०२४ असा हा घटनाक्रम आहे. हा कट म्हणजे कंटिन्यू क्रिमिनल कॉन्सपरन्सी आहे. सुनील शिंदे याने कॉल रेकॉर्डिंग केले आहे. त्यामुळे वाल्मिक कराडचा यामध्ये संबंध असल्याचे पुरावे आहेत. सुदर्शन घुलेने पुन्हा धमकी दिली, की वाल्मिक कराड सांगतो तसे वागा, नाही तर कंपनी बंद केली जाईल. सुदर्शन घुले, विष्णू चाटे, फरार आरोपी कृष्णा आंधळे यांची गँग असल्याचा आरोप निकम यांनी केला. दोन प्रमुख मागण्या आज कोर्टात करण्यात आल्या. यामध्ये पहिली मागणी, महत्त्वाच्या साक्षीदारांची ओळख गोपनीय ठेवावी आणि दुसरी मागणी कोर्टाकडे करण्यात आली की, संतोष देशमुख खटल्यातील काही आरोपींची प्रॉपर्टी संघटित गुन्हेगारी कायद्याखाली जप्त करावी. या दोन प्रमुख मागण्या आज कोर्टाला करण्यात आल्याचे निकम यांनी सांगितले. गँग लीडर सुदर्शन घुले हा मुख्य आरोपी वाल्मिक कराडच्या इशा-यानुसार कसा काम करत होता, याचे सर्व ऑडिओ, व्हीडीओ पुरावे, सीडीआर आम्ही कोर्टाला दिले आहेत. त्यानुसार आम्ही पुढील तारखेला (१० एप्रिल २०२५) आरोपींविरोधात कोणते चार्ज फ्रेम करावे यासाठीचा अर्ज देणार असल्याचे उज्ज्वल निकम यांनी सांगितले.

संतोष देशमुख खटला दोन गोष्टींवर अवलंबून

ज्येष्ठ सरकारी वकील उज्ज्वल निकम म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या हत्येचा खटला हा प्रमुख दोन गोष्टींवर अवलंबून आहे. ९ डिसेंबर २०२४ ला संतोष देशमुख यांना पळवून नेण्यात आले. त्याचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. या खटल्यातील दुसरी महत्त्वाची बाब आहे परिस्थितीजन्य पुरावे. या दोन्हीवर हा खटला आधारित आहे. काही कागदोपत्री पुरावे आहेत. काही सायंटिफिक पुरावे आहेत. एसआयटीने योग्य परिस्थितीजन्य पुरावे गोळा केले आहेत. मनुष्य बदलू शकतो मात्र परिस्थितीजन्य पुरावे कधी खोटं बोलत नाहीत, असेही उज्ज्वल निकम म्हणाले.

## साईबाबांच्या पादुकांचे शिर्डीबाहेरही

देशभरातून भाविक साईबाबांच्या पादुका दर्शनासाठी घेऊन जाणार आहेत, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांनी दिली. साईबाबांच्या कार्याचा प्रचार व्हावा आणि भाविकांना साईंच्या मूळ पादुकांचे दर्शन घेता यावे, या उद्देशाने पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. साईबाबांच्या १२५ वर्षे जुन्या मूळ पादुकांचे दर्शन त्यामुळे घेता येणार आहे. त्याबाबत संस्थेने नियमावली तयार केली आहे.

## पुण्यात तब्बल अडीच हजार ...

**प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सतत गुन्हे घडणाऱ्या ठिकाणी शोधून त्याचे मॅपिंग करण्यात आले आहे. दिवस आणि रात्री अशा दोन सत्रांत पाचपेक्षा अधिक वेळा त्या ठिकाणांना पोलिसांकडून भेट दिली जात आहे. पोलिस त्या ठिकाणी कितीवेळा गेले, याची नोंद प्रत्येकवेळी ठेवली जाते. बहुतांश पोलिस ठाण्यातील गुन्हेगारी हॉटस्पॉटवर बीट मार्शल शंभर टक्के पोहचत आहेत. तर काही पोलिस ठाण्यांतील हॉटस्पॉट रेड झोनमध्येसुद्धा आहेत. तेथील गस्त जास्तीत जास्त प्रमाणात कशी वाढविता येईल, याबाबत काम करण्यात येत असल्याचे अमितेश कुमार यांनी सांगितले.**

**पोलिसांचा रस्त्यावरील वावर वाढल्यामुळे गुन्हेगारांवर अंकुश निर्माण होत आहे. प्रतिबंधात्मक कारवाईवर भर, स्थानिक पोलिस आणि कॉप्स २४ च्या माध्यमातून गस्त वाढविण्यात आली. सतत गुन्हे घडणाऱ्या अडीच हजार ठिकाणांचे मॅपिंग करण्यात आले. त्याचबरोबर ३० हजार गुन्हेगारांची माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यानुसार पोलिसिंग राबविण्यात येत आहे. त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत."**

## श्रीरामनवमीनिमित्त...

रामायण प्रवचन, सांगितीक कार्यक्रम अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले, विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, राघवेंद्र तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता. पुणे प्रांताचे सरसुभेदार श्रीमंत नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी सन १७६१ साली स्थापन केलेल्या देखण्या मंदिरामधे यंदाचे श्रीरामनवमी उत्सवाचे अखंडीत २६४ वे वर्ष साजरे होत आहे.

## गदारोळात अधिवेशनाचे वाजले ...

कुणाल कामराने जिथे हे गाणं गायलं तो स्टुडिओही फोडल्याचे दिसून आले. तसेच, कामराविरुद्ध मुंबईतील काही पोलिस ठाण्यांत गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे विरोधकांनीही हा व्हीडीओ शेअर करत या टीकेचे समर्थन केले. शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पुन्हा एकदा ते गाणं म्हटल्याचा व्हीडीओही समोर आला होता. त्यामुळे, आता विधिमंडळ सभागृहात याचे पडसाद उमटले असून कुणाल कामरा व सुषमा अंधारे यांच्याविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

जयकुमार गोरे यांच्या बदनामी व ब्लॅकमेलिंग प्रकरणात रोहित पवार, सुप्रिया सुळे यांचेवर हक्क भंग आणून खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी करून लवकरात लकवर अटक करावी, अशी मागणी ओबीसी नेते मंगेश ससाणे यांनी केली आहे. युट्युबर तुषार खरात, खंडणी घेणारी महिला आणि रोहित पवार, सुप्रिया सुळे एकमेकांच्या संपर्कात होते. त्यांनी व्हिडीओ पाठवल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं होतं. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनीही रोहित पवार आणि सुप्रिया सुळे यांना सहआरोपी करुन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

## 'नमस्ते'ची अंमलबजावणी पुण्यात

पुणे महानगरपालिका आणि कष्टकरी पंचायत यांनी पुढाकार घेत पुण्यातील नोंदणी शिबिरास बुधवारी सुरुवात केली.

कचरा वेचकांना आणि त्यांच्या कामाला नसलेली ओळख, असुरक्षित कामाची परिस्थिती आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा आभावाने मिळणारा लाभ यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो.'नमस्ते' योजना हे गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे आणि असंघटित कचरा वेचकांच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा प्रयत्न केला जात आहे. त्यांच्या अमूल्य योगदानाची अधिकृतपणे दखल योजनेतुन घेतली जाणार आहे. त्यांना अधिक सुरक्षित, सन्मानजनक आणि शाश्वत उपजीविका देण्यासाठी योजनेत प्रयत्न केले जाणार आहे. केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने, गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय, पंचायती राज मंत्रालय आणि पेयजल व स्वच्छता विभाग यांच्या सहकार्याने राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळामार्फत या योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे.

महापालिकेत 'नमस्ते वेस्ट पिकर पोर्टल' आणि मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे आज ५० हून अधिक कचरा वेचकांची नोंदणी करण्यात आली. यापुढेही कचरा वेचकांची नोंदणी नियमितपणे सुरू राहणार आहे. कचरा वेचक हे शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार आहेत, मात्र आजवर त्यांना अधिकृत मान्यता मिळाली नव्हती. नमस्ते योजनेमुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा, तसेच पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

*पुणे महानगरपालिका आणि स्वच्छ संस्थेचा पुढाकार

या योजनेची अंमलबजावणी करणारी पुणे महापालिका ही देशातील पहिली शहरी स्थानिक संस्था ठरली आहे. महापालिकेच्या पुढाकारामुळे 'स्वच्छ' आणि कष्टकरी पंचायत' यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने कचरा वेचकांना सुरक्षित रोजगार देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन येथे कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. आणि उपायुक्त संदीप कदम, कार्यकारी अभियंता श्री. प्रसाद जगताप आणि मुकुंद बर्वे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कष्टकरी पंचायतचे आदित्य व्यास यांनी केले.

## युट्यूबरच्या चुकीमुळे नागपूर हिंसाचार?

नागपूर येथे १७ मार्च रोजी झालेल्या दंगलीत अफवा पसरविणाऱ्या लोकांचा मोठा हात असल्याच्या वृत्ताने खळबळ उडाली आहे. अटक झालेल्यांच्या मोबाइल फोनमधून पोलिसांना महत्त्वाची माहिती आणि पुरावे सापडले आहेत. दंगलीच्या दिवशी दुपारपासूनच वेगवेगळ्या ग्रुपवर अफवा पसरविण्यात आली अशी खळबळजनक माहिती आहे. संदेश पसरविणाऱ्यांद्वारे पोलिसांकडून आमच्या मुलांना मारले जात आहे, लवकर या..; अशा आशयाचे संदेश प्रसारित करण्यात आले होते.

अटक करण्यात आलेल्या एका यूट्यूबरने अत्यंत निराधार माहिती व्हायरल केल्याचे आता उघड झाले आहे. मोहम्मद शहजाद खान असे नाव असलेल्या या यूट्यूबरने पोलिसांनीच बॉम्ब फेकल्याची निराधास आणि खोटी माहिती व्हायरल केली होती. त्याशिवाय अनेक निराधार माहिती व्हायरल केल्याचे आता उघड झाले आहे. यामुळे, लोकांमध्ये पोलिसांच्या विरोधात तीव्र संताप पसरला असावा आणि रात्री त्यामुळे मोठ्या प्रमाणात पोलिसांवर हल्ले, दगडफेक, जाळपोळ आणि हिंसाचार करण्यात आला. या दंगलीत पेट्रोल बॉम्ब आणि तीक्ष्ण शस्त्रांचा सर्रास वापर करण्यात आला होता.

## आरशात पाहून वारसा सांगू नका

कोण घरी बसवणारे हे दाखवून दिले. रोज दुसऱ्यांना शिव्या शाप देऊन बरे होत नसते. गरिबांविषयीचा तुमचा कळवळा किती खरा किती खोटा? हे सर्वजण ओळखून आहेत. काही लोकांनी सरकारविरुद्ध काही आरोपी केलेत, आमच्यामध्ये फूट पडेल, वाद होतील म्हणून देव पाण्यात ठेवलेत, असा टोलाही एकनाथ शिंदे यांनी लगावला.

सत्य परेशान हो सकता है लेकीन पराजित नही हौ सकता... विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्ल्यानंतर विरोधक चिंतन करतील असे वाटले. डुब गए अहंकार में कई सारे, अब तो सुधर जाओ प्यारे... सपकाळांना देवेंद्रजी औरंगजेबासारखे वाटले. मशाल पेटवून खुशाल झोपणाऱ्यांना आता समजल असेल. गद्दार कोण याचा निकाल जनतेने आणि अध्यक्षांनी दिला आहे. म्हणून आरशात बघून वारसा सांगता येत नाही, हे लक्षात ठेवा.. असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

## हापूस महागच...

दर्जानुसार ३ ते ५ हजार रुपये आणि ५ ते ८ डझनाच्या पेटीला दर्जानुसार ४ ते ८ हजार रुपये भाव मिळत असल्याची माहिती हापूसचे व्यापारी अरविंद मोरे यांनी दिली.

४ अनुसुचि १ परिशिष्ट १

**जिल्हा न्यायालय- १. कळंब यांचे न्यायालयात.**
**कारणे दाखवा नोटीस**

कि. दिवाणी अर्ज क. ११५/२०२३
श्याम वि मैनेजर अपना बँक

**निशाणी क्र. १६**

उत्तरवादीस अपीलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस आदेशावर व अपील -
प्रति,

२. मे शिवम इंडियान कंजीन प्रा. लि. कार्यालय ऑफिस नं. १०२, पहिला मजला, पिनॅकल पनोरोमा, बँक ऑफ महाराष्ट्रच्या जवळ,मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे- ४११०३७
३. संजय शंकर केडगे, रा. सदर
४. प्रद्युम्न केशव भागवत, रा. सदर

**Respondents**


तुम्हास नोटीस देण्यात येते की, मे. लवादअधिकारी यांनी केस नं. ARE ASBL 201/2018 अपना सहकारी बँक लि. वि. शाम व इतर या प्रकरणात दि.०६.०२.२०१९ दिलेल्या आदेशावर, अपिलकार यांनी कि. दिवाणी अर्ज क. ११५/२०२३ सादर केले असून ते जिल्हा न्यायालय-१, कळंब यांचे न्यायालयात नोंदविण्यात आले आहे आणि या अपीलाच्या सुनावणीसाठी दिनांक २८/०४/२०२५ रोजी हा दिवस निश्चीत केला आहे. तरी उपरोक्त दिवशी सकाळी १०.३० वा. या न्यायालयात हजर रहावे.

तुमच्या तर्फे तुम्ही स्वतः किंवा या अपिलात तुमच्या तर्फे काम चालविण्यास विधीद्वारे प्राधिकृत केलेली कोणीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत त्या अपीलाची सुनावणी करून निकाल देण्यात येईल.

आज दिनांक १७/०३/२०२५ रोजी माझ्या सही निशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

अधिक्षक,
जिल्हा न्यायालय-१, कळंब
**आदेशावरून**



## मशिदीबाहेर हनुमानचालिसा पठण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**मेरठ (उत्तर प्रदेश) :** कॅन्टोन्मेंट परिसरातील मशिदीजवळ हनुमान चालीसा पठण करून जातीय सलोखा बिघडवल्याप्रकरणी पोलिसांनी एका हिंदू संघटनेच्या नेत्यावर गुन्हा दाखल केला आहे. अखिल भारतीय हिंदू सुरक्षा संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा दावा करणाऱ्या सचिन सिरोही यांच्यासह काही अनोळखी व्यक्तींवर बीएनएसच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती परिमंडळ अधिकारी संतोष कुमार सिंह यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या वृत्तानुसार, सिरोही आणि त्याच्या सहकाऱ्यांनी सोमवारी मशिदीबाहेर गोंधळ घातला आणि मशिदीला बेकायदेशीर असल्याचा दावा केला. त्यानंतर त्यांनी मशिदीजवळ हनुमान चालीसा पठण केले आणि मशीद पाडण्याची धमकी दिली.



## आंध्र प्रदेशात उष्णतेची लाट कायम

**अमरावती :** आंध्र प्रदेश राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एपीएसडीएमए) राज्यातील १०८ मंडळांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तविला आहे. एपीएसडीएमएचे व्यवस्थापकीय संचालक आर. कुरमनाड यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, १०८ मंडळांपैकी श्रीकाकुलम जिल्ह्यातील १५, विजयनगरम जिल्ह्यातील २१, पार्वतीपुरम मन्यम जिल्ह्यातील १० आणि अल्लूरी सीतारामराजू जिल्ह्यातील आठ मंडळांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. याशिवाय अनाकपल्ले आणि काकीनाडा जिल्ह्यातील सात, कोनसीमा आणि गुंटूर जिल्ह्यातील तीन, पूर्व गोदावरी जिल्ह्यातील १३, एलुरू जिल्ह्यातील पाच, कृष्णा जिल्ह्यातील दोन, एनटीआर जिल्ह्यातील सहा आणि पलनाडू जिल्ह्यातील आठ मंडळांना उष्णतेच्या लाटेचा फटका बसण्याची शक्यता आहे.

## आपत्कालीन दरवाजा उघडण्याचा प्रवाशाचा प्रयत्न

**हैदराबाद :** दम्मामहून हैद्राबादला जाणाऱ्या विमानाचे आपत्कालीन प्रवेशद्वार उघडण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका प्रवाशाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खासगी एअरलाइन्सच्या केबिन क्रूच्या वतीने दाखल तक्रारीनुसार, राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर (आरजीआयए) विमान उतरण्यापूर्वी एका खासगी संस्थेचा कर्मचारी असलेल्या ५८ वर्षीय प्रवाशाने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला आणि क्रूशी वाद घातला. तक्रारीनुसार, प्रवाशाने एक्झिट कव्हर हातात घेतले आणि ते परत दुरुस्त करण्याचा प्रयत्न करत असताना इंडिकेशन लाईट बंद पडली.



## ओडिशात बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ

**भुवनेश्वर :** ओडिशात गेल्या वर्षीच्या तुलनेत २०२४ मध्ये बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ झाली असून खुनाच्या घटनांमध्ये घट झाली आहे, असे गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या श्वेतपत्रिकेत म्हटले आहे. श्वेतपत्रिकेनुसार राज्यात कॅलेंडर वर्ष २०२४ मध्ये बलात्काराच्या ३,०५४ आणि खुनाच्या १,२५८ घटनांची नोंद झाली आहे, तर २०२३ मध्ये ओडिशाच्या विविध पोलिस स्टेशनमध्ये २,८२६ बलात्कार आणि १,३६२ खुनाचे गुन्हे दाखल झाले आहेत. बलात्काराच्या घटनांमध्ये ८ टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर खुनाच्या घटनांमध्ये ७.६ टक्क्यांनी घट झाली आहे.

## 'वर्क फ्रॉम होम'च्या नावाने महिलेची १५ लाखांची फसवणूक

**ठाणे :** घरून काम करण्याचे आमिष दाखवून एका ३७ वर्षीय महिलेला १५ लाख १४ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची घटना ठाणे जिल्ह्यात घडली आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारी ते जुलै या कालावधीत डोंबिवली शहरात राहणाऱ्या पीडिते शी एका महिलेसह फसवणूक करणाऱ्यांनी संवाद साधला होता. त्यांनी तिला टेलिग्राम ॲप्लिकेशनचा ॲक्सेस उपलब्ध करून दिला आणि काही कामे ऑनलाइन पूर्ण करण्यासाठी तिला सोपवले, अशी माहिती मानपाडा पोलिस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने दिली.

# मुघलांचा वंशज फडणवीसांवर संतापला

## औरंग्याची कबर सुरक्षित ठेवण्याची केली मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीवरुन गदारोळ सुरू असताना आता या वादात थेट मुघल वंशजाची एन्ट्री झाली आहे. हिंदू संघटनांकडून औरंगजेबाची कबर पाडण्याची मागणी केली जात असताना, आता याच्या संरक्षणासाठी मुघलांचे वंशज पुढे आले आहे. औरंगजेबाच्या कबरीचं संरक्षण करण्याच्या मागणीसाठी मुघल वंशज प्रिन्स याकूब हबीबुद्दीन तुसी यांनी राष्ट्रपतींना पत्र पाठवून साकडं घातलं आहे. प्रिन्स याकूब हबीबुद्दीन मुघल कुटुंबांचे उत्तराधिकारी आहेत. त्यांनी या पत्रात त्यांनी कबरीच्या संरक्षणाची मागणी केली आहे. प्रिन्स याकूब हबीबुद्दीन तुसी यांनी हे पत्र भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, महाराष्ट्राचे राज्यपाल आणि स्थानिक पोलीस यंत्रणासह महत्त्वाच्या लोकांना पाठवलं आहे. या पत्रात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या त्या वक्तव्यावर संताप व्यक्त केला आहे.

त्याने लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, मी मुघल कुटुंबांचा उत्तराधिकारी. शेवटचे मुघल बहादूर शाह जाफर यांचा पणतू आहे. माझे पूर्वज बादशहा औरंगजेब यांची कबर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आहे. त्यांच्या इच्छेनुसार त्यांची कबर अत्यंत साधी आहे.

गेल्या काही दिवसांपासून काही लोक ही कबर उखडून फेकण्याची मागणी करत आहे. मात्र औरंगजेब यांचा जन्म भारतात झाला आणि ते भारतातच मृत्यू पावले. भारतीय संविधानानुसार प्रत्येक माणसाला या देशात राहण्याचा आणि इथेच मरण्याचा अधिकार आहे. सध्या औरंगजेबाची कबर वक्फची संपत्ती आहे आणि भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अधिपत्याखाली आहे. काही लोक इतिहासाची मोडतोड करत आहे आणि दोन समाजात वाद लावण्याचा प्रयत्न करत आहेत. असले प्रयत्न हाणून पाडण्याचे सरकारचे काम आहे. मी राष्ट्रपती महोदय यांच्या लक्षात आणून देत आहे की, मी औरंगजेबाची कबर असलेल्या जागेचा मुतवल्ली (वक्फ किंवा मशिदीच्या किंवा त्या संपत्तीचा प्रमुख) आहे. मी त्याचा संरक्षक आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, या संपत्तीचं महाराष्ट्र सरकारने आणि केंद्र सरकारने संरक्षण करावं. तसंच याबाबत योग्य ते आदेश तातडीने संबंधित यंत्रणांना द्यावेत.

छावा या चित्रपटावरुन हा वाद सुरू झाला आहे आणि देशातील वातावरण बिघडलं. त्यामुळे चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शकाविरोधात केस दाखल करणार आहे. इतिहासाशी छेडछाड करण्यात आली आहे. औरंगजेब न्यायप्रिय बादशहा होते. ते कट्टरपंथी असते तर खुलताबादहून अवघ्या पाच किलोमीटरवर असलेलं अंजठा-वेरूळ येथील एकही मूर्ती शिल्लक राहिली नसती. औरंगजेबाचा कोणताही धर्म वा समाजाशी वाद नव्हता. त्यांनी सर्व धर्माचा सन्मान केला आहे. मुघलांतील सर्व राजांपैकी औरंगजेबाने सर्वाधिक मंदिराच्या उभारणीसाठी निधी दिला आहे. यामध्ये आसाममधील कामाख्या, उज्जैन महाकाल मंदिरासाठी औरंगजेबाने निधी दिला आहे.

औरंगजेबाच्या कबरीवरुन राजकारण केलं जात आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, नागरिकांनी इतिहास वाचावा. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांविरोधातही पंतप्रधानांना पत्र लिहिलं आहे. यांच्यासारख्या काही राजकीय नेत्यांमुळे देशाची परिस्थिती बिघडली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासारख्या महत्त्वाच्या पदावर असताना देवेंद्र फडणवीसांनी दिलेल्या भडकाऊ भाषणामुळे जातीय सलोखा बिघडत आहे. त्यामुळे फडणवीसांचा राजीनामा घ्यावा अशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.

### हिंदू-मुस्लीम नव्हे बादशहांमधील वाद..

● हा बादशहा-बादशहांमधील वाद होता. हा हिंदू-मुस्लीम वाद कधीच नव्हता. औरंगजेबाच्या सैन्यात हिंदू मोठ्या पदावर होते. तर दुसरीकडे शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक मुस्लीमही होते. हा वाद हिंदू-मुस्लिमांचा नाही. शिवाजी महाराज आणि औरंगजेबामधील वाद हा बादशहा-बादशहांमधील होता. यात हिंदू-मुस्लीम वाद नाही. शाहू महाराज 18 वर्षे औरंगजेबाच्या छावणीत राहिले. जर औरंगजेब इतका कट्टर असता तर त्यांनी शाहू महाराजांना इतकी वर्षे का सोबत ठेवलं असतं. हे सर्व इतिहासात नमूद आहे. हिंदू असो वा मुस्लीम, सर्वांनी एकमेकांच्या धर्मांचा मान राखावा आणि कोणाच्याही धार्मिक भावना दुखावू नये, असेही त्याने म्हटले आहे.

# लंडन ते कोलकाता थेट विमान हवे

## ममता बॅनर्जी यांची इंग्लंडमध्ये मागणी

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी नुकतीच ब्रिटिश एअरवेजला लंडन ते कोलकाता दरम्यान थेट विमानसेवा सुरू करण्याची विनंती केली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी दोन दिवसांच्या ब्रिटन दौऱ्यावर असून त्यांनी ब्रिटीश कंपन्यांना राज्यात गुंतवणुकीचे आमंत्रण दिले आहे. दरम्यान, सीएम ममता यांनी लंडनमधील ब्रिटिश उच्चायुक्तालयासोबत बैठक घेतली आहे. या आठवड्यात ऑक्सफर्ड विद्यापीठात व्याख्यान देण्याचे आमंत्रणही त्यांना मिळाले आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मंगळवारी लंडनमध्ये झालेल्या बैठकीत ममता बॅनर्जी यांनी कोलकाता ते लंडन दरम्यान थेट विमानसेवा नसल्यामुळे लोकांना भेडसावणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला.

ब्रिटिश एअरवेजमधील माझ्या मित्रांना माझी नम्र विनंती आहे. आपण आम्हाला थेट उड्डाण प्रदान करू शकता? ब्रिटिश एअरवेज पूर्वी ही उड्डाणे चालवत होती पण आम्ही सत्तेत येण्यापूर्वी ही सेवा बंद करण्यात आली होती. कारण काय होतं माहित नाही. पण आता ते गरजेचं झालं आहे. जो कोणी आमच्याशी संपर्क साधेल त्याला आम्ही इंधन करात सवलत देऊ.

ब्रिटिश एअरवेजने जवळपास ८० वर्षे काम केल्यानंतर मार्च २००९ मध्ये कोलकाता ते लंडन विमानसेवा बंद केली. २००५ मध्ये एअर इंडियाने कोलकाता ते लंडन दरम्यान थेट विमानसेवा सुरू केली. मात्र, सप्टेंबर २००८ मध्ये लोड फॅक्टरमुळे ही सेवा बंद करण्यात आली.

लंडनमध्ये 'अपॉर्च्युनिटीज इन पश्चिम बंगाल' या विषयावर आयोजित कार्यक्रमात बोलताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, ब्रिटिश उद्योग हरित तंत्रज्ञान, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात राज्याला मदत करू शकतात. गेल्या काही वर्षांत त्यांच्या सरकारने आयोजित केलेल्या बंगाल ग्लोबल बिझनेस समिटमध्ये राज्याला २३ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या परिषदेत ब्रिटन अनेकदा भागीदार देश असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# थेट यूपीआयद्वारे मिळतील पीएफचे पूर्ण पैसे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** तुम्ही सरकारी किंवा कोणत्याही खासगी क्षेत्रात काम करत असाल आणि तुमचा पीएफ दर महिन्याला कापला जात असेल, तर ही बातमी फक्त तुमच्यासाठी आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) आता यूपीआयद्वारे पीएफ दाव्याची(क्लेम) प्रक्रिया वेगवान करणार आहे.

कामगार आणि रोजगार सचिव सुमिता डावरा यांनी सांगितले की, यूपीआय मे महिन्याच्या अखेरीस ईपीएफओ प्रणालीमध्ये जोडले जाईल. याचा फायदा ७.५ कोटी सक्रिय ईपीएफओ सदस्यांना होईल. त्यांना त्यांचे पैसे पीएफ खात्यात त्वरित हस्तांतरित करता येतील. १ लाख रुपयांपर्यंतचे क्लेम आधीच ऑटोमेडेड आहेत, आता ते यूपीआयमुळे आणखी फास्ट होतील. याशिवाय, खातेधारक ईपीएफओ खाते त्यांच्या यूपीआय ॲप्सशी लिंक करू शकतील (जसे गुगुल पे, फोन पे, पेटीएम). ऑटो-क्लेम सुविधा देखील उपलब्ध असेल. म्हणजे सभासद पात्र असल्यास लगेच पैसे जमा केले जातील. आतापर्यंत दाव्याच्या प्रक्रियेस ३ दिवस लागतात, यूपीआयनंतर तुम्हाला काही मिनिटांत पैसे मिळतील.

ईपीएफओने प्रथमच केंद्रीकृत डेटाबेस तयार केला आहे, जो पूर्णपणे स्थिर होण्यासाठी २-३ आठवडे लागतील. ७८ लाख पेन्शनधारकांना आता कोणत्याही बँकेतून पेन्शन मिळू शकेल (पूर्वी फक्त काही बँकांना सूचित केले गेले होते). आरबीआयच्या सल्ल्याने केंद्रीकृत पेन्शन प्रणाली लागू करण्यात आली आहे.

एम्प्लॉयमेंट लिंक्ड इन्सेंटिव्ह योजनेचे बजेट १०,००० कोटी रुपयांवरून २०,००० कोटी रुपये करण्यात आले आहे. नोकरदार युवक, विद्यमान कर्मचारी आणि प्लॅटफॉर्म कामगारांना याचा फायदा होणार आहे. प्लॅटफॉर्म कामगारांना ऑनलाईन योजनेअंतर्गत मोफत आरोग्य विमा देखील मिळेळ.

### सुविधा कधी उपलब्ध होईल?

● नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून सूचना घेतल्यानंतर ईपीएफओने हा प्रस्ताव तयार केला आहे. मे महिन्याच्या अखेरीस फ्रंटएंड चाचणीनंतर यूपीआय लॉन्च केले जाईल. आतापर्यंत एटीएममधून पीएफचे पैसे काढण्याची चर्चा सुरू होती. मात्र, आता पीएफ खाते थेट यूपीआयशी जोडले जाईल. म्हणजेच, लोकांना एटीएमची गरजच भासणार नाही.

# संजय कुमार मिश्रांची पीएम ईएसी सचिवपदी वर्णी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सक्तवसुली संचालनालयाचे (ईडी) माजी प्रमुख संजय कुमार मिश्रा यांची पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेत (ईएसी-पीएम) सचिव पदावर पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवारी जाहीर झालेल्या नियुक्तीची अधिकृत घोषणा होईपर्यंत कमालीची गोपनीयता पाळण्यात आली होती. संजय कुमार मिश्रा यांची २०१८ मध्ये ईडी प्रमुखपदी नियुक्ती झाली होती. यानंतर त्यांना वारंवार मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर अखेर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना तिसऱ्यांदा दिलेली मुदतवाढ 'बेकायदेशीर' घोषित केली होती. यानंतर आता त्यांची आर्थिक सल्लागार परिषदेत (ईएसी-पीएम) सचिव पदी नियुक्ती करण्यात आले आहे.

संजय कुमार मिश्रा हे उत्तर प्रदेशातील १९८४ च्या बॅचचे भारतीय महसूल सेवा अधिकारी आहेत. २०१८ मध्ये ईडी प्रमुखपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. यांच्या चौकशीसह अनेक हाय-प्रोफाइल प्रकरणांचा तपास केला होता.



**पुणे** सुजाता भोकरे यांनी १३ वर्षांच्या यशस्वी व्यवसायानंतर यशश्री क्रिएशन या नव्या दालनाची निर्मिती केली आहे. त्याचे उद्घाटन ज्येष्ठ वास्तूशास्त्र सल्लागार उमेश चंद्रकांत जोशी (धाराशिव) यांच्या हस्ते फित कापून झाले.

# चारधाम यात्रेसाठी ८ लाख भाविकांची नोंदणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** चारधाम यात्रेला सुरुवात होण्याची तारीख जवळ आली असून, उत्तराखंड सरकारने त्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, २१ मार्चपासून सुरू झालेल्या चारधाम ऑनलाइन नोंदणीचा आकडा ८ लाखांच्या जवळपास पोहोचला आहे. चार धामांच्या दर्शनासाठी भाविकांमध्ये मोठा उत्साह आहे. यावर्षी यात्रेचा कालावधी १० दिवसांनी वाढवण्यात आला आहे. चारधाम यात्रेसाठी भाविकांच्या नोंदणीची संख्या ७,४७,६९९ वर पोहोचली आहे.

मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत यमुनोत्री धामसाठी १,३४,३७६, गंगोत्रीसाठी १,३८,२५८, केदारनाथसाठी २,४२,०३८ आणि बद्रीनाथ धामसाठी २,२४,४९३ भाविकांनी नोंदणी केली होती.

गेल्या वर्षी चारधामला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या ४८ लाख इतकी होती. यंदाच्या वर्षी भाविकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. यात्रेकरूंची प्रचंड गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन उत्तराखंड सरकारही सज्ज झाले आहे. यापूर्वी मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन यात्रेशी संबंधित सर्व तयारी वेळेत पूर्ण करण्याच्या कडक सूचना दिल्या होत्या. रस्ते, वीज, पाणी, आरोग्य यावर सरकारचे विशेष लक्ष आहे. केदारनाथ धामचे कपाट उघडण्याआधी प्रशासनही सज्ज झाले आहे. यात्रा मार्गावरील बर्फ काढण्याचे कामही सुरू झाले आहे. भाविकांसाठी मार्ग मोकळा करण्यासाठी बर्फ कापला जात आहे. पादचारी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी बीआरओआरने ५० हून अधिक मजुरांची नेमणूक केली आहे.

**तारखा जाहीर :** उत्तराखंडमधील चार धामचे दरवाजे उघडण्याच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. उत्तरकाशी जिल्ह्यातील गंगोत्री आणि यमुनोत्री धाम येथे चार धामांपैकी पहिले धाम उघडले जाणार आहे. गंगोत्री-यमुनोत्री मंदिराचे कपाट ३० एप्रिलला उघडले जाणार आहेत. रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथ धामचे कपाट २ मे रोजी तर बद्रीनाथ धामचे कपाट ४ मे रोजी उघडले जातील. हेमकुंड साहिबचे कपाट २५ मे रोजी उघडणार आहेत. यंदाची यात्रा ३० एप्रिलपासून सुरू होणार आहे. गेल्या वर्षी १० मे रोजी या यात्रेला सुरुवात झाली होती. दर्शनासाठी अधिक वेळ असल्याने भाविकांच्या संख्येचा नवा विक्रम रचला जाण्याची शक्यता आहे.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूरला मंजुरी?

## अर्थसंकल्पात केली ६ हजार ४९९ कोटींची तरतूद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** गेली २५ वर्षे लालफितीत अडकून पडलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर या रस्त्याच्या सुमारे २५ किलोमीटर लांबीच्या चारपदरी रस्त्याचे कामासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतीच अर्थसंकल्पात ६ हजार ४९९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. २५ वर्षे लालफितीत अडकून पडलेल्या या रस्त्याचे काम आता तरी मार्गी लागणार का, असा सवाल परिसरातील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

पुणे-नाशिक महामार्गावरील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर चाकण येथील तळेगाव चौकातील सेवारस्त्यांची रुंदी वाढविण्यात आली आहे. चौकात वाहनांच्या लांबपर्यंत रांगा लागू नयेत आणि वाहने चौकातून पुढे सहजपणे जावीत, हा त्यामागचा उद्देश आहे. मात्र, या उपाययोजना काही अंशीच परिणामकारक ठरत असल्याचे वाहतूक कोंडीने स्पष्ट झाले आहे. त्यामुळे चाकणमधील प्रस्तावित बाह्यवळण मार्ग आणि रिंगरोड झाल्यास या महामार्गांची प्रस्तावित कामे होण्यापूर्वी वाहतुकीच्या कोंडीतून सुटका होईल, अशी अपेक्षा नागरिक, प्रवासी व्यक्त करीत आहेत.

पुणे जिल्ह्यासाठी रिंगरोड प्रस्तावित आहे. त्याचे काम सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. या रस्त्यामुळे या भागातील वाहतूक कोंडी दूर होऊन राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग, पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग याची थेट कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. खेड तालुक्यातील खालुंब्रे, निघोजे, मोई, कुरळी, चिंबळी, केळगाव, आळंदी देवाची, चऱ्होली खुर्द, धानोरे, सोळू, मरकळ, गोलेगाव आणि मावळ तालुक्यांतील परंदवाडी, उर्से, तळेगाव दाभाडे, वडगाव, कातवी, आंबी, वराळे, आकुर्डी, नाणोलीतर्फे चाकण, इंदुरी, सुदवडी, सुदुंबरे या गावांतून रिंगरोड जाणार आहे. यामुळे वाहतूक कोंडीतून मुक्तता होणार असल्याचे सांगितले जात आहे.

चाकण औद्योगिक भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी चाकणजवळील रासे फाटा, कडाचीवाडी, मेदनकरवाडी भागातून प्रस्तावित बाह्यवळण मार्गाची हद्द निश्चिती करण्यात येणार असल्याचे प्रशासनातील अधिकारी सांगत आहेत. मागील अनेक वर्षे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) बाह्यवळण मार्गाचे आश्वासन देत असले, तरी प्रत्यक्षात काहीही काम झालेले नाही. वडगाव-तळेगाव-चाकण ते शिक्रापूर या महामार्गावरील प्रचंड अवजड वाहतूक, नागमोडी वळणे, कमी रुंदी आणि अपघातप्रवण ठिकाणे, यामुळे हा महामार्ग धोकादायक ठरत आहे. या रस्त्याचे गेली अनेक वर्षे लालफितीत अडकलेले काम सुरू होण्याची नागरिकांना अपेक्षा होती.



### जमीन अधिग्रहणला येणार वेग?

● मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर आता जमीन अधिग्रहण आणि निविदा प्रक्रियेला वेग येणार आहे. तळेगाव ते चाकण या २५ किलोमीटर लांबीत चारपदरी उन्नत मार्ग प्रस्तावित आहे. तळेगाव, चाकण ते शिक्रापूर हा एकूण ५३ किलोमीटर लांबीचा महामार्ग आहे. हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ (मुंबई-पुणे महामार्गाला) तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ पुणे-संभाजीनगर महामार्गाशी जोडणार आहे. यामुळे पुण्याजवळील वाहतूक कोंडी कमी होईल. या प्रकल्पामध्ये सध्याच्या दुपदरी रस्त्याचे चौपदरी उन्नत महामार्गात रूपांतर करणे आणि तळेगाव ते चाकणदरम्यान महत्त्वाच्या ठिकाणी उड्डाणपूल बांधणे समाविष्ट आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे ६,४९९ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, तो टोलवसुली किंवा कर्जाद्वारे उभारला जाणार आहे. एमएसआयडीसी या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार असल्याचे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून स्पष्ट केले आहे.

# कागदपत्रात फेरफार करत गैरव्यवहार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** शिरूर तालुक्यातील बेट भागात मलठण येथील तीन जणांनी संगनमताने जमिनीच्या कागदपत्रात फेरफार करून बोगस कागदपत्रे अधिकाऱ्यांना दाखवून टाकळी हाजी येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत अपहार करून एक महिन्यात सदर अपहाराची रक्कम परत बँकेत भरणा केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या बाबत लेखा परीक्षक अधिकारी किरण ज्ञानदेव मोरे (रा. पारगाव साලू-माලू) यांनी शिरूर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, दि. १० जानेवारी २०२३ ते ०९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान रावडेवाडी येथील गुरुदत्त विविध कार्यकारी सेवा या संस्थेमध्ये कर्जदार भरत गौतम राजगुरु व मंगेश हरीशचंद्र दंडवते (दोघे रा. मलठण ता. शिरुर) यांनी खोटे व बनावट ७-१२, ८ अ उतारे व गाव नमुना ६ (फेरफार) सादर करत, त्या आधारे प्रत्येकी रुपये २,९०,४०० रुपयांचे कर्ज मंजुर करून घेवुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या टाकळी हाजी शाखेतुन एकुण ५,८०,४०० इतक्या रक्कमेची उचल केली. दिनांक ९ फेब्रुवारी व दिनांक ८ फेब्रुवारी २०२३ रोजी सदर रकमेचा संस्थेच्या बँक खाती भरणा करुन बँक शाखा, संस्था, संस्था पदाधिकारी व व्यवस्थापक समिती सदस्य आणि बँक अधिकारी यांची विश्वासघाताने फसवणुक केली. संस्था सचिव अमोल गौतम राजगुरु यांनी सचिव पदाचा दुरपयोग करुन, संस्था दप्तरी दिशाभूल करणाऱ्या खोट्या व बनावट नोंदी जाणीवपूर्वक करुन अपहार करणाऱ्या कर्जदारांना सहाय्य केले आहे.

भरत गौतम राजगुरु, मंगेश हरीशचंद्र दंडवते, अमोल गौतम राजगुरु यांच्या विरुध्द किरण ज्ञानदेव मोरे शासना तर्फे कायदेशीर फिर्याद दिली आहे.

मोरे यांच्या फिर्यादी नुसार शिरूर पोलिसांनी या अपहार प्रकरणी आरोपींवर कलम ३४, ४०३, ४०६, ४२०, ४६८, ४७१ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कारंडे हे करीत आहेत.

### कायद्याचा धाकच नाही

शिरूर तालुक्यामध्ये गुन्हेगारांवरती कायद्याचा धाकच राहिला नसल्याचे दिसून येत आहे. शिरूर, शिक्रापूर व रांजणगाव पोलीस स्टेशनमध्ये रोज असंख्य गुन्हे दाखल होत आहेत. अवैध व्यवसाय, वाढती गुन्हेगारी ही शिरूर तालुक्यासाठी मोठी डोकेदुखी झाली आहे. औद्योगीकरणामुळे रांजणगाव येथे पोलीस स्टेशनची निर्मिती झाली. त्याच पोलीस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर उपविभागीय कार्यालयही सुरू झाले. मात्र, कायद्याचा धाक वाढण्याऐवजी शिरूर तालुक्यात तीनही पोलीस स्टेशन हद्दीमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

# शिरुर येथे हॉटेलचालक महिलेचे गंठण हिसकावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती, ता. शिरुर येथील धनगरवाडा स्नॅक्स सेंटर हॉटेलचालक वंदना शेटे या त्यांच्या धनगरवाडा स्नॅक्स सेंटर हॉटेलमध्ये असताना, आलिशान दुचाकीहुन दोन युवक आले. एक युवक हॉटेल पुढे दुचाकी घेऊन उभा राहिला तर एक युवक हॉटेलमध्ये आला.

त्याने वंदना शेटे यांना पाण्याची बाटली मागितली. त्यानंतर पाणी बाटली घेतल्यानंतर पुन्हा चिक्की मागितली. दरम्यान, वंदना या पैसे ड्रॉवरमध्ये ठेवत असताना सदर युवकाने, वंदना



यांच्या गळ्यातील गंठण हिसकावून तो दुचाकीवर बसला आणि दोघेजण भरधाव वेगाने निघून गेले. याबाबत वंदना रोहिदास शेटे (३३, रा. पिंपरी दुमाला ता. शिरूर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी दोन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल केला आहे.

# कारेगाव येथील आठवडे बाजारात वसुलीचे उद्योग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** कारेगाव येथील दर रविवारी भरणाऱ्या आठवडे बाजारात स्वतःचा माल विक्रीसाठी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांकडुन कोणताही संबंध नसताना, जबरदस्तीने जागेच्या भाड्यापोटी पैसे वसुल करणाऱ्या सोमनाथ ऊर्फ बंटी नवले या शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यासह ६ ते ७ जणांच्या विरोधात रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशनला खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत अण्णापुर येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश यशवंत वाळुंज (वय ३७) रा. आण्णापुर, ता. शिरुर, जि. पुणे यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली असुन शिरुर-आंबेगाव शिवसेना (शिंदे गट) युवा उपप्रमुख सोमनाथ ऊर्फ बंटी नवले याच्यासह ६ ते ७ जणांच्या विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजणगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारेगावच्या हद्दीत आठवडे बाजारामध्ये, हॉटेल शेतकरी भोजनालय व टिपी मार्केटच्यामधून जाणाऱ्या शासकीय जागेतील रस्त्याच्या कडेला आठवडे बाजाराच्या दिवशी निलेश वाळुंज आणि त्यांची आई मंदा वाळुंज असे दोघेजण स्वतःच्या शेतात पिकविलेला कोबी विकण्यासाठी आले होते. तसेच इतर शेतकरी व महिल यांनी देखील त्यांनी पिकविलेला शेतातील माल बाजारामध्ये विक्रीसाठी आणलेला होता. त्यावेळी सायंकाळी ७:१५ वाजण्याच्या दरम्यान सोमनाथ उर्फ बंटी नवले आणि त्याच्या बरोबर त्याचे इतर ६ ते ७ साथीदार बाजारात आले. त्यापैकी बंटी नवले हा फिर्यादी यांच्या आईला म्हणाला की, येथे बसायचे असेल तर तुला ५० रुपये द्यावे लागतील. त्यानंतर फिर्यादी यांच्या आईने पैसे देण्यास नकार दिला म्हणून, त्याने आईच्या हातातील पन्नास रूपयांची नोट दादागिरी करुन घेतली. तसेच या गुंड प्रवृत्तीच्या दादागिरी करणाऱ्या ७ ते ८ जणांच्या टोळक्याने इतर शेतकरी आणि विक्रेते यांच्याकडुनही दमदाटी करुन जबरदस्तीने ४०, ५० ते १०० रुपये अशा पटीत बेकायदेशीर पैशाची वसुली केली. यामुळे शेतकरी व व्यापारी देखील घाबरुन गेले. काहींनी पैसे द्यायला नकार दिला असता, हे टोळके त्यांचा भाजीपाला घेवुन गेले.

या घटनेला विरोध केला असता त्यांनी फिर्यादीला दम देत, ही जागा आम्हाला सरकारने वापरायला दिली आहे, याचे पैसे दिले नाही तर परत तुम्ही कसे या ठिकाणी बसता ते एकेकाला बघतोच असा दम दिला. तसेच पोलीसांना आम्ही घाबरत नाही, असेही त्यांनी सांगितले. रांजणगाव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार संजय गायकवाड हे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# नाझरेचे पाणी पिण्यासाठी राखीव ठेवावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** तीर्थक्षेत्र जेजुरी नगरी व सुमारे ५६ गावांना नाझरे धरणातून पिण्याचे पाणी पुरवठा केला जातो.या धरणातील पाणीसाठा कमी होत असून जुलै महिन्या अखेर हे पाणी पिण्यासाठी राखीव ठेवावे अशी मागणी भाजपाच्या नेत्या व कोल्हापूर भाजपाच्या प्रभारी अध्यक्षा अलका शिंदे यांनी नाझरे पाटबंधारे शाखा व जेजुरी पालिकेला निवेदन देवून केली आहे.

जेजुरी शहराला नाझरे धरणातून पिण्याचे पाणी उपलब्ध होते. जेजुरी नगरपालिकेची लोकसंख्या पंचवीस हजार असून दररोज हजारो भाविक येथे खंडोबा देवाच्या दर्शनासाठी व कुलधर्म कुलाचारांसाठी येत असतात. गेली दोन वर्षे अल्प पावसामुळे दुष्काळाला तोंड द्यावे लागले. आठ दिवसातून एकदा पाणी दिले गेले. याबाबत जेजुरी कर नागरिकांनी पालिकेला सहकार्य केले. सध्या दररोज पाण्याची मागणी असताना चार दिवसातून एकदा पाणी उपलब्ध होते. पाणी टंचाईला जेजुरी शहराला सतत सामोरे जावे लागत आहे.

नाझरे धरणातून शेतीला ही पाणी दिले जाते फेब्रुवारी अखेर शेतीचे आवर्तन दिले गेले आहे. यापुढे पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. परंतु या धरणातून शेतीसाठी काही गावांना पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजले आहे.शेतीला पाणी आवश्यक आहे मात्र सध्याच्या काळात पिण्यासाठी पाणी महत्वाचे आहे.जुलै अखेर शेतीला पाणी न देता फक्त पिण्यासाठी पाणी राखीव ठेवावे. जुलै महिन्यापर्यंत नाझरे जलाशयातील पाणी नाझरे जलाशयावर अवलंबून असणाऱ्या नागरिकांना पिण्यासाठीच राखीव ठेवावे ही अन्यथा भाजपाच्या वतीने आंदोलन केले जाईल असे अलका शिंदे यांनी सांगितले.

या बाबत नाझरे पाटबंधारे विभागाचे शाखा प्रमुख अनिल घोडके यांच्याशी संपर्क साधला असता नाझरे धरणात ३५६ दशलक्ष घनफूट पाणीसाठा साठा म्हणजेच २७ टक्के पाणीसाठा असून, जुलै अखेर नाझरे धरणावर अवलंबून असणाऱ्या सर्व गावांना पाणी उपलब्ध होईल एवढं पाणीसाठा राखीव ठेवण्यात येणार आहे. उर्वरित पाणी धरणाखालील नाझरे, जवळार्जून व मावडी गावातील मर्यादित शेतीला देण्यात येणार असल्याचे सांगितले.



**पुरंदर** जयाद्री कुशीत विराजमान असलेल्या मल्हारी मार्तंड गडावरून उगवत्या सूर्यनारायणाचे विहंगम दृश्य लक्ष वेधून घेणारे ठरते. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)

# इंदापूर बस स्टँडसमोर नो पार्किंग झोन गरजेचा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर बस स्थानकामध्ये सध्या काम सुरू असल्याने, या स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या बसेस एकाच प्रवेशद्वारातून ये जा करत आहेत. पुणे बाजूने येणाऱ्या बसेस स्थानकात येताना कमी अडचण येते. मात्र, सोलापूर बाजूने येणाऱ्या बसेसला मात्र स्थानकात घेताना खूप अडचणी येत आहेत. त्यामुळे येथे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. येथे सतत वाहतूक कोंडी होत आहे. अपघात व वाहतूक कोंडी टाळण्यासाठी येथे नो पार्किंग झोनची तातडीने अंमलबजावणी करणे तसेच सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाहतूक पोलीस ठेवणे गरजेचे आहे.

मंत्री दत्तात्रय भरणे यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून इंदापूर बस स्थानकात विविध सुविधा मंजूर करून घेतल्या आहेत. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी बस स्थानकात महिला पोलीस नेमण्याची सूचना केली आहे. मात्र, सध्या इंदापूर बस स्थानकात देखभाल दुरुस्तीची कामे सुरू असल्याने, संपूर्ण वाहतूक एकाच प्रवेशद्वारातून होत आहे. त्यामुळे या प्रवेशद्वारावर वाहतूक कोंडी होत आहे. येथे एसटी कर्मचारी वाहतूक नियंत्रण करण्यासाठी काम करत आहेत. मात्र, या प्रवेशद्वारावर दुतर्फा नागरिक वाहतूक नियमांचे पालन न करता आपल्या दुचाकी, चारचाकी गाड्या बेशिस्त पद्धतीने उभा करून दुकानात खरेदीसाठी जात आहेत.

बस स्थानक हे इंदापूर शहरातून जाणाऱ्या जुन्या पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर असून, त्याचे आता राज्यमार्गात रूपांतर झाले आहे. या रस्त्यावर विविध कार्यालये असल्याने, तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची मोठी गर्दी असते. तशातच, या रस्त्यावर दुतर्फा फूटपाथ तसेच मध्यभागी रस्ते दुभाजक उभारल्याने रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. या रस्त्यावर अनेक पथारीवाले, फळगाडे, विविध खाद्यपदार्थ गाडीवाले यांनी अतिक्रमण केले आहे. शहरात अधिकृत वाहनतळ नसल्याने, नागरिक बेशिस्त पद्धतीने गाड्या रस्त्यावर उभा करत आहेत.

बस स्थानकात रोज तीनशेहून जास्त गाड्या येतात जातात. बस स्थानकाचे काम आणखी ४ ते ५ महिने सुरू राहणार असून शिवाई, शिवशाही या गाड्या आकाराने मोठ्या असल्याने त्या गाड्या स्थानकात आत घेताना, बाहेर काढताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. नागरिक तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बस स्थानक प्रवेशद्वारासमोर नो पार्किंग झोनची तातडीने अंमलबजावणी करणे तसेच येथे वाहतूक नियंत्रक पोलीस ठेवणे ही काळाची गरज आहे.

## दरेकरवाडीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासला इतिहास



**शिक्रापूर :** दरेकरवाडी, ता. शिरुर येथील शालेय विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराज यांचा ज्वलंत इतिहास माहिती होण्यासाठी नुकतेच छावा चित्रपट दाखवण्यात आला असून, विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीचे दर्शन देत छत्रपतींचा इतिहासाची माहिती देण्याचा अनोखा उपक्रम माजी उपसरपंच हिरामण दरेकर व संजय शिवले यांनी राबविला आहे. दरेकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास दाखवण्यासाठी नुकतेच छत्रपती संभाजी महाराज समाधी दर्शन सोहळा माजी उपसरपंच हिरामण दरेकर व संजय शिवले यांच्या पुढाकाराने राबवण्यात आला. माजी उपसरपंच हिरामण दरेकर, उद्योजक निखिल दरेकर, दिलीप दरेकर, तेजस दरेकर, सुजल जगताप, ऋषी दरेकर, बबलू दरेकर, नवनाथ आवटे, सखाराम शेलार, नवनाथ दरेकर, मुख्याध्यापक काळुराम पिंगळे, आरती दरेकर, स्वाती दरेकर, अमोल कुंभार, रूपाली राऊत, छाया मोरे, उषा बडेकर यांसह आदी पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापक काळूराम पिंगळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## नामदेव थोरात यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील प्रगतशील शेतकरी व उद्योजक नामदेव काशिनाथ थोरात यांची श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार निरगुडसर गावचे लोकनियुक्त रवींद्र वळसे पाटील व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. यात कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर यांच्या शिवनेर पॅनलच्या २१ जागांपैकी १७ जागा बिनविरोध झाल्या, तर चार जागासाठी झालेल्या मतदानात सुद्धा शिवनेर पॅनलच्या चारही जागा दहा हजारापेक्षा जास्त मताधिक्याने विजयी झाल्या. विरोधकांना फक्त ३५० मतदानांवर समाधान मानावे लागले. या संचालक मंडळात आंबेगाव तालुक्यातील नामदेव थोरात (निरगुडसर), यशराज काळे (घोडेगाव), दत्तात्रय थोरात (चांडोली) हे तीन संचालक बिनविरोध निवडून आले आहे. नामदेव काशिनाथ थोरात हे तिसऱ्यांदा बिनविरोध निवडून आल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार निरगुडसर गावचे लोकनियुक्त सरपंच रवींद्र वळसे पाटील व परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी हेमंत वळसे पाटील, स्वप्निल वळसे पाटील, संदीप थोरात, अण्णा गायकवाड, बाळासाहेब थोरात, पोपट लोले, वेताळे गावचे माजी सरपंच बंडू बोंबले, संतोष भोजने यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी संचालक नामदेव थोरात म्हणाले की, आंबेगाव तालुक्यात जास्तीत जास्त ऊस लागवड करण्यासाठी प्रयत्न केला जाईल पुढील गळीत हंगामात ऊस तोडीचे योग्य नियोजन करून वेळेत ऊसतोड केली जाईल.

## वाढत्या उन्हाचा शेळया, मेढयांना फटका



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यासह तालुक्याच्या पूर्व भागात वाढत्या उन्हाचा फटका पिकांन बरोबर शेळ्या,मेंढया,जनावरांसुद्धा बसत आहे.त्यामुळे वाढत्या उन्हाचा फटका सहन होत नसल्याने शेळ्या,मेंढया जनावरे झाडांच्या सावलीचा आश्रय घेऊन विश्रांनी करताना दिसतात. गेल्या काही दिवसांपासून लोणी,धामणी,लाखणगाव, वडगावपीर परिसरात उष्णतेत-तापमानात झपाटयाने वाढ होऊन ३६ ते ३८ अंशांपर्यंत तापमानात वाढ झाल्याने शेळ्या,मेढ्यां,जनावरांसुद्धा याचा फटका बसत असल्याने ते सावलीचा आश्रय घेतात. विशेषता सकाळी अकरा ते चार वाजपर्यंत उन्हाचा फार कडाका वाढल्याने त्याचा शेतीच्या कामकाजावर सुद्धा परिणाम झाल्याचे दिसते.

## महिलेचे दागिने लंपास

**शिक्रापूर :** शिक्रापूर, ता. शिरुर माहेर असलेली पूजा जगताप ही महिला माहेरी आल्यानंतर, सासरी जात असताना तिने तिचे तीन तोळे वजनाचे गंठण पर्समध्ये ठेवून पर्स पिशवीमध्ये ठेवली होती. चाकण चौकातील बस स्थानकाजवळून बस आल्यानंतर पूजा या बसमध्ये बसल्या असता, त्यांना दागिने ठेवलेली पर्स दिसली नाही. त्यामुळे त्यांनी आजुबाजुला पाहणी केली असता, पर्स चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत पूजा धनंजय जगताप (२५, रा. काळेपडळ हडपसर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

# जमिनीसाठी ५ पट मोबदला द्या

## कदमवाकवस्ती येथील शेतकऱ्यांची भूमिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** विकासासाठी आमचा कोणाचाही विरोध नाही. रिंगरोड करण्यासाठी लागेल, तेवढ्या आमच्या जमिनी घ्या. पण मोबदला मात्र दोन अडीच पटीने नव्हे, तर रेडी रेकनरच्या पाच पटीने मिळाला पाहिजे, अशी भूमिका कदमवाकवस्ती येथील शेतकऱ्यांनी घेतली असून, तशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

प्रारुप विकास योजनेतील ६५ मीटर रुंद रस्त्यासाठी सन २०१५ च्या नवीन भूसंपादन अधिनियमाव्दारे खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करावयाच्या जमीनीच्या भूसंपादन या प्रस्तावासंदर्भात कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील ग्रामपंचायतीच्या मैदानात प्रशासन व शेतकरी यांच्यामध्ये प्राथमिक बैठक दुपारी एक वाजण्याच्या सुमारास पार पडली. यावेळी शेतकऱ्यांनी आपली भूमिका मांडली.

यावेळी पुणे भूसंपादन उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, भूसंपादन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अव्वल कारकून विद्या गायकवाड, सुरेखा काकडे, एकनाथ ढाके, मंडलाधिकारी योगिता गायकवाड, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधीकरणचे कार्यकारी अभियंता अरविंद माळी, वरिष्ठ अभियंता अमित हस्ते, तहसीलदार आशा होळकर, पुणे जिल्हा भूमी अभिलेखचे निरीक्षक जयसिंग गाडे, लिपिक रोहित चोपडे, भूकरमापक स्नेहा भिसे, मंडलाधिकारी लक्ष्मण बांडे आदी अधिकारी उपस्थित होते.

पुणे रिंग रोड हा ६५ मीटरचा असून बावडी, लोहगाव, वाघोली, मांजरी खुर्द, कदमवाकवस्ती येथील रिव्हर व्ह्यू सिटीच्या जवळून पिराच्या मंदिरापासून फुरसुंगी व पुढे वडकीच्या दिशेने जाणार आहे. या रिंगरोडमध्ये कदमवाकवस्ती येथील शेकडो शेतकऱ्यांची अंदाजे १७ एकर जमीन या रस्त्यामध्ये जाणार आहे. प्रशासनाला जमीन खरेदी करून क्षेत्र विकत घ्यायचे आहे.

पुणे भूसंपादन उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे म्हणाले की, वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी रिंग रोड तयार करण्यात येत आहे. यामध्ये कदमवाकवस्ती येथील अनेक शेतकऱ्यांचे क्षेत्र जात आहे. त्याचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी लोकहित व विकासासाठी क्षेत्र देऊन सहकार्य करावे.

तसेच या क्षेत्राच्या बदल्यात शेतकऱ्यांना शासनाकडून रेडी रेकनरच्या अडीच पटीने मोबदला देण्यात येणार आहे, असेही पांढरे यांनी सांगितले. याला उत्तर देताना अनेक शेतकरी आक्रमक झाले.

क्षेत्र देण्यासाठी आमची काहीही अडचण नाही. पण रेडी रेकनरच्या अडीच पट मोबदला आम्हाला मान्य नाही. जर शासनाने रेडी रेकनरच्या ५ पटीने मोबदला दिला, तरच आम्ही आमच्या जमिनी देऊ. अन्यथा आम्ही जमिनी देणार नाहीत. तसेच सर्कल जर रद्द केले तर व्यावसायिकांची दुकाने व शेतकऱ्यांची घरे वाचतील, असा इशाराच शेतकऱ्यांनी दिला.



### शेतकऱ्यांनी केल्या तक्रारी

● शेतकऱ्यांनी पुणे-सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरण, रिंग रोड, शिवरस्ता याबाबतच्या तक्रारी अधिकाऱ्यांना सांगितल्या. तसेच काही शेतकऱ्यांचे क्षेत्र रिंग रोडमध्ये गेले आहे. मात्र त्यांचे या यादीत नावे नाहीत. मग त्यांना मोबदला मिळणार का? यावेळी पीएमआरडीए व भूसंपादनाच्या अधिकाऱ्यांनी सूचनांची नोंद करून घेतली आहे. यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष माधव काळभोर, हवेली पंचायत समितीचे माजी सभापती अनिल टिळेकर, उद्योजक बाळासाहेब भोसले, गणपत चावट, चित्तरंजन गायकवाड, कदमवाकवस्तीचे उपसरपंच नासिर पठाण, सदस्य आकाश काळभोर, माजी उपसरपंच ऋषिकेश काळभोर, उदय काळभोर, सुशील काळभोर तुषार काळभोर, ग्रामसेवक अमोल घोळवे व शेतकरी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एफआरपीची थकबाकी ७ हजार कोटींची

## खात्यावर जमा करण्याची खासदार राजू शेट्टी यांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** साखर आयुक्त कार्यालयाकडे राज्यातील उस उत्पादक शेतक-यांची २३४९ कोटी रूपयाची एफआरपी थकीत असल्याची चुकीची आकडेवारी असून राज्यातील उस उत्पादक शेतक-यांचे जवळपास ७ हजार कोटी रूपयाचे एफआरपी थकीत आहे. यामुळे संबधित साखर कारखान्यांच्यावर आरआरसी अंतर्गत कारवाई करून तातडीने उसबिले शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी राज्याचे साखर आयुक्त सिध्दराम सालीमठ यांचेकडे केली.



उस उत्पादक शेतकऱ्यांना एक रक्कमी एफआरपी देण्याबाबत गेल्या आठवड्यात उच्च न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर राज्यातील थकीत एफआरपी बाबत राजू शेट्टी यांनी मंगळवारी पुणे येथे साखर आयुक्त यांची भेट घेतली. यावेळी थकीत एफआरपी बरोबरच काटामारी, रिकव्हरी चोरी, वजनकाटे ऑनलाईन करणे, तोडणी, वाहतूकीचा खर्च अंतरावर निर्देशात करण्यात यावा, थकीत एफआरपी १५ टक्के व्याजासह वसूल करण्यात यावे, राज्यातील साखर कारखान्यांचे शासकीय लेखा परिक्षकाकडून लेखा परिक्षण करण्यात यावे यासह विविध मुद्यावर चर्चा करण्यात आली.

राज्यातील काही मोजके राज्यकर्तेच साखर उद्योगात वर्चस्व निर्माण करून साखर उद्योगात एकाधिकारशाही निर्माण करत आहेत. मुठभर कारखानदार साखर उद्योगाची सुत्रे स्वत:च्या हातात ठेवून चुकीचे कायदे करून उस उत्पादक शेतकऱ्यांची माती करत आहेत. वास्तविक पाहता साखरेसह उपपदार्थांना बाजारात चांगला दर मिळू लागला आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना एक रकमी एफआरपी देणे सहज शक्य आहे. मात्र, साखर कारखानदार प्रक्रिया खर्च वाढल्याचे कारण सांगत दोन किंवा तीन टप्प्यात ही रक्कम देण्याचा घाट घालत आहेत. वास्तिवक पाहता उसाचे क्षेत्र मर्यादित असल्याने अंतराची अट टाकून नवीन साखर कारखान्यांना शासनाकडून मान्यता देणे बंद आहे. मात्र, दुसरीकडे तीन हजार व पाच हजार गाळप असणारे कारखाने सध्या १८ ते २० हजार टनांनी गाळप क्षमता वाढवून गाळप सुरू केले आहेत. साखर कारखान्यांचा गाळप हंगामाचे दिवस कमी झाले असून याचा अनिष्ठ परिणाम कारखान्यांच्या अर्थकारणावर झाला आहे.

येत्या आठ दिवसात साखर आयुक्तांनी राज्यातील सर्व उस उत्पादक शेतकऱ्यांचे थकीत ७ हजार कोटी रूपये १५ टक्के व्याजासह देण्यासंदर्भात साखर कारखान्यांवर आरआरसी अंतर्गत कार्यवाही न केल्यास साखर आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढणार असल्याचा इशारा खासदार राजू शेट्टी यांनी दिला. यावेळी राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, अॅड. योगेश पांडे, पुणे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बांगर, यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.



> २०१९ पासून अनेक साखर कारखान्यांचे महसुली उत्पन्न विभागनिहाय (आरएसएफ) करावयाचे हिशेब अंतिम झाले नाहीत. खरेतर हा साखर आयुक्तालयाचा गलथानपणा आहे. पाच-पाच वर्षे हिशेब दिला जात नसेल, तर साखर आयुक्तालयात बसणारे इथे सगळे कशासाठी बसलेत? हिशेब का दिला नाही, शेतकऱ्यांचे पैसे कारखान्यांनी का वापरले, ऊसदर नियंत्रण मंडळाची बैठक होत नाही. त्यामुळे साखर आयुक्तालय, ऊसदर नियंत्रण समिती, राज्य सरकार हे सर्व कारखानदारांचे बटिक झाले आहेत.
>
> — **खासदार राजु शेट्टी,** स्वाभिमानी शेतकरी संघटना

# भिगवण ग्रापंच्या वतीने अपंग कल्याण निधीचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** भिगवण ग्रामपंचायतमध्ये अपंग कल्याण निधी अंतर्गत नाव नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन हजार रुपयांचे धनादेश वाटप करण्यात आले. ग्रामपंचायतच्या उत्पन्नाच्या पाच टक्के अंध,अपंग,दिव्यांग कल्याण निधी म्हणून खर्च करण्याची तरतूद आहे, त्यानुसार हा निधी वाटप करण्यात आला आहे.

एकूण जवळपास १ लाख ५० हजार रुपये वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत हा निधी वाटप करण्यासाठी विलंब करत असल्याने येथील ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला होता, परंतु तत्पूर्वीच ग्रामपंचायतने या निधीचे वाटप केल्याने ग्रामस्थांच्या प्रयत्नांना देखील यश आले आहे.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय परदेशी यांनी नोंदणी केलेल्या अपंग लाभार्थ्यांची माहिती सांगितली.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वनिधीतील ५ टक्के निधी दिव्यांगांसाठी खर्च करणे अपेक्षित आहे. हा निधी दिव्यांगांसाठी वैयक्तिक व सामाजिक स्वरूपाच्या योजनांवर खर्च केला जात असतो. या निधी वाटप कार्यक्रमाप्रसंगी सरपंच गुराप्पा पवार,उपसरपंच सत्यवान भोसले, माजी सरपंच दिपीका क्षीरसागर, संजय देहाडे, अशोक अण्णा काटे, प्रा. तुषार क्षीरसागर, आप्पासाहेब गायकवाड ,पराग जाधव, रमेश धवडे, जावेद शेख, दत्ता धवडे, ऍड.सुरज खटके, पिंटू शेलार, आकाश उंडाळे, विशाल पाचांगणे, कपिल लांडगे,तानाजी वायसे,आबा काळे,निलेश मोरे व लाभार्थी महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.



निधी वाटप कार्यक्रमाप्रसंगी सरपंच गुराप्पा पवार,उपसरपंच सत्यवान भोसले, माजी सरपंच दिपीका क्षीरसागर, संजय देहाडे, अशोक अण्णा काटे, प्रा. तुषार क्षीरसागर, आप्पासाहेब गायकवाड ,पराग जाधव, रमेश धवडे, जावेद शेख, दत्ता धवडे, ऍड.सुरज खटके, पिंटू शेलार, आकाश उंडाळे, विशाल पाचांगणे,कपिल लांडगे,तानाजी वायसे,आबा काळे,निलेश मोरे व लाभार्थी महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# चैत्रोत्सवासाठी ऑनलाईन नोंदणी बंधनकारक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आद्यस्वयंभू श्रीक्षेत्र सप्तश्रृंगगड येथे लाखोंच्या संख्येने पायी येणाऱ्या भाविक भक्तांच्या दिंडी, पालखी, यात्रा आदी संबंधीत विविध समिती मंडळांना श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध सेवा-सुविधा, प्रशासकीय नियंत्रण तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदयातील तरतुदी अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखणे यासाठी आता सर्व संबंधित यांना ऑनलाईन नोंदणी बंधनकारक करण्यात येत आहे. यासाठी झालेल्या यात्रा नियोजन समितीने प्रशासकीय कार्याचा भाग म्हणून जाहीर सूचना केली आहे.

चैत्रोत्सव काळात भाविकांच्या गर्दीचे नियोजन, संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचे योग्य प्रकारे नियंत्रण तसेच आवश्यक ते मदतकार्य प्रक्रीये संबंधीत निर्धारीत पुर्तता करुन उत्सव कालावधीत भाविक भक्तांना सुलभ व सुरक्षित नियोजन होण्यासाठी सूचना करण्यात आली आहे. यासाठी नाशिक जिल्हा प्रशासनाने विश्वस्त संस्था, श्रीक्षेत्र सप्तश्रृंगगड ग्रामपंचायत व नांदुरी ग्रामपंचायत यांसह जिल्हा प्रशासनाचे विविध विभाग यांच्या सहभागातून आयोजीत केलेले यात्रा नियोजन बैठकीत निर्णय घेऊन ठरविण्यात आले आहे. बैठकीत ठरले प्रमाणे गुगल फॉर्म प्रकारात ऑनलाईन नोंदणी कार्यान्वित केलेली असून, सर्व दिंडी/पालखी/यात्रा समिती/मंडळांतर्गत येणाऱ्या भाविक भक्तांचे प्रातिनिधीक स्वरुपात अत्यावश्यक व अद्यावत तपशिल उपलब्ध करुन त्यांच्या सेवा-सुविधा अनुषंगीक योग्य तो समन्वय पुर्तता करण्यासाठी सोयीस्कर होणार आहे. यासाठी चैत्रोत्सव २०२५ दरम्यान सर्व पायी प्रकारात येणाऱ्या पायी दिंडी, पालखी समिती/मंडळ यांना नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

या साठी ऑनलाईन नोंदणी व प्रक्रीया ही प्रायोगीक तत्वावर सुरु करण्यात आलेली असून, भविष्य काळात अधिक प्रभावीपणे पायी येणाऱ्या भाविक भक्तांना ( दिंडी पालखी यात्रा आदी ) यांना श्रीक्षेत्र येथे अत्यावश्यक सुलभ दर्शन तसेच इतर अनुषंगिक सेवा-सुविधा तसेच प्रवासा दरम्यान जिल्हावार स्थानिक स्वराज्य संस्था अथवा महाराष्ट्र शासना मार्फत विशेष सेवा-सुविधा कार्यान्वित करणेकामी उपयुक्त ठरणार आहे. पर्यायी विश्वस्त संस्था व जिल्हा प्रशासनाच्या वतीने पायी येणाऱ्या भाविक भक्तांच्या दिंडी पालखी यात्रा संबंधीत विविध समिती, मंडळांना ऑनलाईन नाव नोंदणीसाठी आवाहन करण्यात आले आहे. चैत्रोत्सव २०२५ श्रीक्षेत्र सप्तश्रृंगगड येथील यात्रा नियोजन समिती व ट्रस्ट प्रशासन तसेच स्थानिक ग्रामपालिकेला योग्य ते सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा पोलीस, महसूल, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विश्वस्त संस्थेचे वतीने करण्यात आले आहे. विश्वस्त संस्थेचे मुख्य व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे यांनी या संदर्भात माहिती दिली.

## आळंदीत अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी सुविधा



**आळंदी :** येथील इंद्रायणी रुग्णालयात कॅथ लॅब सेवा आता इंद्रायणी रुग्णालय आणि कर्करोग संस्था, आळंदी यांचे वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे. कार्डियाक कॅथेटरायझेशन लॅबोरेटरी (कॅथ लॅब) ही एक विशेष रुग्णालय क्षेत्र असल्याचे डॉ. नितीन गोसावी यांनी सांगितले. जिथे हृदयरोगांचे निदान आणि उपचार करण्यासाठी कमीत कमी आक्रमक प्रक्रिया केल्या जातात, ज्यामध्ये अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी आणि स्टेंटिंग यांचा समावेश आहे. आरोग्य सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन इंद्रायणी रुग्णालय आणि कर्करोग स्वा संस्थेचे वतीने करण्यात आले आहे. आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांची रुग्णालयाचे वतीने भेट घेण्यात आली. अर्ली डिटेक्शन प्रोग्रामच्या अंतर्गत हर-घर सर्वे उपक्रम राबवत आहे. इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या एपिडेमिओलॉजी विभागा च्या वतीने डॉ. नितीन गोसावी यांचे हस्ते मुख्याधिकारी माधव खांडेकर यांचे स्वागत करून सत्कार केला. यावेळी ईडीपी अहवाल सादर करून संवाद साधला. यापुढील काळात सर्व्हे साठी आवश्यक ते सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

## साक्षी पाटील गोळाफेकमध्ये दुसरी



**इंदापूर :** श्री समर्थ व्यायाम मंडळ संचलित मूकबधिर निवासी शाळा इंदापूर या शाळेतील साक्षी पाटील या विद्यार्थिनीचा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत गोळा फेक या प्रकारांमध्ये राज्यात दुसरा नंबर आला. सदरच्या स्पर्धा महाराष्ट्र शासनातर्फे नागपूर येथे घेण्यात आल्या होत्या. यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी साक्षी पाटील ही राज्यांमध्ये दुसरी ठरली. याबद्दल शाळेचे अध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी क्रीडा शिक्षक व सर्व कर्मचाऱ्यांचे व विद्यार्थिनीचे अभिनंदन केले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत इसम ठार

**शिक्रापूर :** तळेगाव ढमढेरे, ता. शिरुर येथील तळेगाव ढमढेरे ते न्हावरा रस्त्यालगत असलेल्या धान्य गोदाम जवळून एक इसम अंदाजे ३५ वर्षीय रस्त्याने चालला असताना, न्हावरा बाजूने आलेल्या अज्ञात वाहनाची सदर इसमाला धडक बसून इसम रस्त्यावर पडला. अज्ञात वाहन चालक वाहनासह पळून गेला. यावेळी नागरिकांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता, सदर इसमाचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. पोलीस व नागरिकांनी सदर इसमाबाबत माहिती घेतली असता, काहीही माहिती मिळू शकली नाही. पोलीस पाटील पांडुरंग विश्वनाथ नरके यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## उन्हाळ्याची चाहूल लागताच रसवंत्या झाल्या सुरू

**सासवड :** उन्हाळ्याची चाहूल लागली असून, गेल्या आठ दिवसांपासून अचानक तापमानात वाढ झाली आहे. यामुळे पुरंदर तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागात सर्वत्र शीतपेयांसह उसाच्या रसवंत्यांची दुकाने सुरू झाली आहेत. बर्फासह रसाचा ग्लास दहा रुपयाला, तर बर्फाशिवाय १५ रुपयाला मिळत आहे. दहा रुपयांत फुल ग्लास रस मिळत असल्याने रसवंतीगृहामध्ये ग्राहकांची मोठी गर्दी दिसत आहे. थंड पाणी, कोल्ड्रिंक्स, उसाचा रस, मठ्ठा, ताक, लस्सी, सरबत, ज्यूस आइस्क्रिम, रसवंती, बर्फगोळा, कुल्फी, फळे, फळांच्या फोडी, सॅलड, भेळपुरी, पाणीपुरी, शेंगदाणे, चाट अशा वेगवेगळ्या प्रकारच्या फळांनी आणि रंगांनी दुकाने थाटली आहेत. फेब्रुवारी-मार्च महिन्यात उन्हाचे चटके कमी जाणवत असतात, उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होत असते. सध्या थंड पेयांना मागणी वाढली. त्यामुळे अनेक थंड पेयांच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे.

**उसाच्या रसाला जास्त मागणी**

पुरंदर तालुक्यातील सासवड, जेजुरी, नीरा परिसरात ज्यूसची दुकाने लावण्यात आली आहेत. चॉकलेट शेक, कोल्ड कॉफी, लिंबू सरबत, रोझ मिल्कशेक, तसेच अननस, स्ट्रॉबेरी, चिकू, सफरचंद, संत्री या फळांच्या ज्यूसची मागणी वाढली आहे. सर्व प्रकारचे ज्यूस साधारणपणे १० ते ६० रुपये किमतीपर्यंत उपलब्ध आहेत. अन्य शीतपेयांच्या तुलनेत उसाचा रस स्वस्त आणि मस्त असल्याने त्याला या दिवसांत अधिक मागणी दिसून येते.

**लग्नात थंडगार मठ्ठा**

नुकतीच लग्नसराई ही सुरू झाल्यामुळे लग्नात मठ्ठा, ताक, तसेच लिंबू सरबत मोठ्या प्रमाणावर तयार केले जाते. अनेक ठिकाणी मठ्ठा व जलजिराच्या गाड्या लावण्यात आल्या आहेत. साधारणपणे १० रुपये ग्लास मिळणारा हा जलजिरा सर्वांनाच आवडतो. महाविद्यालय, शाळा, मंगल कार्यालय या भागांमध्ये या गाड्या दिसतात.



# बालांगण



# आता आला पेटफोन



तंत्रज्ञानात खूप वेगाने बदल होत असल्याचे तुम्ही जाणता. याचाच एक भाग म्हणून 'ग्लोकलमी' नावाच्या कंपनीच्या पेटफोनकडे बघावे लागेल. या कंपनीने चक्क पाळीव प्राण्यांसाठी स्मार्टफोन सादर केला आहे. यामुळे द्वि-मार्गी संवाद शक्य होतो. अलिकडेच प्रदर्शित झालेल्या या उपकरणात भुंकण्यासारखे अनेक प्रकारचे आवाज वा प्राण्यांच्या क्रिया ओळखण्याची सुविधा देण्यात आली आहे. मालकांना पाळीव प्राण्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यास मदत करण्यासाठी यातील ट्रॅकिंग यंत्रणा उपयुक्त ठरणारी आहे.

खरेतर पेटफोन म्हणजे पाळीव प्राण्यांना लावली जाणारी एक प्रकारची कॉलर आहे. ती पाळीव प्राण्यांनी काढलेले वेगवेगळे आवाज ओळखू शकते. याद्वारे, पाळीव प्राण्यांचे मालक त्यांच्या मनःस्थितीचे निरीक्षण करू शकतात आणि आणि साउंड प्ले वैशिष्ट्यामुळे त्यांना प्रतिसाद देऊन किंवा सांत्वन देऊन शांतही करू शकतात. याव्यतिरिक्त पेटफोन जीपीएस, एजीपीएस, एलबीएस, वाय-फाय, ब्लूटूथ यांनीही युक्त आहे. त्याचबरोबर यातील ॲक्टिव्ह रडार नामक वैशिष्ट्याद्वारे पाळीव प्राण्याचे लाईव्ह लोकेशन ट्रॅक करणेही शक्य होते. एकूणच पाळीव प्राण्यांसाठी डिझाइन केलेला हा पहिला स्मार्टफोन आहे, असे आपण म्हणू शकतो. याद्वारे मालक त्यांच्या पाळीव प्राण्यांचा मार्ग शोधू शकतात. हे काम एका क्लिकवर होते. यात एक जिओफेन्स फीचर देखील आहे, जे पाळीव प्राणी सुरक्षित क्षेत्राबाहेर गेल्यावर अलर्ट पाठवते. खेरीज प्राणी अंधाऱ्या जागी असे तर उपकरणातून एक प्रखर प्रकाशझोत टाकला जातो.

**नवीन काय?**

यामुळे पाळीव प्राणी अंधारातही शोधता येतो. याच्या साह्याने पाळीव प्राण्यांचे प्रोफाइल तयार करता येते. ज्यामध्ये पाळीव प्राण्यांची माहिती, आरोग्यविषयक माहिती, काही उपचार सुरू असल्यास त्याची माहिती आणि त्याच्या खाण्याच्या पद्धती वा सवयी या सर्वांची सविस्तर माहिती असते. हे डिव्हाइस सगळा तपशील सांभाळते आणि हवा तेव्हा समोर मांडते. इतकेच नव्हे तर ते पाळीव प्राण्यांना आराम देण्यासाठी संगीतदेखील ऐकवू शकते.

# अनोखे आविष्कार



छोट्या दोस्तांनो, जगातील चित्र-विचित्र तंत्रज्ञानाविषयी आज आपण जाणून घेऊ या...

✻ 'क्रोमविले'च्या एका ॲपद्वारे कागदावरचं कोणतंही चित्र तुम्ही थ्रीडी स्वरूपात पाहू शकता. हे ॲप डाऊनलोड केल्यानंतर मोबाइल किंवा टॅब चित्रासमोर धरल्यावर चित्राला थ्रीडी इफेक्ट मिळेल. यासोबतच अभ्यासाशी संबंधित चित्राची सगळी माहितीही गॅझेटवर दिसू लागेल.

✻ हॉटेलमधून घरी काही मागवलं किंवा सुपर मार्केटमधून खरेदी केल्यावर तिथला माणूस घरी सामान पोहोचवतो. पण लवकरच हे काम रोबो करताना दिसेल. 'स्टारशिप' या कंपनीनं अनोखा 'डिलिव्हरी रोबो' तयार केलाय. हा रोबो स्वतःच रस्ता शोधून गर्दीतूनही वाट काढू शकेल. याचं नियंत्रण ॲपव्दारे करता येतं.

✻ पापड, बिस्किटं यासारखे पदार्थ कारखान्यांमध्ये तयार होतात. पण हे पदार्थ प्रिंट झाले तर? 'नॅचरल मशीन्स' या कंपनीनं असं एक उपकरण तयार केलंय. हा थ्रीडी फुड प्रिंटर आहे. त्याला 'फुडिनी' असं नाव देण्यात आलंय. फुडिनीला मोबाईलमधल्या ॲपशीही जोडता येतं.

✻ दोस्तांनो, तुम्हाला हस्तकला आवडते ना? तुम्ही तयार केलेल्या वस्तू किंवा खेळणी तुमच्या इशाऱ्यावर चालू लागली तर? धम्माल येईल ना? यासाठीच 'कॅमीबॅट' नावाचा एक रोबो

**वाचा तर खरं**

तयार करण्यात आलाय. या रोबोवर कागद ठेऊन हवा तो आकार मिळवता येतो. ॲपव्दारे तुम्ही रोबोच्या हालचालींवर नियंत्रण ठेऊ शकता.

✻ मेसेज टाईप करण्यासाठी आपल्याला स्क्रीनला टच करावं लागतं. काही स्मार्टफोन्समध्ये ऑडियो टेक्नॉलॉजीचा वापरही होतो. पण आता तुम्ही डोळ्यांनीही लिहू शकता. यासाठी 'आयरिसबॉंड' नावाचं ॲप विकसित करण्यात आलंय. तुमच्या फोनच्या की बोर्डवर लक्ष केंद्रित केलं की अक्षरं आपोआप टाईप होतील. आहे ना मज्जा!



# दिवसाची सुरूवात प्रसन्न हवी

छोट्या दोस्तांनो, सकाळची वेळ ही दिवसातील सर्वात महत्त्वाची वेळ असते. विशेषतः तुम्हा मुलांसाठी हा काळ योग्य रित्या घालवणे, दिवसाची चांगली सुरूवात करणे अत्यंत गरजेचे असते. हे साधले तर तुम्हाला संपूर्ण दिवसासाठी पर्याप्त ऊर्जा मिळतेच खेरीज तुमचा मूडही चांगला राहतो. म्हणूनच आत्तापासूनच सकाळची दिनचर्या पाळण्याची सवय लावून घ्या.

हे साधायचे असेल तर खालील गोष्टी सकाळी अजिबात करु नका. चला, त्याविषयी जाणून घेऊ या.

✻ सकाळी उठल्याबरोबर कधीही मोबाईल फोन किंवा टॅब्लेट वापरु नका. यामुळे लक्ष दुसरीकडे जाते आणि अभ्यासावर किंवा इतर महत्त्वाच्या कामावर तुम्ही लक्ष केंद्रित करू शकत नाही.



✻ मुलांनो, सकाळी जंक फूड खाणेदेखील थांबवा. कारण याचा तुमच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो आणि दिवसभर सुस्ती वाटू शकते.

**लाईफस्टाईल**


✻ अनेक मुले शाळेत जाण्याच्या घाईत नाश्ता करणे टाळतात. मात्र यामुळेही तुमचा दिवस चांगला जात नाही कारण नाश्ता हा दिवसातील सर्वात महत्त्वाचा आहार असतो. तोच वगळला तर दिवसभर तुम्ही बेचैन राहू शकता.

✻ सकाळी भावंडांशी वा घरातील इतर कोणाशी भांडणे किंवा नकारात्मक बोलणेही तुम्ही टाळायला हवे. कारण सकाळी कोणाशी वाद झाल्यास तुमचा मूड बिघडू शकतो. त्यानंतर दिवसभर तुम्ही चिडचिडे राहू शकता.

✻ मुलांनो, कधीही सकाळी उठल्यावर लगेचच टीव्ही पाहू नका. यामुळे तुमचा बहुमोल वेळ वाया जातोच त्याचबरोबर अभ्यासावर किंवा इतर महत्त्वाच्या कामावर तुम्ही लक्ष केंद्रित करू शकत नाही.

✻ सकाळी उठल्यानंतर बॅग, गणवेश आणि इतर आवश्यक वस्तू जमवून घ्या. हे तयार असले तर नंतर तुमची धांदल होणार नाही.

✻ सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लवकर झोपून लवकर उठण्याची सवय लावून घ्या. लवकर उठल्यानंतर दिवसाचा बराच काळ तुमच्या हातात राहतो. हा काळ तुम्ही अनेक चांगल्या गोष्टींसाठी सत्कारणी लावू शकता.



# अशी करा धमाल

छोट्या दोस्तांनो, सध्या परीक्षांचा माहोल आहे. एप्रिलच्या मध्यापर्यंत तुम्ही सगळेजण बिझी आहात. अभ्यासात तुम्ही गुंतलेले असाल हे तर खरं! पण परीक्षा संपली की तुम्ही मोकळे होणार आहात. मग धम्माल करायला सुरूवात होईल. तुमच्यापैकी अनेकांनी भटकंतीचा प्लॅनही केला असेल. मस्तपैकी फिरायला जाणार असाल. पण उन्हाळ्यात कुठे बाहेर जायचं असं म्हणून तुमच्यापैकी काहीजण घरीच धमाल करणार असतील. दोस्तांनो, सुट्टीसाठी काही उद्योग हवेतच. तुम्ही घरच्या घरी काही तरी करण्याचे पर्याय धुंडाळत असाल. अशा वेळी बबल पेंटिंग करून तुम्ही छान टाईमपास करू शकता.

**नियोजन**

**साहित्य** : कागद मावेल एवढा ट्रे किंवा बाऊल, रंग, साबण, स्ट्रॉ आणि कागद

**कृती** : एका ट्रेमध्ये रंग घाला. यातच लिक्विड सोप घाला. यात आता तुम्हाला पाणी घालायचं आहे. साबणाच्या पाण्यात फुगे तयार होतात. असे फुगे तयार होईपर्यंत पाणी घालावे लागेल. स्ट्रॉचा वापर करून तुम्ही फुगे तयार करू शकता. आता यावर अलगद कागद ठेवा. कागद पाण्यात भिजणार नाही याची काळजी घ्या. कागदावर फुग्याची नक्षी उमटायला हवी. अशाच प्रकारे नक्षीकाम करत राहा. वेगवेगळ्या प्रकारचे रंग यात मिसळता येतील. हे पेंटिंग करताना तुम्हाला खूपच धम्माल येईल.





# दूध का तापवायचे?

छोट्या मित्रांनो, बराच काळ दूध तापवले नाही आणि चुकीने फ्रीजच्या बाहेर राहिले तर ते फाटते वा खराब होते, हे तुम्ही जाणत असाल. त्यावरुन आईची होणारी चिडचिडही तुम्ही पाहिली असेल. पण तेच दूध उकळल्यावर जास्त काळ खराब होत नाही. हे का घडते, माहिती आहे का? तुम्हालाही हे रहस्य समजून घ्यायचे असेल ही माहिती अवश्य वाचा.

मुलांनो, दुधामध्ये नैसर्गिकरित्या अनेक प्रकारचे बॅक्टेरिया असतात. त्यापैकी काही चांगले असतात तर काही वाईट असतात. दूध खोलीच्या सामान्य तापमानात ठेवले जाते तेव्हा त्यातील काही बॅक्टेरिया वेगाने वाढू लागतात आणि लॅक्टिक ॲसिड तयार करतात. हे लॅक्टिक ॲसिड पुढची करामत घडवून आणते. जसे की, हे आम्ल दुधातील केसीन नावाचे प्रथिन गोठवण्याचे काम करते. केसीन विघटित होऊ लागते तेव्हा दूध फाटते म्हणजेच ते दह्यासारखे घट्ट होऊ लागते.

उन्हाळ्यात ही प्रक्रिया आणखी जलद होते, कारण उष्ण तापमानात जीवाणूंना वाढण्यासाठी अनुकूल परिस्थिती मिळते. हेच कारण आहे की उन्हाळ्यात दूध रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले नाही तर ते काही काळातच खराब होते. म्हणूनच मग दूध लगेचच तापवले जाते. यामागे ते जास्त काळ टिकावे, हा हेतू असतो.



**असं का होतं?**

आपण दूध उकळतो तेव्हा त्यात असणारे बहुतेक बॅक्टेरिया आणि एंजाइम नष्ट होतात. दुधात लॅक्टिक ॲसिड तयार होण्याची प्रक्रियाही मंदावते आणि ते लवकर खराब होत नाही. याशिवाय उकळल्याने दुधाची पीएच पातळी देखील संतुलित होते आणि ते बराच काळ ताजे राहते. त्यामुळेच चांगले उकडलेले दूध रेफ्रिजरेटरशिवायही काही तास चांगले राहू शकते.

# हे माहिती आहे?


दोस्तांनो, आपल्यातले अनेकजण जीमेल वापरतात. गुगल आपल्या सेवांमध्ये नवनव्या तंत्रज्ञानाची भर घालत असते. युजर्सना जीमेल सहज वापरता यावं असा गुगलचा प्रयत्न असतो. त्याबद्दल जाणून घेऊ या...

✻ दोस्तांनो, स्मार्टफोनवरून जीमेल ऑपरेट करताना कंटेंट बोल्ड, इटॅलिक अंडरलाईन किंवा हायलाईट करणं खूप कठीण असायचं. पण 'रिच टेक्स्ट सपोर्ट' ॲड केल्यामुळे स्मार्टफोनवरून मेल पाठवणं आता सोपं झालं आहे.

✻ जीमेलसोबतच याहू, हॉटमेल किंवा इतर सेवांचा वापर तुम्ही करत असाल तर प्रत्येक मेल उघडायची गरज नाही. जीमेलच्या इनबॉक्समध्येच इतर आयडीवरचे मेल्स पाहता येतील. 'जीमेफिलाई' असं या फीचरचं नाव आहे.

✻ संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम तुम्ही जीमेल ॲपवर बघू शकता. गुगल कॅलेंडरला प्रतिसाद देणं गुगलनं अत्यंत सोपं करून टाकलंय. त्यामुळे तुमची धावपळ होणार नाही.


✻ तुम्हाला टीएलएस इंस्क्रीप्शन अलर्ट मिळू शकेल. एखाद्याचा ईमेल टीएलएस इंस्क्रीप्शनला सपोर्ट करत नसेल तर तुटलेल्या कुलुपासारखा एक आयकॉन तुम्हाला मेसेज बॉक्समध्ये दिसेल.




**जाणून घ्या**

✻ तुमच्या आयडीवर बनावट मेल आली तर प्रश्नचिन्ह दिसू लागेल. यामुळे तुमची मेल सुरक्षित राहण्यास मदत होईल.

**ठिपके जुळवा**



# ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) २०१९ च्या क्रिकेट विश्वचषकाचं विजेतेपद कोणत्या संघाने पटकावलं?

२) २०२२ च्या विम्बल्डन स्पर्धेत पुरुष एकेरीचं विजेतेपद मिळवणार खेळाडू कोण?

३) डीडीटीचा शोध कोणी लावला?

४) सिंपसन आणि हॅरिसन यांनी कशाचा शोध लावला?

५) उस्ताद अमजद अली खान कोणतं वाद्य वाजवतात?

६) ऑलिम्पिक स्पर्धेत बॅडमिंटनमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय खेळाडू कोण?

७) भारतीय नौदलातली पहिली महिला पायलट कोण?

८) 'लँड ऑफ थाउसंड लेक्स' या नावाने ओळखला जाणार देश कोणता?

९) कांदा खाण्याची स्पर्धा कोणत्या देशात भरवली जाते?

१०) सौरमालेचा शोध कोणी लावला?

उत्तरे: १) इंग्लंड २) नोवाक जोकोविच ३) पॉल मुलर ४) क्लोरोफॉर्म ५) सरोद ६) सायना नेहवाल ७) शुभांगी स्वरूप ८) फिनलँड ९) स्पेन १०) कोपर्निकस

**महत्वपूर्ण...**

## फळे खा, ऊर्जा मिळवा

आता उन्हाळा चांगलाच तापू लागला आहे. या उष्ण काळात फळांचे सेवन गरजेचे ठरते. या काळात फलाहार हा एक महत्त्वाचा आहार आहे कारण त्यात शरीराला आवश्यक असणारी अनेक पोषणतत्त्वे असतात. म्हणूनच तुम्हा मुलांनी उन्हाळ्यात ताज्या आणि रसाळ फळे खाणे फायदेशीर ठरते. आंबा, पपई, कलिंगड, सफरचंद आणि स्ट्रॉबेरी अशी रसदार आणि गोड फळे या काळात तुमच्यासाठी अत्यंत चांगली आहेत. आंब्यात बरीच व्हिटॅमिन्स तर पपईत फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. कलिंगडात पाणी भरपूर असते जे शरीराला हायड्रेट ठेवते. म्हणजेच या सर्व फळांमध्ये शरीरासाठी आवश्यक ऊर्जा पुरवणारे महत्त्वपूर्ण घटक असतात. म्हणूनच या फळांवर ताव मारा आणि ताजेतवाने आणि निरोगी राहा.



**ऋतू बदल...**

## टॅनिंग टाळण्यासाठी...

उन्हाळ्यात तुम्हा मुलांची त्वचा अतिशय संवेदनशील बनते. त्यामुळे तुम्ही काळजी घेणे आवश्यक आहे. त्वचेला सूर्याच्या तीव्र उष्णतेपासून, धुळीपासून वाचवण्यासाठी बाहेर जाताना न विसरता सनस्क्रीन लावा. चेहऱ्यावर आणि हातावर हलक्याने सनस्क्रीनचा थर पसरवा. मुख्य म्हणजे थोड्या थोड्या वेळाने गार पाणी प्या. यामुळेही तुमच्या शरीरातील पाण्याची योग्य मात्रा टिकून राहणे शक्य होईल. उन्हाळ्यात त्वचा होरपळते. टॅन होते आणि काळपट रंग येतो. हे टाळण्यासाठी या दिवसांमध्ये त्वचेची योग्य स्वच्छता ठेवा. रोज थंड पाण्याने दिवसातून दोनदा आंघोळ करा. यावेळी सौम्य साबण वापरा. हे उपाय उन्हाळ्यात तुमची त्वचा निरोगी ठेवतील.



**नवे जग...**

## अशी टिकवा पुस्तके

आता परीक्षेचा काळ संपत आला आहे. लवकरच तुम्ही सुट्टीचा आनंद घेण्यासाठी सज्ज व्हाल. मात्र त्यापूर्वी जुनी पुस्तके जपण्यासाठी काही सोप्या टिप्स नक्की लक्षात घ्या. पहिली गोष्ट म्हणजे वर्षभर वापरलेली पुस्तके स्वच्छ आणि कोरड्या जागी ठेवा. ओलावा असल्यास पुस्तके खराब होऊ शकतात. पुस्तके एका योग्य आकाराच्या रॅकवर किंवा शेल्फवर ठेवा. तिथे ती दबलेली किंवा वाकलेली राहणार नाहीत याची काळजी घ्या. पुस्तकांना दुर्गंध येऊ नये किंवा कीटकांचा त्रास होऊ नये म्हणून काही काळाने त्यांना हवेशीर ठिकाणी ठेवा. पुस्तकांचे कव्हर फाटले असेल तर पुन्हा घाला म्हणजे ती जास्त काळ टिकतील. अशा प्रकारे जुनी पुस्तके तुम्ही संदर्भासाठी वापरु शकता किंवा कोणा गरजूला देऊ शकता.









# महाराष्ट्राचा महिलाशक्तीचा सुवर्ण पराक्रम

## अकुताई,भाग्यश्री, प्रतिमा सलग दुसऱ्यांदा पदकवीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क







**पुणे :** महाराष्ट्राच्या महिलाशक्ती जयजयकार सलग दुसऱ्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्येही दुमदुमला. ॲथलेटिक्समध्ये अकुताई उनभगत, भाग्यश्री जाधव पॉवरलिफ्टिंगमध्ये प्रतिमा भोंडे यांनी यंदा सुवर्णपदकासह स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा पदक जिंकण्याचा पराक्रम नोंदविला आहे.

जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये संपलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत ३८ वर्षीय अकुताई हिने गोळाफेकमधील एफ ४० प्रकारात सुवर्णपदक जिंकले. तिने ५.७९ मीटर अंतरावर गोळा फेकला. याच प्रकारात महाराष्ट्राच्या रूही शिंगाडेने ४.४३ मीटर फेकी करून कांस्यपदकाची कमाई केली.

स्पर्धेतील अकुताईचे हे दुसरे सुवर्ण ठरले. यापूर्वी तिने थाळीफेकमध्ये १५.८३ मीटर कामगिरीसह सुवर्ण जिंकले होते. गत खेलो इंडिया पॅरा गेम्समध्येदेखील तिने याच दोन्ही प्रकारात सुवर्ण जिंकले होते. मूळ पंढरपूरजवळील शेवते गावची रहिवासी असलेली अकुताई सध्या पुण्यातील आझम कॅम्पस येथे पॅरालिम्पिक पदकविजेता खेळाडू सचिन खिलारी याच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या अकुताईचे आई-वडील शेती करतात. येत्या काळात आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी पात्रता मिळवून देशासाठी पदके जिंकण्याची इच्छा असल्याचे तिने सांगितले.

पॅरालिम्पिक खेळाडू असलेल्या भाग्यश्री जाधव हिनेदेखील गत खेलो इंडिया पॅरा गेम्सप्रमाणे यावेळीही दोन सुवर्णपदके पटकावली. तिने यावेळीही भालाफेक आणि गोळाफेक प्रकारात अव्वल स्थान प्राप्त केले. भाग्यश्रीने गोळाफेकीत ७.३० मीटर अंतरावर गोळा फेकत दुसरे सुवर्ण पदक पटकावले. भाग्यश्री ही मूळची नांदेड जिल्ह्यातील घोडवडज गावची. 18 वर्षांची असताना ती कोमात गेली. त्यात तिच्या पायाखालील शरीर अधू झाले. सध्या ती पुण्यातील शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर रविंदर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

पॉवरलिफ्टिंगमध्ये महिलांच्या ५० किलो गटात नागपूरच्या प्रतिमा भोंडे सोनेरी यशाचे वजन पेलले. ३३ वर्षीय प्रतिमाने ८६ किलो वजन उचलून महाराष्ट्राची शान उंचावली. तामिळनाडूच्या गोमाथीने ६५ किलो वजन उचलून रौप्य पदकाची कमाई केली. गोमाथीपेक्षा तब्बल ११ किलो अधिक वजनाची सरस कामगिरी करीत प्रतिमाने केली. गतस्पर्धेत प्रतिमाला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त विजय मुनेश्वर यांच्याकडे गेली वर्ष ती सराव करीत आहे.

कॅन्सरमुळे तिच्या आईचे निधन झाल्यापासून नागपूरात एकटी राहूनच प्रतिमा कसून सराव करत असते. बालपणीपासून ती पायाने दिव्यांग आहे. पदक जिंकल्यानंतर प्रतिमा भोंडेने सांगितले की दिवंगत आईचे स्वप्न होते की मी देशासाठी पदक जिंकावे. आईच्या स्वप्नपूर्ती मी कष्ट घेत आहे.

# आर्या कसबे, रेयांश हुंदलानी, रितीशा नेहे, राजस यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे व केपीआयटी व सोलींको प्रायोजित ८,१० वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील पीएमडीटीए मानांकन आयटीए करंडक टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज २०२५ स्पर्धेत आर्या कसबे, रेयांश हुंदलानी, रितीशा नेहे, राजस आंबेकर यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. इंटेंसिटी टेनिस अकादमी, कपिला रिसॉर्ट, खराडी येथे पार पडलेल्या या स्पर्धेत ८ वर्षाखालील मुलींच्या गटात आर्या कसबेने मौर्वी गुप्ताचा ४-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. याच मुलांच्या गटात अंतिम लढतीत दुसऱ्या मानांकित रेयांश हुंदलानीने अव्वल मानांकित शौर्य कलवागट्टीचा ७-४ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. १० वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम फेरीत राजस आंबेकर याने सातव्या मानांकित रियान पाटीलचा ७-१ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. याच मुलींच्या गटात अंतिम फेरीत बिगरमानांकित रितीशा नेहे हिने अव्वल मानांकित अन्वि साहूचा ७-४ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक अशी पारितोषिके देण्यात आली.

# पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमीचा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत कणद वैद्य(४-१४) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने मोरया क्रिकेट अकादमी संघाचा ७६ धावांनी पराभव करून आगेकूच केली.

धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने २५ षटकात ७ बाद १६९ धावा केल्या. यात वरद मिरकुटे ५५, अबीर जोगळेकर २९, स्वारीत थरवाल २० यांनी धावा केल्या.

याच्या उत्तरात मोरया क्रिकेट अकादमी संघ २३.२ षटकात सर्व बाद ९३ धावावर संपुष्टात आला. यात सम्यक शहा १७, वीर निकम १३, समर्थ खोत १० यांनी थोडासा प्रतिकार केला. विजयी संघाकडून कणद वैद्य(४-१४), रुद्र चौधरी(१-१०) यांनी अचूक गोलंदाजी करत संघाला 76 धावांनी विजय मिळवून दिला.

निकाल: साखळी फेरी:

पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी: २५ षटकात ७ बाद 169धावा(वरद मिरकुटे ५५ (५६,६×४), अबीर जोगळेकर २९, स्वारीत थरवाल २०, विक्यथ शेट्टी ३-३२, कार्तिकी थोपटे १-२०) वि.वि. मोरया क्रिकेट अकादमी: २३.२ षटकात सर्व बाद ९३धावा(सम्यक शहा १७, वीर निकम १३, समर्थ खोत १०, कणद वैद्य ४-१४, रुद्र चौधरी १-१०); सामनावीर - कणद वैद्य; पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघ ७६ धावांनी विजयी.

# सूदर्शन-बटलरची झंझावाती खेळी, पण श्रेयस अय्यरची पंजाब किंग्सच गुजरात टायटन्सवर भारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अहमदाबाद :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेचा पाचवा सामनाही रोमांचक झाला. मंगळवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात पंजाब किंग्सने गुजरात टायटन्सला शेवटच्या षटकात ११ धावांनी पराभवाचा धक्का दिला. यासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात पंजाबने विजयी सुरुवात केली आहे. श्रेयसचे पंजाबच्या विजयात मोलाचे योगदानही राहिले. या सामन्यात पंजाब किंग्सने गुजरातसमोर २४४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग गुजरातला २० षटकात ५ बाद २३२ धावा करता आल्या. त्यांच्याकडून साई सूदर्शन आणि जॉस बटलर यांनी चांगली झुंज दिली, पण त्यांना संघाला विजय मिळवून देता आला नाही.

गुजरातकडून साई सूदर्शन आणि कर्णधार शुभमन गिल यांनी सलामीला फलंदाजी केली. या दोघांनीही सुरुवातीलाच पंजाबविरुद्ध आक्रमण केले होते. त्यांनीजवळपास १० च्या धावगतीने धावा करताना पॉवरप्लेची ६ षटके संपण्यापूर्वीच ६० धावांचा टप्पा संघाला पार करून दिला. मात्र, गिलला ग्लेन मॅक्सवेलने ६ व्या षटकात प्रियांश आर्यच्या हातून झेलबाद केले. शुभमनने २ चौकार आणि ३ षटकारांसह १४ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. तो बाद झाल्यानंतरही जॉस बटलरने सूदर्शनला भक्कम साथ दिली. सूदर्शनचा झंझावात कायम राहिला. त्याने पंजाबच्या गोलंदाजांना स्थिरावू दिलं नाही. तो ज्याप्रकारे फलंदाजी करत होता, ते पाहाता गुजरातसाठी विजयाच्या आशाही कायम होत्या.

सूदर्शनने ३१ चेंडूत त्याचे अर्धशतक केल्यानंतर आणखीच वेगवान खेळ केला. अखेर त्याचं वादळ अर्शदीप सिंगने १३ व्या षटकात थांबवलं. शशांक सिंहने त्याचा झेल घेतला. सूदर्शनने ४१ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह ७४ धावांची खेळी केली. तो बाद झाल्याने त्याची बटलरसोबतची ८४ धावांची भागीदारी तुटली. तरी जॉस बटलर आणि शेरफेन रुदरफोर्डने मोठे शॉट्स खेळत आशा कायम ठेवल्या होत्या. बटलरनेही ३१ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले.

पण अर्धशतकानंतर त्याला १८ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर मार्को यान्सिनने त्रिफळाचीत केले. त्यामुळे बटलरला ३३ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह ५४ धावांवर बाद होऊन माघारी परतावे लागले. बटलर बाद झाला, तेव्हा १२ चेंडूत ४५ धावांची गुजरातला गरज होती. तरी रुदरफोर्ड आणि राहुल तेवतिया यांनी मिळून १९ व्या षटकात १८ धावा चोपल्या. त्यामुळे शेवटच्या षटकात २७ धावा असे समीकरण होते. मात्र पहिल्याच चेंडूवर राहुल तेवतिया धावबाद झाला. तरी रुदरफोर्डने दुसऱ्या चेंडूवर षटकार मारत आशा जिवंत केल्या होत्या. मात्र चौथ्या चेंडूवर त्याला रुदरफोर्डने त्रिफळाचीत केले.

# न्यु इंडिया, डेक्कन इलेव्हन, खडकी ब्ल्युज् संघ विजयी



**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या प्रथम श्रेणी आणि व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात न्यु इंडिया सॉकर क्लब, डेक्कन इलेव्हन, खडकी ब्ल्युज् स्पोटर्स असोसिएशन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली. कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या प्रथम श्रेणी गटाच्या झालेल्या सामन्यामध्ये न्यु इंडिया सॉकर क्लबने घोरपडी तामिळ युनायटेड संघाचा ५-४ असा निसटता पराभव केला. न्यु इंडिया संघाकडून रविकुमार यादव याने दोन गोल तर, प्रसाद नायर, झेफानिहा मेनेझेस आणि शुभम राज यांनी प्रत्येकी एकेक गोल नोंदविला. घोरपडी तामिळ युनायटेड संघातून प्रभु भंडारी याने तीन गोल आणि कार्तिक काली याने जादाच्या वेळेत एक गोल केला. व्होबा एफसी अ संघ आणि संगम यंग बॉईज यांच्यातील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. व्होबाकडून आयुष जैन याने आणि संगम यंग बॉईजकडून समीर कार्की यांनी गोल केले. व्दितीय श्रेणी गटामध्ये लिजंड्स फुटबॉल ॲकॅडमी आणि पुना सोशल स्पोटर्स क्लब यांच्यामधील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. पुना सोशल स्पोटर्स क्लबकडून सौरभ जाधव याने २१ व्या मिनिटाला गोल करून आघाडी घेतली. लिजंड्सकडून व्हिन्सेंट नायर याने उत्तरार्धात बरोबरीचा गोल नोंदविला. संकेत भंडाल याने केलेल्या दोन गोलांमुळे डेक्कन इलेव्हन ड संघाने लिजंड्स युनायटेड फुटबॉल क्लबचा २-० आ पराभव केला. खडकी ब्ल्युज् स्पोटर्स असोसिएशन संघाने अशोका फुटबॉल क्लबचा ६-० असा सहज पराभव केला. रोमेश पिल्ले याने सर्वाधिक तीन गोल केले. अथर्व कुसाळकर याने दोन तर, जॉन्टी तोरडमल याने एक गोल करून खडकी संघाला सहज विजय मिळवून दिला.

# विराट कोहलीला आयपीएलमध्ये मिळाले २१ कोटी; यावर किती कर भरावा लागणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** गेल्या आठवड्यात आयपीएलमध्ये कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) विरुद्ध अर्धशतक झळकावणारा विराट कोहली या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कोहली यंदाच्या आयपीएलसाठी २१ कोटी रुपये मानधन घेत आहे. ऑनलाइन बिझनेस कन्सल्टन्सी कंपनी टॅक्सोलॉजी इंडियाच्या आकडेवारीनुसार, २००८ ते २०१० या काळात विराट कोहलीचा आयपीएलमधील पगार केवळ १२ लाख रुपये होता. कोहलीच्या खेळामुळे आणि त्याच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे त्याचा पगार २०२५ मध्ये 21 कोटी रुपये झाला आहे. २०१० नंतर २०११-१३ मध्ये त्याचा पगार वाढून ८.२८ कोटी रुपये झाला होता.

यानंतर २०१४ ते २०१७ पर्यंत त्याचा आयपीएल पगार १२.५ कोटी रुपये होता. २०१८ ते २०२१ या कालावधीत त्याचा पगार १७ कोटी रुपये होता. मात्र, २०२२ ते २०२४ या काळात त्याच्या पगारात घट होऊन तो १५ कोटींवर आला. आता टॅक्सोलॉजी इंडियाच्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये तो ४० टक्क्यांनी वाढून २१ कोटी रुपये झाला आहे. २००८ पासून आतापर्यंत त्याने आयपीएलच्या माध्यमातून एकूण १७९.७० कोटी रुपये कमावले आहेत.

२१ कोटी पगारासह कोहली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूमधील सर्वाधिक मानधन घेणारा खेळाडू आहे. त्याच्यापाठोपाठ जोश हेजलवूड (१२.५० कोटी) आणि भुवनेश्वर कुमार (१०.७५ कोटी) यांचा क्रमांक लागतो. लिलावादरम्यान सर्वात कमी बोली ३० लाख रुपये होती. आरसीबीने स्वस्तिक चिकारा, मनोज भंडागे, अभिनंदन सिंग आणि मोहित राठी या चार खेळाडूंना प्रत्येकी ३० लाख रुपयांना खरेदी केले आहे.

# 'ती' मागणी ईडन गार्डनच्या पिच क्युरेटरने फेटाळली!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु विरुद्ध पराभव झाल्यानंतर अजिंक्य रहाणेनी ईडन गार्डनवरील खेळपट्टी बदल करण्याची मागणी केली होती. या खेळपट्टीवर स्पीनर्सला मदत मिळावी, असं तो म्हणाला होता. मात्र, त्याची ही मागणी ईडन गार्डनच्या पीच क्युरेटरने फेटाळून लावली आहे. त्यामुळे आयपीएलच्या सुरुवातीलाच आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. पहिल्या सामन्यानंतर बोलताना, "आम्हाला या खेळपट्टीवर स्पीनर्सला मदत मिळावी असं वाटतंय, असं अजिंक्य राहणे म्हणाला होता. तसेच आमच्याकडे असलेल्या दोन्ही स्पीनर्सची गुणवत्ता पाहता, ते कोणत्याही प्रकारच्या खेळपट्टीवर गोलंदाजी करू शकतात, पण तरीही स्पीनर्सला मदत मिळावी असं आम्हाला वाटतंय, अशी प्रतिक्रियाही त्याने दिली होती.

अजिंक्य राहणेच्या या विधानावर आता ईडन गार्डनचे पिच क्युरेटर सुजान मुखर्जी यांनी प्रतिक्रिया दिली. 'रिव्हस्पोर्ट्झ' ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी यासंदर्भात भाष्य केलं आहे. यावेळी बोलताना त्यांनी अजिंक्य राहणेची ही मागणीही फेटाळून लावली आहे. "जोपर्यंत मी पीच क्युरेटर आहे. तोपर्यंत ईडन गार्डन्सची खेळपट्टी बदलणार नाही. आयपीएलच्या नियमांनुसार, संघांना खेळपट्टी ठरवण्याचा कोणताही अधिकार नाही.

# आई-वडिलांवरून वाद? चहल धनश्रीच्या घटस्फोटाचं खरं कारण आलं समोर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटपटू युझवेंद्र चहल व कोरिओग्राफर धनश्री वर्मा यांचा नुकताच घटस्फोट झाला. कोर्टाच्या आदेशानुसार युझवेंद्र चहल धनश्री वर्माला ४.७५ कोटी रूपये पोटगी दिली. दोघांनीही एकत्र राहाण्याची समस्या असल्याचे कारण घटस्फोटावेळी सांगितले होते. पण आता दोघांच्याही घटस्फोटामागचं खरं कारण समोर आले आहे.

चहलचे वकिल नितीन कुमार गुप्ता यांनी गुरुवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना कोर्टाने घटस्फोटाला मान्यता दिली असल्याचे असल्याचे सांगितले. "न्यायालयाने घटस्फोट मंजूर केला आहे व दोघांचीही संयुक्त याचिका स्वीकारली आहे. त्यामुळे दोघेही आता पती-पत्नी राहिलेले नाहीत," वकिल गुप्ता म्हणाले.

वकिलाने दिलेल्या माहितीनुसार दोघांनीही एकमेकांच्या सहमतीने घटस्फोट घेतला आहे. त्याच्यबरोबर ते मागच्या १८ महिन्यांपासून वेगळे राहात असल्याचे सांगितले. घटस्फोटाचे कारण विचारल्यानंतर, दोघांनीही एकत्र राहाण्याची समस्या असल्याचे सांगितले. पण आता दोघांच्या घटस्फोटामागील वेगळचं कारण समोर येत आहे. मीडिया रिपोर्टनुसार, धनश्रीने चहलकडे हरियाणातून मुंबईला शिफ्ट होण्यासाठी हट्ट केला होता. पण चहलने आई-वडिलांना सोडून मुंबईत येण्यासाठी नकार दिला. या कारणावरून दोघांमध्ये वाद झाल्याचे समजत आहे. लग्नानंतर चहल व धनश्री हरियाणामध्ये युझवेंद्रच्या आई-वडिलांसोबत राहत होते. पण धनश्रीने चहलकडे मुंबईमध्ये शिफ्ट होण्याचा हट्ट केला. पण चहलने आई-वडिलांना सोडून मुंबईला शिफ्ट होण्यास नकार दिला.

## भारताला बांगलादेशने बरोबरीत रोखले

# वर्चस्व राखूनही गोल करण्यात अपयश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताने सामन्यावर वर्चस्व राखले, पण अनुभवी सुनील छेत्रीसह खेळाडूंना संधी साधता आल्या नाहीत, परिणामी सौदी अरेबियात २०२७ साली होणाऱ्या आशिया करंडक फुटबॉल स्पर्धेच्या पात्रता फेरीत बांगलादेशविरुद्ध गोलशून्य बरोबरीवर समाधान मानावे लागले. पात्रतेच्या तिसऱ्या फेरीतील क गट सामना जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर झाला. भारत व बांगलादेश यांच्यातील २९व्या आंतरराष्ट्रीय लढतीतील ही अकरावी बरोबरी ठरली, तर मानोलो मार्केझ यांच्या मार्गदर्शनाखाली भारताला सहापैकी चौथ्या लढतीत बरोबरीवर समाधान मानावे लागले. क गटातील भारताचा पुढील सामना हाँगकाँगविरुद्ध १० जून रोजी खेळला जाईल. मंगळवारी या गटात झालेला सिंगापूर व हाँगकाँग यांच्यातील सामनाही गोलशून्य बरोबरी राहिला. त्यामुळे गटातील चारही संघांच्या खाती आता प्रत्येकी एक गुण आहे.

फिफाच्या जागतिक क्रमवारीत भारत १२६ व्या, तर बांगलादेश १८५ व्या क्रमांकावर आहे. या लढतीसाठी बांगलादेशने इंग्लिश प्रीमियर लीग स्पर्धेतील अनुभव गाठीशी असलेल्या हमझा चौधरी याला खेळविले. हुकमी बचावपटू संदेश झिंगन याने या लढतीत भारताचे नेतृत्व केले. अनुभवी सुनील छेत्री ८५व्या मिनिटापर्यंत खेळला.

सामन्याच्या ३१व्या मिनिटास भारताला आघाडी घेण्याची आयती संधी होती. सुभाशिष बोस याने रचलेल्या चालीवर लिस्टन कुलासोच्या क्रॉस पासवर उदांता सिंगचे हेडिंग बांगलादेशचा बचावपटू महंमद रिदॉय याने विफल ठरविले. यावेळी चेंडू भारतीय खेळाडू फारुख चौधरी याच्याकडे गेला, त्याचा फटका बांगलादेशचा गोलरक्षक मितुल मार्मा याने वेळीच रोखले. त्यानंतर ४२व्या मिनिटास भारतीय गोलरक्षक विशाल कैथ याच्या दक्षतेमुळे महंमद मोजिबोर जॉनी याचा प्रयत्न यशस्वी ठरू शकला नाही. त्यापूर्वी सामन्याच्या २२व्या मिनिटास बांगलादेशला मोठा धक्का बसला.

#रा